

# शब्द रुची

४३

फुलास जिथे फुलता येते
ते झाडच माझे पुस्तक आहे
ज्याचे पान न्...पान वाचता येते

जुलै २०१८
मूल्य १० रुपये
पृष्ठे ५६



# पुस्तकप्रकाशन क्षणचित्रे



डॉ. दीपक पवार लिखित 'भाषाविचार' पुस्तकप्रकाशनसमयी डॉ. वीणा सानेकर, सुदेश हिंगलासपूरकर, चिन्मयी सुमित, राजन राजे, कुमार केतकर, जयंत पाटील आणि लेखक डॉ. दीपक पवार



संगीता अरबुने लिखित 'मनीमानसी' पुस्तकप्रकाशनसमयी धनश्री धारप, लेखिका संगीता अरबुने, फादर फ्रान्सिस दिब्रेटो आणि ज्याती कपिले




योजना शिवानंद लिखित 'आषाढी : भक्तिसंगीताची रौप्यमहोत्सवी वारी' पुस्तकप्रकाशनसमयी सुदेश हिंगलासपूरकर, मुकुंद कुळे, डॉ. सुनील कट्टी, डॉ. पी.एस. रामाणी, डॉ. सदानंद मोरे, लेखिका योजना शिवानंद, पुष्पा पागधरे, साधना सरगम, पं. प्रभाकर कारेकर, पं. श्रीनिवास जोशी आणि मीना गोखले



प्रकाश अंबुरे लिखित 'आरवली ते अरावली' पुस्तकप्रकाशनसमयी सुदेश हिंगलासपूरकर, धनंजय गांगल, वाय.एम. देवस्थळी, लेखक प्रकाश अंबुरे, श्रद्धा अंबुरे, डॉ. अनिल काकोडकर, विनायक कुळकर्णी आणि वैभव वझे



मुंबईचे महापौर विश्वनाथ महाडेश्वर यांनी २९ जून २०१८ रोजी, 'ग्रंथाली' कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. सुदेश हिंगलासपूरकर, महापौर विश्वनाथ महाडेश्वर, श्रीधर पाटील, अरुण जोशी, डॉ. लतिका भानुशाली, धनश्री धारप, किमया गावडे, रश्मी मयेकर, आणि अनिरुद्ध गद्रे



अरुणा साधू, कुमार केतकर, शरद पवार आणि अश्विनी दरेकर पाठ्यवृत्ती घोषणा



अरुण साधू स्मृतीप्रित्यर्थ 'झिपऱ्या' सिनेमा पाहताना

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची


ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

**जुलै २०१८, वर्ष सहावे**
**अंक तिसरा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**

कार्यकारी संपादक : **डॉ. वीणा सानेकर**

मुखपृष्ठ : **सतीश भावसार**


---


कार्यालयीन संपर्क

**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल**


---


**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी २५० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**


---


पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
☎ २४२१६०५० / २४३०६६२४
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com


---


**ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**


---


**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**


## अनुक्रम


**बालविश्व**

- बालसाहित्यापुढील आव्हाने व उपाय
  **आश्लेषा महाजन** / ६
- नाटक-जाणिवांचा खेळ : अमृत सामक
  **मानसी गानू** / १०

**स्मरणस्वर**

- अधिवक्ता शांताराम दातार : मायमराठीसाठी समर्पित जीवन
  **प्रकाश परब** / १३
- हिरवं भान जपणारा कवी नलेश पाटील
  **सतीश सोळांकूरकर** / १६

**नाट्यगौरव**

- 'कमांडर'चा जीवनगौरव
  **श्रद्धा पेडणेकर** / १८
- याद'गार' नाट्यसंमेलन
  **नंदकुमार परशुराम पाटील** / २२

**कनातीमागची पायरव**

- तमाशातील वगनाट्याची जादुई दुनिया
  **श्यामल गरूड** / २५

**प्रतिभेचे चांदणे**

- लिओ टॉलस्टॉय यांची ॲना कॅरेनिना
  **धनंजय गांगल** / २९

**व्यक्तिचित्र**

- गिरणगावातील विठू
  **संजीव सावंत** / ३२

- ट्रम्पची अमेरिका
  **डॉ. अनंत लाभसेटवार** / ३५
- **पुस्तकप्रकाशन वृत्तांत** / ४०
- **मेहता पब्लिशिंग हाऊस** / ५०
- ग्रंथाली ग्रंथपाने – **चांगदेव काळे** / ५१

## संपादकीय...

चित्रकार पाब्लो पिकासोचे एक विधान असे आहे. 'Artists who live and work with spiritual values can not and should not remain indifferent to a conflict in which highest values of humanity & civilisation are at stake.' जुलै १९३७ मध्ये पॅरिसच्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात पाब्लो पिकासोचे 'गेर्निका' हे चित्र प्रदर्शित झाले. त्याला ८१ वर्षे झाली. पिकासो पॅरिसमध्ये राहूनही मायभूमी स्पेनशी दृढपणे जोडलेला राहिला. हिटलरचा मित्र फ्रान्सिस्को फ्रांकोच्या स्पेनमधील हुकूमशाही राजवटीचा तो विरोधक होता. हुकूमशाही विरोधातली त्याची भूमिका ठामपणे त्याने त्याच्या चित्रांतून व्यक्त केली. 'गेर्निका', 'द चार्नेल हाऊस' ही त्याची प्रसिद्ध चित्रे याबाबतीत महत्त्वाची ठरतात. स्पेनमधील 'गेर्निका' या सातेक हजार वस्तीच्या गावावर १९३७ मध्ये जर्मन फौजांनी भयानक बॉम्बहल्ला केला. सारे बेचिराख झाले. या हल्ल्याचा स्पेनमधील जनतेला प्रचंड धक्का बसला. 'गेर्निका' या चित्रातून पिकासोने प्रतिमा-प्रतीकांच्या योजनेतून जागतिक स्तरावर शाश्वतपणे महत्त्वाची ठरावी अशी निर्मिती केली आहे. निष्पाप जिवांच्या किंकाळ्या, कळवळून फोडलेले टाहो, अमानुष संहार-विनाश, माणसांचे थंडगार मौन आणि विनाशाचे थैमान अशी युद्धाची शोकांतिका या चित्रातून काळ्या-पांढऱ्या रंगातून बोलकी होते. पिकासोच्या घरी येऊन ठेपलेला एक नाझी अधिकारी 'गेर्निका'चे छायाचित्र पाहून त्याला विचारतो, 'हे तुम्ही केलेत?'' पिकासो त्याला उत्तर देतो, ''नाही. तुम्ही!'' केवळ दोन शब्दांत प्रतिगामी शक्तींच्या विरोधातली आपली भूमिका पिकासोने स्पष्ट केली. माणुसकी आणि संस्कृतीची श्रेष्ठतम मूल्ये पणाला लागलेली असताना खऱ्या कलावंताला तटस्थ राहता येत नाही हे तर खरेच.

१९३९ ते ४५ हा दुसऱ्या महायुद्धाचा काळ! या काळात नाझी शक्तींनी उभ्या केलेल्या छळछावण्यांनी मानवतेला काळिमा फासला. स्त्री-पुरुषांना तर या छळछावण्यांमध्ये डांबलं गेलंच पण लहान मुलांचीही यातून सुटका झाली नाही. या छळछावण्यांमध्ये लाखोमुलांचे बळी गेले. सगळं कोळपून गेलेल्या उद्‌ध्वस्त आसमंतातही काही अंकुर तग धरून राहिले. 'डायरी ऑफ ॲन फ्रँक' ही अवघ्या १३ वर्षांच्या मुलीने लिहिलेली दैनंदिनी हे याचंच उदाहरण आहे. असुरक्षितता, भीती, दहशत आणि या साऱ्यातही आयुष्य जगण्याची आटोकाट जिजिविषा ॲनच्या डायरीतून डोकावते. तिचं वयात येणं, तिचं प्रेम, मित्रमैत्रिणींविषयीची ओढ, नाझींकडून आपली माणसं हिरावून घेतली जाण्याची अखंड भीती, छळछावणीत डांबले जाण्याची सातत्यपूर्ण असुरक्षितता या सर्व धाग्यांनी विणले गेलेले ॲनचे भावविश्व या डायरीतून उभे राहते. कॅसली वाईन लिखित 'हॅनाज सुटकेस' हे पुस्तकही यासंदर्भात आठवते. माधुरी पुरंदरे यांनी त्याचा मराठीत अनुवाद केला आहे.

ज्यूंना चित्रपटगृहात प्रवेश नाही. ज्यू मुलांचे बागेतील खेळणे, व्यायामशाळा, स्केटिंग या सर्व आनंदावर नियंत्रणे! ज्यू मुलांशी मैत्री करायची नाही अशी इतर मुलांवर बंधने! त्यामुळे हॅना व तिचा भाऊ जॉर्ज यांचे त्यांच्या मित्रमैत्रिणींपासून तुटत जाणे. या सर्व दु:खावरचं औषध म्हणून हे कागदावर लिहून, ते बाटलीत भरून, खड्ड्यात दु:ख पुरून ठेवणे. हे सर्व वाचताना वाटते की लाखो मुलांपासून त्यांच्या नकळत हुकूमशाही क्रूर शक्तींनी काय-काय हिरावून घेतले आणि या सर्वातही मुलांनी तगून राहण्यासाठी त्यांच्या-त्यांच्या शक्तीनुसार किती प्रयत्न केले. जग चांगले आहे, ते सुंदर आहे याच्यावर या मुलांचा किती विश्वास उरला असेल? किंवा तो अबाधित राहावा म्हणून त्यांच्याजवळच्या मोठ्यांना किती झगडावे लागले असेल?

एली विसेल या नोबेल शांती पुरस्कार विजेत्या लेखकाने त्याचे अनुभव 'नाईट' या पुस्तकात शब्दबद्ध केले आहेत. कुमारवयात असताना एली आणि त्याच्या कुटुंबाला ऑशविट्झ या छळछावणीत नेण्यात आले. आपले कुटुंब आणि आपला निरागसपणा यांच्या मृत्यूची कहाणी 'नाईट' या पुसतकामधून साकारली आहे. या पुस्तकात नाझींनी केलेल्या मुलांच्या छळासंदर्भातला उल्लेख वाचताना अंगावर काटा उभा राहतो. 'तान्हीबाळे हवेत फेकली जायची आणि मशीनगन्सच्या सरावांसाठी टार्गेट म्हणून तान्ह्या बाळांचा वापर केला जायचा.'

पाशवी अत्याचारांच्या तांडवात मुलं कशी भरडली जातात, याचं प्रत्यंतर आजही येतंच आहे. संयुक्त राष्ट्रांनी गतवर्षाबाबतचा त्यांचा 'चाइल्ड ॲन्ड आर्म्ड कॉन्फ्लिक्ट' हा अहवाल प्रकाशित केला. त्यातून पुढे आलेले वास्तव खूप अस्वस्थ करून गेले. हा अहवाल असे म्हणतो की जगभरात सुरू असलेल्या सैनिकी कारवायांमध्ये व युद्धांमध्ये गेल्या वर्षभरात सुमारे १० हजार मुलांचा मृत्यू झाला. अनेकांना अपंग केले गेले, अनेकांवर बलात्कार झाले तर अनेकांना जबरदस्तीने सैनिक बनवले गेले. म्यानमार, दक्षिण सुदान, सिरिया, इराक, नायजेरिया, सोमालिया इत्यादी ठिकाणी घडलेल्या घटनांमधून मुलांचे हक्क क्रूरपणे हिरावले गेल्याच्या, त्यांचे आयुष्य उद्‌ध्वस्त केल्याच्या नोंदी सापडतात.

मानवी द्वेष, भेदभाव, राक्षसी महत्त्वाकांक्षा, स्पर्धा, सत्ता, स्वार्थांधता, धर्मांधता, यांच्या गरगरत्या चक्रात वर्षानुवर्ष लहान मुलं भरडून निघतायत. आरती प्रभूंच्या शब्दांचा आधार घ्यायचा

तर अजूनही इथे भोळ्या कळ्यांना आसवांचा वास येतो.

००००

मृत्यू चटका लावून जातो. विशेषत: अशा माणसांचा तर अधिकच जी चारचौघांसारखं चौकटीतच आयुष्य जगत नाहीत, जी ध्येय-उद्दिष्ट समोर ठेवून काम करत राहतात. देशाकरता-भूमीकरता लढणाऱ्यांची परंपरा आपल्याकडे आहेच पण भाषेकरता लढणाऱ्यांची परंपरा तुलनेने क्षीण आहे. आता तर हळूहळू ती तुटतच चालली आहे. अशा टप्प्यावर शांताराम दातारांचे जगाचा निरोप घेणे हळवे करून गेले. 'मराठी भाषा संरक्षण आणि विकास' या त्यांनी स्थापन केलेल्या संस्थेच्या माध्यमातून माझे मित्र दीपक पवार, संतोष आग्रे दातारांशी जोडलेले होते. पुढे यथावकाश मराठीच्या कामाला व्यापक परिमाण देण्याच्या उद्देशाने मराठी अभ्यास केंद्राची स्थापना झाली. या कामातून डॉ. प्रकाश परबांचा आणि माझा दातारांशी परिचय झाला. मराठीबाबतच्या प्रश्नांवर दातार आवर्जून माझ्याशी बोलायचे. त्यांची कळकळ आवाजातून झिरपत राहायची.

मराठीच्या हिताकरता भाषाधोरण लवकरात लवकर अंमलात यायला हवे म्हणून ते निकराने वाट पाहात होते. कधी-कधी उद्विग्न होऊन म्हणायचे, ''लिही ग कडक तू भाषाधोरणाबाबत. बोलत राहा त्याच्याबद्दल, संधी मिळेल तिथे.'' दातार ज्याची डोळ्यांत प्राण आणून वाट पाहात होते ते भाषाधोरण केव्हा येणार याची वाट दातारांचे प्राण गेल्यानंतर मराठीच्या चळवळीतले कार्यकर्ते पाहात राहतील. दातारांचे काम वाया जाणार नाही असे म्हणत राहतील.


००००

केलेले काम आणि रुजलेली कविता अनेक अंगांनी फुलून येते म्हणून तर नलेश पाटील यांची कविता आजही हिरवे भान देते आहे. रसिकांना या पावसाळी ऋतूत चिंब भिजवून टाकणारा त्यांचा कवितासंग्रह जून महिन्यात प्रकाशित झाला. निसर्गाची लिपी वाचणारे नलेश पाटील आज आपल्यात नसले तरी त्यांची वारा पिऊन सळसळणारी कविता आपल्यासोबत आहे. रंगसंवेदना जागवणारी ही कविता मनाला चैतन्यशील करते. एकीकडे काहीतरी विस्कटत जाते आणि दुसरीकडे काहीतरी नवे उभे राहते, हा निसर्गाचा नियम आहे. म्हणूनच एका कवीने आतून केलेल्या या प्रार्थनेला निसर्ग पुन्हा-पुन्हा साद देईल, यात शंका नाही.

घन आभाळीचा तडकावा / मातीस मिळावा शिडकावा
झाडांवरती पुन्हा नव्याने / रंग  हिरवा फडकावा

**- डॉ. वीणा सानेकर**
भ्रमणध्वनी : ९८१९३५८४५६
veenasanekar2018@gmail.com

**ग्रंथाली**




# भाषाविचार

**डॉ. दीपक पवार**

**मूल्य १८० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**

आपल्या भाषा लोप पावायला नको असतील तर सर्वांत पहिलं म्हणजे त्यांचं लोप पावणं काय असेल आणि त्याचे परिणाम काय होतील, याचं भान असायला हवं. आपली भाषा मरू न देणं हा आपल्या जीवनधारणेचा भाग कसा होईल यावर विचार आणि कृती व्हायला हवी. अशी कृती किंवा असं बंड ज्या भाषेत रोजच्या रोज घडतं त्याच भाषा जगतात आणि इतर भाषा मात्र धोरणलकव्याने गलितगात्र होऊन जातात. धोरणलकवा हे भाषेच्या मृत्यूकडे तत्परतेनं टाकलेलं पहिलं पाऊल आहे असं म्हणायला हरकत नाही.

# सल शिक्षणाचा

**सूर्यकांत कुलकर्णी**




**मूल्य १८० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**

समाजातील कोणी एक-दोन टक्के छान शिकत असतील म्हणून ती शिक्षणपद्धत चांगली असे म्हणता येणार नाही. समाजाला गरज असलेली, व्यावहारिक रीत्या उत्तम शिक्षणपद्धत स्वीकारली जायला हवी. राज्याचा चेहरामोहरा बदलणारे शिक्षण हवे. राज्याला नवी दिशा देणारे शिक्षण हवे. राज्याचा शिक्षण विभाग असा राज्याला पुढे नेणारा- जादू करणारा असावा.

**- सूर्यकांत कुलकर्णी**

# बालसाहित्यापुढील आव्हाने व उपाय

आश्लेषा महाजन

आजच्या मराठी बालसाहित्यापुढे अनेक आव्हाने आहेत. ती जशी लेखकांपुढे आहेत, तशीच प्रकाशकांपुढे, ग्रंथविक्रेत्यांपुढे आहेत. पालकांपुढे आणि शिक्षकांपुढेही आहेत. मुले वाचत नाहीत, वाचनसंस्कृती लोप पावतेय असे चित्र दिसते आहे. वास्तविक आज आपल्या तोंडी असलेली वा मुद्रित माध्यमांतून भेटणारी आपली भाषा काळाची घुसळण करून आपल्यापर्यंत पोहोचली आहे. तिचा प्रवास कसा झाला असेल? आधी हातवारे व देहबोलीचा मूकाभिनय, मग चित्रे-खुणा-प्रतीके-संकेत, मग विशिष्ट ध्वनीसह भावदर्शन, मग मोडकी-तोडकी बोली किंवा वाणी, कालांतराने बोलीला नियमबद्ध करणारी भाषा, त्या भाषेला चित्रात गोठवून स्मरणदान देणारी चित्रलिपी, त्यानंतर अक्षर-स्वर-व्यंजनांनी नियमित केलेली लिपी व तिचे सार्वत्रिकीकरण, मग पाषाण-धातू-भूर्जपत्रांवर लेखन, त्याच वेळी समांतरपणे व्याकरणाचे बांधीव कोंदण घातलेली प्रमाणित भाषा! आज आपल्याला फुकट मिळालेल्या, कुठला महागडा क्लास न लावता आईकडून वरदान मिळालेल्या ह्या भाषेकडे आपण व आपली मुले किती गांभीर्याने बघत आहेत? आपली मातृभाषा आपल्याला फुकट मिळालेली असते, म्हणून की काय त्याची किंमत नसते अनेकांना. जर्मन वा जापनीज वा रशियन भाषा महागडा क्लास लावून, दाम मोजून शिकवली जाते. त्यातील व्याकरणाचे नियम, लेखन-पद्धती-उच्चार विचित्र वाटले तरी लक्षात ठेवून त्यांचा अंगीकार केला जातो नि गुण मिळवले जातात कारण त्या भाषा परदेशगमनाची व अर्थार्जनाची दारे उघडून देतात. आपल्या भाषेत मात्र 'श' आणि 'ष' ची गरजच काय? ऱ्हस्व नि दीर्घची नसती भानगडच कशाला? असे प्रश्न विचारून 'मराठी कशी बोअर आहे' हे सिद्ध करण्याचा प्रयत्न होतो. एकूणच मराठीला 'कॅज्युअल' घेण्याची वृत्ती दिसते. वास्तविक मातृभाषा उत्तम असेल, तरच अन्य भाषा उत्तमप्रकारे शिकता येतात, भाषांचा तौलनिक अभ्यास नीट होतो. आज मराठी भाषा सुद्धा अर्थार्जनाची व परदेशगमनाची दारे उघडून देणारी भाषा झालेली आहे. अनेक मराठी वक्ते, भाषातज्ज्ञ, लेखक, कवी, अनुवादक, गायक, नृत्यकलाकार, अभिनेते इत्यादींना परदेशात मागणी आहे. आपण ह्या गोष्टी मुलांना सांगायला हव्यात. जगातल्या भाषांचा डोलारा पेलण्यापूर्वी मातृभाषेचा पाया भक्कम हवा. भाषा जेव्हा विरळ-पातळ होते, तेव्हा तिच्यासोबत विशिष्ट संस्कृती सुद्धा विरळ-पातळ होते. शब्द, म्हणी, वाक्प्रचार अडगळीत जातात. काळासोबतही काही शब्द लुप्त होतात, काही पुराणवस्तुसंग्रहालयात तग धरतात. धारोष्ण दूध, घंगाळे, ओसरी, कालवड, रांधणे, दिव्याखाली अंधार इत्यादी शब्द, म्हणी कालबाह्य झाले आहेत. भाषिक सुलभीकरणाच्या भानगडीत भाषाही सपक होते. पारिभाषिक शब्द स्वीकारण्याच्या उदार भूमिकेमुळे भाषा समृद्ध होते, नाही असे नाही, पण तो भाषिक संकर भाषेची अभिजातता टिकवू शकेलच याची मात्र खात्री देता येत नाही. वाचन ही तर फार पुढची पायरी!

> दूरदर्शन व समस्त दृक्-श्राव्य माध्यमे यांचा जबरदस्त पगडा मुलांनाच काय पण मोठ्यांनाही वाचनापासून दूर नेत आहे. त्या छोट्या पडद्याचे गारूड इतके दिलखेचक आहे, की त्यापुढे स्वत:ची कल्पनाशक्ती लढवून काही सर्जनशील करण्याची शक्यताच मावळते.

मुलांना साधे सरळ बोलता येत नाही, प्रमाण भाषेत लिहिता येत नाही. ह्याचे त्यांना वैषम्यही वाटत नाही. 'भा.पो.ना?' (भावना पोचल्या ना?) असे विचारून त्या धेडगुजऱ्या भाषेची बोळवण केली जाते. आदिम काळात गुहेतील भिंतीवर आदिमानव भावदर्शन करण्यासाठी वेडीवाकडी चित्रे, मुखवटे काढत असे. आजही स्मार्ट फोनच्या व्हर्च्युअल गुहेच्या भिंतीवर (वॉलवर!) आपण चित्रविचित्र 'इमोजीज' तसेच अन्य तयार चित्रे वापरून भाषेचा संकोच करत आहोत का? आपण भाषेला आक्रसून टाकत, चित्रलिपीकडे काळाच्या उलट्या दिशेने जात आहोत का? तंत्रज्ञानाचा विपर्यास करत आहोत का?


अशा परिस्थितीत ज्या उमलत्या पिढीच्या हातात बाल-कुमार साहित्याची, मराठी भाषेची पालखी द्यायची त्यांच्या जगण्यात वाचन-छंदाचे स्थान काय आहे, याचा शोध घेणे, त्यातून बोध घेणे, भाषाभिवृद्धीसाठी पर्याय शोधणे महत्त्वाचे आहे. त्यातील काही कारणांचा आपण धांडोळा घेऊ.












**बदलता ग्लोबल काळ**

आजच्या गतिमान जीवनशैलीतील अग्रक्रमांमध्ये सर्व वयोगटातील लोकांचे वाचन खूपच कमी झालेले आहे. 'आनंददायी शिक्षण', 'क्षमताधिष्ठित अभ्यासक्रम' ह्या योजनांमध्ये चित्रे, वस्तू जोडणे, चिकटकाम, तक्ता पाहणे, 'क्ले'ची कला, वस्तू बनवणे, प्रोजेक्टरवर फिल्म्स पाहणे, खेळणे इत्यादी असल्याने त्यात भाषेचा (लेखन, वाचन) सहभाग कमी असतो. पुढे स्पर्धा, शिक्षण, करिअर, पैसा, यश ह्या ऐहिक अग्रक्रमांच्या पायऱ्यांवरून चढण्याच्या धांदलीमध्ये निवांतपणे वाचनसमाधी लागण्याचे प्रसंग विरळाच. शहरातल्या चकचकीत फ्लॅटमध्ये पुस्तकांसाठी जागा नसते. ''तुम्ही काय वाचता?'' असे विचारल्यावर ''रोजचे वर्तमानपत्र वाचायला वेळ मिळाला तरी खूप झाले.'' असे उत्तर मिळते. वर्तमानपत्र हे काही वाङ्मय नाही, याचा त्यांना गंध असतो की नाही, कोण जाणे! नोकरी करणारे आईवडिल आठ-दहा तास बाहेर असतात. दमून आल्यावर पुस्तक वाचनाची आस व फुरसत कुठून आणायची? अनेक घरांमध्ये पुस्तकांना 'पसारा' किंवा 'रद्दी' अशी उपमा दिली जाते. अथवा सामाजिक प्रतिष्ठा म्हणून काही मोजकी क्लासिक वगैरे पुस्तके शोकेसमध्ये ठेवलेली दिसतात. ती पुस्तके वाचलेली असतातच, असे नाही. पुस्तकांबद्दल सापत्नभाव बाळगणाऱ्या अशा घरातील मुले तरी कशी नि काय वाचणार? पुस्तके म्हणजे केवळ पाठ्यपुस्तके, असा अनेकांचा समज असतो. मुलांनी केवळ पाठ्यपुस्तके वाचावीत, नव्हे त्यांची पारायणे करावीत, अशी पालकांची अपेक्षा असते. अवांतर वाचन, बालकुमार साहित्य, बालकुमार मासिके इत्यादी गोष्टी मुलांच्या भाषिक विकासासाठी व व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक असतात. पुस्तके विकत घेऊन वा ग्रंथालयातून आणून वाचणे हा संस्कार पालकांनी करायचा असतो. अपवाद वगळता 'वेळच मिळत नाही.' ह्या पालुपदाने बहुसंख्यांचे दिवस सुरू होतात. वास्तविक दिवसाला चोवीसच तास असतात आणि त्यातच 'वाचन-छंद' वा कुठलाही छंद बसवायचा/फुलवायचा असतो, हा मूल्यवर्धनाचा व जगण्याला कलात्मक आयाम देण्याचा मूलमंत्र आहे.

**शिक्षणाचे माध्यम**

गेल्या तीस-चाळीस वर्षांपासून इंग्लिश मिडियमचे, सेमी इंग्लिश शाळांचे प्रस्थ वाढले आहे. इंग्लिश ही ज्ञानभाषा आहे, तंत्रज्ञानाची व एकूणच जगाची भाषा आहे, ती रोजीरोटी देणारी, माणसाला स्मार्ट करणारी भाषा आहे, असे म्हटले जाते, पण मातृभाषेचा गळा घोटून ह्या ज्ञानभाषेची झूल पांघरण्याची आवश्यकता नाही. प्राथमिक शिक्षण मातृभाषेतच द्यायला हवे, असे सगळे भाषातज्ज्ञ, मानसतज्ज्ञ सांगतात. तरीही न्यूनगंडाच्या भीतीतून अथवा जगाच्या मागे पडू ह्या भयातून इंग्लिश शाळाच पालक पसंत करतात. घरात, व्यवहारात मराठी आणि शाळेत इंग्लिश अशा कात्रीत अडकलेला बहुसंख्य मुलांचा मेंदू दोन्ही भाषा 'साधारण'पणे आत्मसात करतो. अशा परिस्थितीत धड ना इंग्लिश, धड ना मराठी झाल्याने कुठल्याच भाषेतील पुस्तके त्यांना वाचावीशी वाटत नाहीत. बहुधा त्यांचा भाषिक गोंधळ होतो. फार मोजकी मुले अशाही परिस्थितीत अवांतर पुस्तके वाचतात.

याचा अर्थ असा मुळीच नाही की मराठी माध्यमातील सगळी मुले भरपूर पुस्तके वाचतात किंवा त्यांची मातृभाषेविषयीची जाण चांगली असते. मराठी माध्यमातील खूपशा मुलांनाही मराठी धड बोलता येत नाही, व्यवस्थित लिहिता येत नाही. सोशल मिडियाने व त्यातील तांत्रिक व इंग्लिश भाषेने त्यांनाही ग्रासलेले आहे. तेही मराठीला 'गंभीरपणे' घेत नाहीत, असे दिसते.

याचा अर्थ इंग्रजी माध्यम हे मराठीच्या ऱ्हासाचे एकमेव कारण नसून अन्य अनेक 'लोकल ते ग्लोबल' कारणांमुळे आपली भाषा विरळ-पातळ होत आहे. खूपदा असे दिसते की प्रश्न शिक्षण-माध्यमांचा नसून एकूणच भाषेला 'कॅज्युअल' (हाही इंग्लिश शब्द!) घेण्याचा आहे!

**दृक्‌श्राव्य माध्यमांचा पगडा**

दूरदर्शन व समस्त दृक्-श्राव्य माध्यमे यांचा जबरदस्त पगडा मुलांनाच काय पण मोठ्यांनाही वाचनापासून दूर नेत आहे. त्या छोट्या पडद्याचे गारूड इतके दिलखेचक आहे, की त्यापुढे स्वत:ची कल्पनाशक्ती लढवून काही सर्जनशील करण्याची शक्यताच मावळते. ह्या माध्यमाचे फायदे आहेत, नाही असे नाही, पण त्याचाही अतिरेक झाला तर मात्र तोटाच तोटा! टी.व्ही. पाहत लोळत बसणे म्हणजे निर्मितीशून्य आनंद उपभोगणे. एकाने लिहिलेली कथा, दुसऱ्याने












संवाद लिहिले, तिसऱ्याने दिग्दर्शित केली, त्यात काहींनी अभिनय केला, अमक्याने संगीत दिले, तमक्याने एडिट केले इत्यादी. यात प्रेक्षक फक्त ही रेडिमेड करमणूक 'पाहतो'. ह्या पाहण्यात पुस्तक वाचणे येतच नाही. गोष्ट 'पाहिली' जाते, गाणे सुद्धा 'पाहिले' जाते. एकूणच ह्या माध्यमाच्या मोहिनीत वाचायचे शब्द वाचले नाहीत, असे गंमतीने म्हणता येईल. ''अरे, वर्तमानपत्रातला हा अग्रलेख वाच..'' असे म्हटल्यावर त्याचे शीर्षक पाहून ''हे तर मी काल रात्रीच 'पाहिले' न्यूजमध्ये.'' असे उत्तर मिळते. सनसनाटी ब्रेकिंग न्यूज आणि चिकित्सक, विवेकी व समतोल विचार मांडणारा अग्रलेख एकाच तराजूत तोलून कसे चालेल?

कुठल्याही गोष्टीचे तोटे समोर आले तर त्यापासून आपल्याला परावृत्त करण्यासाठी पर्याय शोधावे लागतात. ते पर्यायही आकर्षक असावे लागतात. टी.व्ही.ला पर्याय कोणता? काही काळ टी.व्ही. बंद करण्यासाठी उपाय सुचवते आहे. (अर्थात हे उपाय मोठ्या सुट्टीत उपयोगाचे आहेत.) एखादे पुस्तक घरातील मोठ्या व्यक्तींनी 'अभिवाचनासारखे' वा नाट्यमय पद्धतीने वाचून दाखवणे. अगदी रेडिओवरल्या श्रुतिकेसारखे. एखादे हस्तलिखित किंवा कॉम्प्युटरवर ई-अंक तयार करण्यास मुलांना सांगता येईल. गंभीर व अवघड-वैचारिक पुस्तकांऐवजी मुलांना चित्रमय गोष्टीची पुस्तके, कॉमिक्स आवडतात. मुलांच्या वयानुसार, आवडीनुसार आणि आकलनानुसार पुस्तक निवडायला हवे. एखाद्या पुस्तकाचे मुलांकडून सामुदायिक व क्रमश: वाचन करवून घेणे. घरातील वा शेजारील मुलांना जमवून पुस्तकातील चार पाने एकाने वाचायची, पुढची चार पाने दुसऱ्या मुलाने असे वाचून मग त्यावर चर्चा करायची. गोष्टीत पुढे काय घडू शकेल, यावर अंदाज बांधणे. मुलांना कथापूर्ती करायला सांगणे. एखाद्या कथेचे बीज घेऊन पथनाट्य करणे. इत्यादी. शब्दांचा रियाज करण्याचा उपक्रमही घेता येतो. एखादा शब्द (मराठी वा इंग्लिश वा संस्कृत वा अन्य भाषिक) शब्दकोशातून शोधल्यास अमुक गुण. अमुक गुण मिळवले तर अमुक बक्षिस याच पद्धतीने 'ट्रेझर' खेळ खेळणे. अमुक अक्षर आले की त्या अक्षराच्या लेखकाची गोष्ट वाचायची किंवा चिठ्ठीत आलेल्या शब्दावरून पुस्तक शोधायचे व वाचायचे.

समाजमाध्यमांचा सुकाळ - टी.व्ही., संगणक आणि मोबाईल या तिघांचे पडदे (स्क्रीन्स) आपल्या आयुष्याला व्यापून उरले आहेत. त्यातही टी.व्ही.चे अप्रूप बरीच वर्षे टिकले. साधारण १९७२ साली दूरचित्रवाणी अस्तित्त्वात आली. पुढे १०८० च्या दशकात संगणकाने भारतात पाय पसरण्यास सुरुवात केली. सरकारी दूरदर्शन अपुरे म्हणून की काय, मग आली केबल संस्कृती नि असंख्य चॅनेल्सचे जाळे. मनोरंजनाचा व माहितीचा विस्फोट. सुरुवातीला टी.व्ही. सेटप्रमाणे संगणक घरोघरी अवतरला नव्हता. संगणक मोठ्या कंपन्यांत, बँकांमध्ये, कार्यालयांमध्ये स्थिरावले. इंटरनेटमार्फत माहितीची देवाणघेवाण करण्याची निकड वाढली आणि इंटरनेट कॅफे अस्तित्त्वात आले. हळूहळू गरजेनुसार संगणक श्रीमंतांच्या व मध्यमवर्गीयांच्या घराघरात घुसले. साधारण २००० च्या आसपास श्रीमंताच्या हातात मोबाईल्स आले आणि तीन पडद्यांनी एकत्रित धुमाकूळ घालण्यास सुरुवात झाली. आबालवृद्धांना ह्या तीन पडद्यांनी आपल्या कह्यात घेतले. डिजिटल पिढी तर ह्या पडद्यांकडे बघतच जन्माला आली. हल्लीची मुले टेक्नोसॅव्ही असतात. फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम, मेसेंजर, व्हॉट्सॲप, इ-बुक्स इ. सारे ती सहज हाताळू लागली, त्यावरील मजकूर वाचू लागली नि भांबावलेल्या पालकांचीच 'गुरू' झाली.

समाजमाध्यमांवर कविता, सुविचार, गंमती, माहिती, लघुकथा, लेख यांचा धबधबा कोसळत असतो. त्याचे व्यसन लागते. त्यांचे वाचन करण्यात व पोस्ट्सना उत्तरे देण्यातच खूपसा वेळ मोडतो. घरात, उद्यानात, बसस्टॉपवर, रेल्वेत, ऑफिसमध्ये, हॉटेलात सर्वत्र आबालवृद्ध मोबाईलमध्ये डोके खुपसून काहीबाही वाचत असतात, बघत असतात, 'पोस्टत'/ 'फॉर्वर्डत' असतात! ह्या साऱ्या भानगडीत पुस्तके वाचण्याचा पर्याय विरळ-पातळच होत गेला. माझा मुलगा सात-आठ वर्षांचा होता तेव्हा म्हणाला होता, ''मला ए टू झेड आणि 'अ ते ज्ञ'पर्यंत लिहिता वाचता येते. १ ते १०० अंक येतात. बेरीज-वजाबाकी-गुणाकार-भागाकार येतो. मला कुठली माहिती हवी असेल तर कॉम्प्युटर आहेच ना! आता मला वाटते की मी कुठलेही पुस्तक वाचायची आवश्यकता नाही, म्हणून माझे शिक्षण थांबवावे, माझी शाळा बंद कर.'' माहिती-तंत्रज्ञानाने अशी भानगड करून ठेवली! आठव्या वर्षी आपण सर्वज्ञ असल्याचा साक्षात्कार जर मुलांना होत असेल, तर शाळा-महाविद्यालयांचे नि विद्यापीठांचे काही खरे नाही.

**बालसुलभ, मजेदार पुस्तकांची मागणी**

काळ बदललाय, कुटुंब आक्रसलेय, नातेसंबंध पातळ

झालेत, मूल्यव्यवस्थेचा साचा बदलतोय, समाजव्यवस्था कात टाकतेय, शाळा नि शैक्षणिक धोरणे लवचीक झालीत, शिक्षक बदललेत नि एकूणच अवघे पर्यावरण ग्लोबल झाले आहे. ह्या साऱ्या कायापालटात मुलांची पुस्तके कालसुसंगत झालीत का? उपदेशपर शिकवण देणाऱ्या, तात्पर्य सांगणाऱ्या, आदर्शवादी बोधामृत पाजणाऱ्यांपासून बाल-कुमार साहित्य मुक्त झालेय का? कारण मुलांना उपदेश केलेला आवडत नाही. (खरंतर कुणालाच आवडत नाही!) संदेश असावा, पण तो 'नकळत' मिसळलेला. अशी नवी, ताजी पुस्तके लिहिली जातात का? ती बालकेंद्री/बालानुकूल आहेत? ती मोठ्या अक्षरातील व चित्रमय आहेत का? त्यातील विषय त्यांच्या भावविश्वाशी समरस होताहेत का? विषय वैविध्यपूर्ण आणि मानसिक/भावनिक प्रगती करणारे आहेत का? मुलांना ती वाचावीशी वाटताहेत का? हा सारा अभ्यासाचा विषय आहे. वयस्कर वा प्रौढ लेखक त्यांच्या बालपणाचे स्मरणरंजन करून आजच्या मुलांसाठी गोष्ट लिहीत असतील, तर ती गोष्ट मुलांना आपली वाटत नाही. उपदेशपर, आदर्शवादी, जड भाषेतील लेखन मुलांना 'बोअर' होते. नव्या पिढीतील मुलांना आकर्षित करणारी पुस्तके बाजारात आणणे हे लेखक व प्रकाशक या दोघांसाठीही आव्हान आहे. खास मुलांची अनवट भाषा, मुलांच्या पातळीवरले शेलके विनोद, मुलांच्या भावविश्वातील विषय असणारे खास, नवे लेखन व्हायला हवे. धाडस, फजिती, शाळेच्या आठवणी, नाटकातील नाटके, सहलीतील फज्जा, उनाडक्या, सुट्टीतील टाईमपास, स्पर्शाची भाषा, उमलत्या शरीरातील कल्लोळ, मैत्रीतील ताणेबाणे, निसर्गातील जादू, विज्ञानातील अद्‌भुत, स्वप्नांतील गंमत किंवा फँटसीतील रंगतरंग, भावनिक वाढ, मुलांच्या मनातील फोबिया, भय असे कितीतरी विषय मुलांना रुचतील, कळतील अशा रीतीने लिहिणे म्हणजे आराधनाच असते. अशा लेखनाचा पहिला खर्डा मुलांच्या समूहालाच वाचून दाखवावा. तेच उत्तम समीक्षक असतात. मुलांना आवडले तर ते पुस्तक यशस्वी होऊ शकते. काही लेखक जाणीवपूर्वक बालानुकूल लेखन करतात, पण ते मोजकेच आहेत.

**बालानुकूल पुस्तकनिर्मिती**

मुलांच्या पुस्तकांची निर्मिती कशी करावी, ह्याबद्दल प्रकाशकांनी खूपच सजग असायला हवे. मुले अजाण, धसमुसळी असतात, ती पुस्तकाची खेचाखेची करतात. आडदांड मुलांच्या हातातही पुस्तक टिकायला हवे. पुस्तकास हवे आकर्षक मुखपृष्ठ, भक्कम बांधणी, न फाटणारा जाड कागद, मोठा टाईप, मुलांना गंमत वाटेल अशी मांडणी, भरपूर सुरेख-रंगीत चित्रे!

वाचन आनंददायी व इंटरेस्टिंग व्हायला हवे. मुलांनी झोपून, लोळत, झोपाळ्यावर, आरामखुर्चीत, जमिनीवर, जिन्यात, बागेत, गच्चीत, स्वयंपाकघरात कुठेही पुस्तक वाचावे. त्यांना खूप नियम, शिस्त यांत कोंडू नये. पाश्चात्त्य देशात मुलांसाठी खास त्रिमितिक पुस्तके बनवली जातात. पुस्तक उघडताच त्यातून एखादा परी वा विदूषक वा डायनॉसॉर बाहेर येतो. काही पुस्तके उघडली की त्यातून सुगंध येतो. काही पुस्तके अधूनमधून गातात, बोलतात. (त्यात छोटी बॅटरी असते.) काही पुस्तके इतकी दणकट असतात की मुलांनी धोपटली तरी ती फाटत नाहीत. मुले पुस्तकांवर बसतात, उशीसारखी वापरतात, तरी त्यांची बांधणी उसवत नाही. काही पुस्तके वॉटरप्रूफ असतात. आंघोळ करतानाही बाळे हातात पुस्तके घेतात. त्यातील चित्रं इतकी सुंदर असतात की मुलांचे त्यांच्याशी नाते निर्माण होते. मुले त्या पुस्तकांशी, त्यातील पात्रांशी बोलतात, त्यांच्याशी खेळतात. तिकडचे पालक मुलांच्या भावविश्वातील पुस्तकांचे महत्त्व ओळखून असतात. त्यामुळे ते अशा पुस्तकांवर भरपूर खर्चही करतात. अशी बालसुलभ व बालकेंद्री पुस्तकांची निर्मिती आपल्या देशात, महाराष्ट्रात झाली तर? अशी सुंदर पुस्तके मुलांना वाढदिवसाला वा इतर प्रसंगी भेट मिळाली तर? आपल्याकडेही काही प्रकाशक थोडीफार बालसुलभ पुस्तके काढतात, पण त्यांचे प्रमाण अल्प आहे.

बालपणी छान छान पुस्तकांची भेट मिळाली तर कुमारवयात थोडी विचार देणारी पण तरी मजेदार आणि आकर्षक पुस्तके वाचण्याची गोडी लागतेच. बालकुमारांसाठी काही कार्यक्रमांचे आयोजन केले तर ते उपयोगी ठरेल. जसे पुस्तकावर आधारित कोडी सोडवणे, चित्रे काढणे, विविध स्पर्धा, अभिवाचन, नाट्य-सादरीकरण, नाट्य, गायन इत्यादी. बाल-कुमार पुस्तकांच्या आकर्षक जाहिराती करणे, त्यांच्या प्रमोशनसाठी एखाद्या सेलिब्रेटीने वेळ देणे, त्यांच्यावर वृत्तपत्रांतून सविस्तर परीक्षणे येणे याही गोष्टी अत्यावश्यक आहेत.

अशा काही ठोस कामांतूनच वाचनसंस्कृतीचा, भाषेचा, वाणीचा संकोच होण्याचे थांबवता येईल. आपण सर्वांनी प्रयत्न करूया.

**– आश्लेषा महाजन**
भ्रमणध्वनी : ९८६०३८७१२३
ashlesha27mahajan@gmail.com

**जूनच्या 'शब्द रुची' अंकात प्रकाशित झालेला**
**'सुंदर सावळा घवघवीत'**
**हा डॉ. प्रज्ञा पवार यांचा लेख**
**त्यांच्या 'टेहलटिकोरी' या लेखसंग्रहातून**
**घेण्यात आला होता.**
**डॉ. प्रज्ञा पवार यांचा**
**ई-पत्ता पुढीलप्रमाणे :**
pradnyadpawar@gmail.com

# नाटक-जाणिवांचा खेळ : अमृत सामक

शब्दांकन : डॉ. मानसी गानू

लहानपणापासून अभिनयाच्या क्षेत्रात काम करणारे आणि गेली दहा वर्षे दिग्दर्शक म्हणून कार्यरत असणारे अमृत सामक लहान मुलांबरोबर नाट्यप्रशिक्षक म्हणून काम करतात.

"साधारण १९९३ सालची गोष्ट. दत्ता पुराणिक नावाचे नाट्यप्रशिक्षक होते. स्वातंत्र्यसैनिक म्हणून ते निवृत्त झालेले होते. त्यांच्यावर सानेगुरुजींचा मोठा प्रभाव होता. रोजच्या दिनक्रमात ते घरोघरी जाऊन साने गुरुजींच्या 'श्यामची आई' या पुस्तकाविषयी सांगायचे आणि लोकांना ते पुस्तक विकायचे. ज्या दिवशी त्या पुस्तकाची एकही प्रत विकली जायची नाही, त्यादिवशी ते जेवायचे नाहीत. त्यांची आणि माझी भेट एका किराणामालाच्या दुकानात झाली. मी आई-बाबांबरोबर चॉकलेट घेण्यासाठी तिथे थांबलो होतो. दत्ता पुराणिक तिथे होते. त्यांनी सहज मला विचारलं, 'काय रे नाटक वगैरे करतोस का?' मी हो म्हटलं. मला नाटक आवडत होतं. मी अगदी मॉंटेसरीत असल्यापासून नाटकात भाग घ्यायचो. आई-बाबांनाही ते म्हणाले, 'याला पाठवत जा आमच्याकडे.' मी अगदी सहज त्यांच्याकडे जायला लागलो.

अशी हौशी मुलं ते गोळा करायचे. आमच्याकडून एकही रुपया त्यांनी कधी घेतला नाही. उलट तेच आम्हाला बसने फिरायला घेऊन जायचे. आजकाल मुलं रोज संध्याकाळी ग्राउंडवर खेळायला जातात. गाणं, तबला, नृत्य अशा गोष्टी नित्यनियमाने शिकतात तसंच नाटक हीसुद्धा नित्यनियमानं शिकण्याची गोष्ट आहे हे मात्र अजूनही लोकांच्या पचनी पडत नाही. दादांनी (दत्ता पुराणिक) आम्हाला हे शिकवलं. आम्ही सगळी मुलं रोज दोन-अडीच तास भेटायचो. दादांकडे स्वत:चं असं काही नव्हतं. ना जागा, ना पैसे. मग कुठल्यातरी मंदिरात, कधी एखाद्या मोकळ्या जागेत आम्ही जमायचो. नाटक वाचायचो. दादा गोष्ट सांगायचे. 'हे असं करू नको' किंवा 'हे चांगलं करतोस' असं ते म्हणायचे पण विशिष्ट धाटणीचं डिरेक्शन त्यांनी कधीच केलं नाही. ते स्क्रीप्ट पाठ करायला सांगायचे नाहीत. हिरकणी, ज्ञानेश्वर, अकबर-बिरबल अशा गोष्टी सांगायचे आणि गोष्टी सांगायचे आणि इंप्रोवायजेशनच्या द्वारे आमच्या नाटक करून घ्यायचे. त्यामुळे आम्हाला उघड्या डोळ्यांनी नाटकाकडे बघण्याची सवय लागली. दादा आमचा रोलही आम्हालाच ठरवायला सांगायचे. सुरुवातीला आमच्यात भांडण व्हायची, कारण राजाचा रोल करायला कोणालाही आवडतंच. मग दादा मधे पडून सगळ्यांना प्रश्न विचारायचे, 'तुझं काय म्हणणं आहे?' 'त्याला असं का वाटतंय?' मग एखाद्याचं म्हणणं नुसतं चूक किंवा बरोबर न सांगता, त्यामागचं लॉजिक सांगावं लागायचं. मग आम्ही परत विचारात पडायचो. एवढं झाल्यावरही दादा काही ठरवायचेच नाहीत. ते आम्हालाच ठरवावं लागे. आम्हाला हळूहळू कळायला लागलं की, नुसता रोल आवडून उपयोग नाही तर त्याकरता आपलं दिसणं, बोलणं त्या रोलला अनुकूल असेल तरच तो रोल चांगल्या पद्धतीनं करता येईल. या कार्यपद्धतीचा माझ्यावर खोल परिणाम झाला आणि ती दिशा पकडून माझा पुढचा प्रवास सुरू झाला.

बारावीनंतरचं माझं शिक्षण मी एक्सटर्नल पद्धतीनं केलं. त्याचवेळी काही मराठी व्यावसायिक नाटकांमध्ये, माहितीपटांमध्ये काम केलं. २००१ ते २००६ या काळात 'इप्टा'च्या पुणे शाखेमध्ये मी सक्रिय राहिलो आणि संस्थेतर्फे राज्य नाट्य स्पर्धेसह वेगवेगळ्या एकांकिका स्पर्धेत काम केलं. यादरम्यान 'आयसीआयसीआय बँके'च्या व्हेंचर कंपनीत नोकरी चालू होती पण नाटकाला वेळ देता येत नव्हता म्हणून सोडली. त्यानंतर मुंबईत जाऊन अभिनयाचं काम मिळवण्याचा प्रयत्नही झाला. ए.के. हंगल यांच्या कानटोचणीने पुन्हा पुण्यात आलो. मग इप्टाच्या पुणे शाखेची पुनर्स्थापना, त्या माध्यमातून विविध एकांकिका, दोन अंकी नाटके, माहितीपट, पथनाट्य स्पर्धांचे आयोजन, 'नाटकाची शाळा' या संकल्पनेची रुजवात अशा विविध गोष्टी केल्या. गेल्या काही वर्षांत 'सिंबायोसिस इंटरनॅशनल स्कूल' येथे 'प्रायमरी इयर प्रोग्रॅम'साठी नाट्यप्रशिक्षक आणि स्पोकन मराठी प्रशिक्षक, इंटरनॅशनल असोसिएशन फॉर परफॉर्मिंग आर्ट्स अँड रिसर्च (IAPAR) या संस्थेच्या 'आनंदरंग' या लहान मुलांच्या उपक्रमात नाट्यप्रशिक्षक, 'आयपार'च्या माध्यमातून विखे-पाटील मेमोरियल स्कूल, पुणे येथे चौथी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी नाट्यप्रशिक्षक, ज्ञानप्रबोधिनी प्रशाला



अमृत सामक



कार्यशाळेत रमलेली मुलं

येथे लेखन अभिव्यक्ती शिक्षक म्हणून कार्यरत आहे. याशिवाय 'रंगभाषा' या संस्थेची स्थापना केली. 'महाराष्ट्र कल्चरल सेंटर' या संस्थेसाठी बालनाट्याचे लेखन व दिग्दर्शन केले आणि आपटे मूकबधिर विद्यालय, एकलव्य ट्रस्ट, सर्जनशील पालक समूह यांच्यासाठी नाट्यकार्यशाळा घेतल्या. मुलांबरोबर काम करताना विविधरंगी अनुभव आले.

मुळात नाटक हा जाणिवांचा खेळ आहे. प्रत्येक माणूस जन्मजात नाटक करण्यात पटाईत असतो. तो सराईतपणे खोटं बोलतो, एखाद्याला कटवतो, आपण कामात असल्याचं भासवतो, तरीही चांगला कलाकार व्हायचं असेल तर नाटकाचं प्रशिक्षणच घ्यावं लागतं कारण व्यवहारातले आविर्भाव हे मनाप्रमाणे चेहऱ्यावर उमटतात, पण स्टेजवरच्या नाटकात तेच भाव विशिष्ट वेळेला, विशिष्ट परिस्थितीत, विशिष्ट वाक्यानंतर, आवश्यक तेवढेच दाखवावे लागतात. हे सगळं प्रेक्षकांना खरं वाटेल असं करावं लागतं. त्यामुळे अभिनय वाटतो तितका सोपा नाही.

मुलांना लहानपणापासून कलाशिक्षण देणं आवश्यक आहे. संगीत, चित्र, वादन, नृत्य शिल्प अशी कोणतीही कला माणसाला त्याच्या खुजेपणाची जाणीव देते आणि 'स्व'चा शोध घ्यायला भाग पाडते. कला समतोल साधायला शिकवते. तरीही कलाप्रशिक्षण ही जादूची कांडी नव्हे. समाजात वेगवेगळ्या प्रकारचे लोक असतात. त्यांच्याशी कसं वागायचं हे ठरवावं लागतं. जगण्यासाठीचं हे भांडवल तयार करण्याचं काम कलाप्रशिक्षण करतं.

नाटक ही तर जाणिवा समृद्ध करणारी प्रक्रिया आहे. नाटक आणि त्यासंबंधीचे खेळ खेळताना मुलांना फार मजा येते. मुलं खणखणीत बोलायला शिकतात. त्यांचं स्टेज डेअरिंग वाढतं. ठरावीक वयात मुला-मुलींमध्ये काही आकस तयार होतात. त्यातून मग संकोचणं, टाळणं, राग करणं, कमी बोलणं अशा गोष्टी त्यांच्यात सुरू होतात. नाटक करताना ती एकमेकांशी मोकळेपणाने बोलायला लागतात. एकमेकांना टाळण्यापेक्षा सामोरे जाऊनच या आकसांमधून बाहेर पडता येईल, हे त्यांना समजतं. कधी त्या पात्रांबद्दल आदर निर्माण होतो. त्यांची छान मैत्री होते ती टीमवर्क शिकतात. प्रश्न विचारले की एखाद्या गोष्टीची उकल विस्ताराने होते हे लक्षात आल्यावर मुलं प्रश्न विचारायला शिकतात. नाटक का आवडलं? त्यातलं काय आवडलं नाही याविषयी चर्चा करतात. मुख्यत: दुसऱ्याचं संपूर्णपणे ऐकून घ्यायला शिकतात. बाहेर जाऊन वेगवेगळी नाटकं बघायला प्रवृत्त होतात. त्यांच्यातल्या गुणांची जाणीव करून देणं हा नाट्यप्रशिक्षणाचा हेतू असतो. मुलांना उपदेश करायला लागलं तर ती मनाची दारं बंद करून घेतात. रागावून सांगितलं तर दुरावतात. त्यामुळे नाटकाद्वारे काही दाखवलं तर सुरुवातीला हिरो-व्हिलन असा भेद करत असले तरी नकळत त्यांच्या कृत्याबद्दल विचार करायला लागतात. त्यामुळे मुलांना आपण काही सांगण्यापेक्षा किंवा फोर्स करण्यापेक्षा त्यांचं त्यांना जाणवलं तर ते दीर्घकाळ टिकतं. नाट्यप्रशिक्षणाचे असे बायप्रॉडक्ट्स खूप आहेत.

'ज्ञानप्रबोधिनी'मध्ये एकदा सर्जनशील लेखन कार्यशाळा घेत होतो. मूळ कविता, गाणी, गोष्टी, निबंध, पत्र, चारोळ्या असे अनेक प्रकार लिहून बघत होती. सातवी ते दहावीच्या मुलांनी एकदा 'राजकारण' हा विषय निवडला. शेतकरी संप, भ्रष्टाचार अशा विषयांवर लिहिलं, पण त्या लेखनात आपलेपणा नव्हता. मग त्यांच्या भावविश्वाशी निगडित गोष्टी लिहायला सांगितल्या. एका मुलाला खाण्याची खूप आवड होती. परंतु त्याविषयी लिहायला तो संकोचत होता. त्याला प्रोत्साहन दिल्यावर त्याने 'वडापाव' या विषयावर इतकी छान कविता लिहिली की शाळेच्या वार्षिकांकात ती छापून आली. मग मुलांनी 'शाळा सुटल्यानंतरचा पाऊस', 'रणांगणावर लढणारे शिवाजी महाराज' असे विषय घेऊन लिहिलं. कधी-कधी आवडलेल्या गोष्टीच मुलं पुन्हा-पुन्हा वाचतात. उदा. हॅरी पॉटर. पण सर्व प्रकारची पुस्तकं वाचून पाहा मग आवड-नावड ठरवा, असं आम्ही सांगतो. वेगवेगळ्या गोष्टी वाचून दाखवतो. वेगवेगळ्या क्षेत्रांतील माणसांना भेटवतो. मुलं त्यांना प्रश्न विचारतात. मी म्हणतो, ''चुका करा पण त्याच-त्याच चुका परत करू नका.

म्हणजे एक काळ असा येईल की चुका उरणार नाहीत इतकं चांगलं काम होईल आणि एखाद्या मुलाने नाटक करायला आवडत नाही असं सांगितलं तरी ते स्वीकारायला नाट्यप्रशिक्षक म्हणून मी तयार असलं पाहिजे. एखाद्या कलेविषयी मुलाच्या मनात निगेटिव्हिटी तयार न होणं महत्त्वाचं. त्याला नाटक नाही तर दुसरं काय आवडतं हे शोधणं पालक म्हणून आपलं काम आहे.

एकदा लेखनविषयक काम करताना, इयत्ता नववीचा एक विद्यार्थी होता. तो प्रत्येक तासाला लिहिण्याचा कंटाळा करायचा. टाळाटाळ करायचा. वेगवेगळ्या प्रकारे सांगून बघितलं, पण त्याला काहीच सुचायचं नाही. तो लेखनकौशल्यात किती पारंगत आहे? त्याला काय लिहायला आवडतं? हे न कळल्यामुळे मी अस्वस्थ होतो. तरी त्याचं गुणनिदान करण्यासाठी ते कळणं आवश्यक होतं. एकदा कल्पनाशक्तीचा एक खेळ घेतला. सगळ्यांना डोळे बंद करायला सांगितले. पंधरा मिनिटं मी बोलत राहिलो. नंतर डोळे उघडायला सांगितले. मी बोलत असताना त्यांच्या डोळ्यांसमोर जे आलं ते त्यांना लिहायला सांगितलं. कधी नव्हे ते त्या मुलाने एक वाक्य लिहिलं.

"It was really beautiful...not the scene but the experience." आम्ही सगळे अवाक् झालो. सगळ्या मुलांनी त्याचं कौतुक केलं. तो मुलगा रोज लिहीत नव्हता तरी मी रोज जे बोलत होतो, ते कुठे ना कुठे त्याच्या डोक्यात नोंदवलं जात होतं. मला पुन्हा जाणीव झाली की, आपण ज्या प्रकारचे विषय शिकवतो त्यामध्ये फक्त गुण नोंदवणारा शिक्षकी बाणा आपण सतत बाळगता कामा नये, तर त्यापलीकडे जाऊन आपले कर्तव्य नेटाने बजावत संयमसुद्धा ठेवता आला पाहिजे.

कॉर्पोरेशनच्या शाळेत एकदा नाटक बसवण्यासाठी गेलो होतो. सहज कुणाकुणाला काय येतंय याचा अंदाज घेण्यासाठी ऑडिशन घेतली. तर एक मुलगी 'मला आवडत नाही नाटक करायला' असं सांगून निघून गेली. आम्ही नाटक बसवायला लागलो. काही दिवसांनी नाटकात एखादं गाणं किंवा कविता ॲड करता येते का याचा विचार करत होतो. एक मुलगा म्हणाला, ''आमच्या शाळेत एक मुलगी आहे. ती कविता करते.'' पहिल्या दिवशी निघून गेलेली मुलगी तीच होती. आम्ही तिला बोलावलं. ती दहा मिनिटात कविता करायची, तीही चालीसकट. आम्ही तिला शब्द दिले तिने लगेच कविता केल्या. तिचा हा गुण वाढविण्यासाठी तशा पोषक वातावरणाची गरज होती पण तिचे आई-वडील बांधकामावर मजूर होते. त्यामुळे अशा मुलांपर्यंत कलाशिक्षण पोचवणं गरजेचं आहे कारण मुलांची वाढ जरी वेगवेगळ्या कुटुंबात, वेगवेगळ्या सांस्कृतिक, सामाजिक परिस्थितीत होत असली तरी बुद्धिमत्तेच्या दृष्टीने फारसा फरक नसतो हे माझ्या लक्षात आलं.

एकदा एक छोटी सहा वर्षांची मुलगी आमच्या शिबिरात येऊन बसायची. नुसती बघायची. आई-वडील म्हणायचे, 'ती अबोलच आहे.' पाच-सहा दिवसांनी ती माझ्याकडे आली. म्हणाली, 'मलापण नाटकात काम करायचंय. मी म्हटलं, 'हो. पण त्यासाठी बोलावं लागतं.' ती म्हणाली, 'मी बोलेन.' लहान मुलांच्या व्यक्त होण्याची वाट बघावी लागते.

'एकलव्य ट्रस्ट' जो वेश्याव्यवसायातील महिलांच्या मुलांसाठी काम करतो, त्यांच्यासाठी नाटक बसवायचं होतं. ही मुलं खूप आक्रमक होती. त्यांच्यातील ऊर्जेला दिशा देणं आवश्यक होतं. मी त्यांना 'आनंद' हा विषय देऊन जे सुचेल त्यावर नाटक बसवायला सांगितलं. काही मुलांनी कॉपी करायला मिळाल्यामुळे झालेल्या आनंदावर नाटक बसवलं. आधी सादरीकरण झालं. मग चर्चा झाली. तेव्हा मी विचारलं, ''कॉपी करून कसा आनंद झाला?'' तेव्हा मुलांनी उत्तर दिलं. ''एखादा विषय समजला नसेल किंवा अभ्यास झाला नसेल तरी शाळेत पास व्हावंच लागतं ना? त्यामुळे कॉपी करून पकडलो गेलो नाही याचा आनंदच वाटतो.'' मग मी त्यांना आणखी प्रश्न विचारले. ''तुम्हाला पुढे जाऊन तोच प्रश्न कधी कुणी विचारला तर तुम्हाला त्याचं उत्तर येईल का? त्यापेक्षा आत्ताच अभ्यास करायचा.'' काही मुलं म्हणाली, ''आम्हाला वर्गात समजलं नाही तर आम्ही शिक्षकांना विचारतो.'' मी असंही सांगितलं की, ''कॉपी करणं चांगली गोष्ट आहे पण कॉपी चांगल्या गोष्टींची करावी.'' मी ट्रस्टच्या संचालिका रेणुताई गावस्करांचं उदाहरण दिलं. ''त्या तुमच्यासाठी काम करतात. तुम्हाला चांगल्या सेवा मिळाव्यात म्हणून प्रयत्न करतात मग तुम्ही असं कोणासाठी काम कराल का?'' ''त्या मुलांनी केलेल्या विचाराला विरोध न करता, त्यांचा विचार योग्य की अयोग्य हे ठरवण्यास आम्ही त्यांनाच प्रवृत्त केलं.

नाटक केल्याने मुलं व्यक्त व्हायला शिकतात. थोडी वाट पाहावी लागते. आपल्याही सहनशक्तीचा कस लागतो. दुसऱ्या मुलांचं व्यक्त होणंही ती अनुभवतात, दुसऱ्याच्या भावना पाहायला, समजून घ्यायला, त्यावर विचार करायला प्रवृत्त होतात. चांगला माणूस होण्याकडे अधिक सजगपणे आणि सहजपणे वाटचाल सुरू होते. आजचं जग अधिकाधिक हिंस्त्र, चंगळवादी, धावतं, आपल्यापुरतं पाहाणारं बनत चाललंय. त्यामध्ये मुलांचं भावविश्व जपायचं असेल तर कलाशिक्षण, नाटक शिकणं, पाहाणं, अनुभवणं आणि करत राहाणं हे अत्यावश्यक आहे. शेवटी हा जाणिवांचा खेळ; स्वत:च्या आणि इतरांच्या जाणिवा समृद्ध करत राहील तेव्हाच समृद्ध विश्वाकडे आपली वाटचाल होईल.


**शब्दांकन : डॉ. मानसी गानू**
भ्रमणध्वनी : ९८६०२७२५०६
mansi.ganu1@gmail.com

# अधिवक्ता शांताराम दातार : मायमराठीसाठी समर्पित जीवन

– डॉ. प्रकाश परब

**ज्यां**ना लोक प्रेमाने, आदराने बापू म्हणायचे ते कल्याणचे ज्येष्ठ विधिज्ञ शांताराम दातार यांच्या निधनाने मराठी भाषेच्या चळवळीचे एक पर्व संपले. आता पुढे काय? असा प्रश्न मराठीच्या चळवळीतील कार्यकर्त्यांना पडणे स्वाभाविक आहे. पण दातारांना पर्याय नाही. एखाद्या व्यक्तीने एखाद्या सामाजिक समस्येसाठी देह झिजवणे म्हणजे काय असते हे दातार वकिलांच्या आयुष्याकडे पाहिल्यावर कळते. कोणी सोबत असो, नसो दातारांनी मायमराठीच्या संरक्षणाचे व संवर्धनाचे व्रत आयुष्यभर जपले. 'मायमराठी' हा दातारांचा आवडता शब्द. त्यांच्यासाठी मराठी ही केवळ भाषा नव्हती. त्यांच्या जीविताचे अधिष्ठान व प्रेरणा होती.

भाषाधोरणाचा मसुदा तयार करण्यासाठी दातारांचे मोठे योगदान राहिले आहे. मराठीच्या चळवळीतील त्यांच्या आजवरच्या कामाचा समितीला फार उपयोग झाला हे सल्लागर समितीचा एक सदस्य म्हणून मी जवळून पाहिले आहे. हे भाषाधोरण दातारांच्या हयातीत जाहीर झाले असते तर त्यांना खूप आनंद झाला असता.



शांताराम दातारांचे नाव घेतले की लोकांना न्यायालयीन मराठीची आठवण व्हावी इतके दातार आणि न्यायालयीन मराठी हे समीकरण होते. दातार वकील न्यायालयीन मराठीच्या चळवळीचे अध्वर्यू होते यात शंकाच नाही. आजवर न्यायव्यवहारात मराठी भाषेला जो काही न्याय मिळालेला आहे त्यात त्यांचा मोठा वाटा आहे. दातारांचे शालेय शिक्षण मध्यप्रदेशात झाले. तेही हिंदीतून. पुढे वकिली करण्याच्या हेतूने ते महाराष्ट्रात आले आणि कल्याणला स्थायिक झाले. वकिली व्यवसाय करता-करता ते मराठी भाषेच्या प्रश्नाकडे ओढले गेले. त्यांचे व्यक्तिमत्त्व जनसंघाच्या मुशीत तयार झालेले. पिंड सामाजिक कार्यकर्त्याचा. आणीबाणीत कारावास भोगूनही सक्रिय राजकारणात ते उतरले नाहीत. उजव्या विचारांचा प्रभाव असला तरी धर्माचे राजकारण त्यांना मान्य नव्हते. मराठी भाषा हाच दातारांसाठी परम धर्म होता. तो धर्म मात्र त्यांनी अखेरपर्यंत जपला.

दातारांना जवळून ओळखणाऱ्यांना माहीत होते की दातार व्याधिग्रस्त आहेत. मात्र दातारांना त्याची पर्वा नव्हती.त्यांच्या दृष्टीने मायमराठीची अवहेलना, उपेक्षा करणारा मराठी भाषकच आजारी आहे. त्यांना मराठी भाषकांना व्याधिमुक्त करून मराठी भाषेला सुदृढ करायचे होते. शरीर थकले असताना, प्रकृती साथ देत नसताना वयाच्या पंच्याहत्तरीपर्यंत ते मराठी भाषेची सेवा करीत राहिले. त्यात खंड पडू दिला नाही. तीस-पस्तीस वर्षे मराठीच्या चळवळीत सक्रिय राहिलेली फार थोडी माणसे मराठी समाजात आहेत. मराठीच नव्हे तर सर्वच भारतीय भाषा राजकीय आणि सामाजिक उपेक्षेच्या गर्तेत सापडल्या असताना दातारांचे निधन वेदनादायी आहे. मराठी भाषेपासून अधिकाधिक तुटत चाललेल्या मराठी समाजाला पुन्हा मराठीच्या मार्गावर आणण्यासाठी दातारांचीच गरज आहे.

दातार वकील हे आमच्या आधीच्या पिढीतील. दातार हे मराठी भाषा संरक्षण व विकास ह्या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष. 'मराठी अभ्यास केंद्र' ही व्यापक व शास्त्रीय भूमिका घेऊन मराठीच्या संवर्धनासाठी काम करणारी स्वयंसेवी संस्था आहे. तिच्या माध्यमातून मी आणि वीणा सानेकर दातारांशी अधिक जोडलो गेलो. त्याआधी शांताराम दातार नावाचे कोणी वकील मराठीसाठी एकाकीपणे लढताहेत एवढेच माहीत होते. पुढे जवळीक वाढल्यावर त्यांच्या कामाचा आवाका आणि झपाटा लक्षात आला. त्यांनी स्थापन केलेली 'मराठी भाषा, संरक्षण व विकास संस्था' ही काही फार मोठे संघटन व कार्यकर्त्यांची कुमक असलेली संस्था नव्हती. पण स्वतः दातार हेच हजार कार्यकर्त्यांचे एक मूर्तिमंत संघटन होते. मराठीचे प्रश्न सोडवण्यासाठी मंत्रालयापासून उच्च न्यायालयापर्यंत पत्रव्यवहार करणारे,

मराठीचे वकीलपत्र घेऊन न्यायालयांत याचिका दाखल करणारे, वृत्तपत्रांतून लेख लिहून जनजागृती करणारे, लोकप्रतिनिधींच्या व न्यायाधीशांच्या प्रत्यक्ष गाठीभेटी घेऊन मराठीची कैफियत मांडणारे, कार्यकर्ते जोडण्यासाठी गावोगावी पायपीट करणारे आणि प्रसंगी आपल्या व्यावसायिक हिताकडे दुर्लक्ष करणारे दातार वकील हे एक अजब आणि शक्तिशाली ऊर्जाकेंद्र होते. त्यांच्या कामाचा वेग आणि झपाटा प्रचंड होता. मराठीवर अर्धवट निष्ठा असलेल्यांना दातारांशी जुळवून घेण्यात फार कष्ट पडत. मग ते त्यांची साथ सोडून देत. ते त्यांना पुन्हा कामाला लावत. नवे सहकारी शोधत. महाराष्ट्रात मराठी भाषेसाठी स्वतंत्रपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी दातार हे प्रेरणास्थान होते आणि यापुढेही ते राहील.

दातारांची मराठीवरील निष्ठा आणि तिच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी अहोरात्र काम करण्याची जिद्द व चिकाटी असाधारण होती. मराठीची स्थिती उत्तरोत्तर हताश करणारी असली तरी दातारांनी घेतला वसा टाकला नाही. उलट मराठीसाठी काम करणा-या कार्यकर्त्यांचे मनोबल वाढवत राहिले. पक्षीय विचारधारा बाजूला ठेवून मराठीच्या मुद्द्यावर एकत्र येऊन काम केले पाहिजे हा त्यांचा आग्रह होता. त्यामुळे मराठीच्या प्रश्नावर त्यांच्यासोबत काम करताना कोणाला अडचण वाटली नव्हती.मराठी भाषेसाठी राज्यव्यापी संघटन हे त्यांचे स्वप्न होते. स्वभावाने मृदू असले तरी मराठीसाठी रस्त्यावरची आंदोलने त्यांना वर्ज्य नव्हती. अशा अनेक आंदोलनांचे त्यांनी नेतृत्व केले आणि कार्यकर्ते घडवले. मराठीसाठी केवळ वकीलवर्गातूनच नव्हे तर शिक्षण, पत्रकारिता, उद्योग आदी सर्व व्यवहारक्षेत्रांतून कार्यकर्ते शोधले पाहिजेत आणि मराठीच्या व्यापक चळवळीसाठी संघटित केले पाहिजे अशी त्यांची भूमिका होती.

मराठीच्या चळवळीत काम करणारी जी मंडळी आहे ती बव्हंशी पन्नाशी-साठी ओलांडलेली आहे. मराठीसाठी आयोजित केलेल्या सभासंमेलनांतून हे अनेकदा दिसून आले आहे. तरूणवर्ग ह्या चळवळीत अपवादात्मक आहे. त्याची खंत त्यांना होती. अलीकडे न्यायालयीन मराठीच्या प्रश्नापेक्षा मराठी शाळांच्या प्रश्नाने ते अधिक व्यथित झाले होते. शिक्षणात मराठी राहिली नाही तर मराठी भाषा आणि संस्कृती हद्दपार होईल म्हणून शालेय शिक्षणात मराठी भाषा एक विषय म्हणून अनिवार्य केली जावी हा त्यांचा आग्रह होता. दक्षिणेकडील राज्यांनी ज्याप्रमाणे शिक्षणात आपापल्या राजभाषेच्या सक्तीचा कायदा केला तसा कायदा महाराष्ट्रातही केला जावा यासाठी ते प्रयत्नशील होते. विधिमंडळाच्या येत्या पावसाळी अधिवेशनातच राज्य शासनाने असा कायदा पारित करून ध्यावा यासाठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष श्रीपाद जोशी, साहित्यिक लक्ष्मीकांत देशमुख यांच्याशी त्यांचा चर्चाविनिमय चालू होता. स्वतः वकील असल्याने आणि अन्य राज्यांनी केलेले भाषासक्तीचे कायदे अभ्यासले असल्याने महाराष्ट्रासाठी हा कायदा कसा असावा याचे एक प्रारूपही त्यांनी तयार केले होते. लोकप्रतिनिधींशी पत्रव्यवहार करून आणि राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या प्रत्यक्ष गाठीभेटी घेऊन हे काम तडीस न्यायचे असे त्यांनी ठरवले होते आणि त्यांच्या अखेरच्या दिवसांत त्याची आखणी करण्यातच ते व्यस्त होते.

सर्व व्यवहारक्षेत्रांत मराठी भाषेचा आग्रह धरणाऱ्यांना संकुचित, प्रतिगामी म्हणून हिणवणारे आपल्या समाजात खूप लोक आहेत. दातार त्यांच्याकडे लक्ष देत नसत कारण त्यांची मराठी भाषाविषयक भूमिका केवळ भावनिक व अस्मितामूलक नव्हती. तिला अभ्यासाची जोड होती. माझा भाषाविज्ञानाचा थोडा अभ्यास आहे हे कळल्यावर त्यांनी भाषेच्या विकासाबाबत शास्त्रीय दृष्टिकोण काय आहे, अन्य देशांमध्ये भाषेचे प्रश्न कसे सोडवले जातात, भाषेचे नियोजन म्हणजे काय हे समजून घेण्यात स्वारस्य दाखवले. त्या विषयांवर कोणकोणती पुस्तके आहेत याची यादी मागितली. ती पुस्तके आवर्जून मिळवली व वाचली. सहसा समांतर जाणाऱ्या रुळांप्रमाणे भाषेचे अभ्यासक आणि भाषेचे कार्यकर्ते परस्परांना भेटत नाहीत. भाषेच्या अभ्यासकांना आपण भाषाचिकित्सेच्या बाहेर पडून प्रत्यक्ष समाजभाषिक प्रश्नांच्या सोडवणुकीत रस घेऊ लागलो तर आपल्या कुळाला बट्टा लागेल याचे भय वाटत असावे. त्यामुळे भाषेच्या सैद्धान्तिक अभ्यासात रुची असलेले लोक भाषाचळवळीच्या आसपासही फिरकत नाहीत. त्याचबरोबर भाषेच्या प्रत्यक्ष चळवळीत काम करणारे अनेक कार्यकर्ते भाषेबाबतची निकोप, शास्त्रीय भूमिका घेऊन कार्यरत असतात असेही नाही. दातारांचा पिंड कार्यकर्त्याचा असला तरी आपण जे भाषेचे कार्य करीत आहोत त्याचा वैचारिक पाया पक्का असला पाहिजे ही त्यांची धारणा होती म्हणून ते वाचत राहिले, लिहीत राहिले.

सत्ता कोणत्याही पक्षाची असली तरी भाषेचे प्रश्न हे लोकशाही व सनदशीर मार्गांनीच सोडवले पाहिजेत याकडे त्यांचा कटाक्ष होता. हिंसेचा अवलंब त्यांना अमान्य होता. चर्चेतून प्रश्न सुटतात यावर विश्वास असल्यामुळेच नाउमेद न होता मराठीसाठी सरकारदरबारी ते पत्रव्यवहार करीत राहिले. लोकप्रतिनिधींना अर्जविनंत्या करीत राहिले. मराठी भाषेचे धोरण लवकरात लवकर जाहीर होऊन त्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठीही दातारांचे प्रयत्न चालू होते. भाषाधोरणाचा मसुदा तयार करण्यासाठी दातारांचे मोठे योगदान राहिले आहे. डॉ. सदानंद मोरे यांच्या अध्यक्षतेखालील भाषा सल्लागार समितीच्या अंतर्गत, जी मसुदा उपसमिती नियुक्त करण्यात आली होती तिच्यावर दातार यांनी निमंत्रित सदस्य म्हणून काम केले आहे. मराठीच्या चळवळीतील त्यांच्या आजवरच्या कामाचा समितीला फार उपयोग झाला हे सल्लागर समितीचा एक सदस्य म्हणून मी जवळून पाहिले आहे. हे भाषाधोरण दातारांच्या हयातीत जाहीर झाले असते तर त्यांना खूप आनंद झाला असता.

शालेय शिक्षणात मराठी भाषा अनिवार्य करण्यासंबंधीचा कायदा आणि मराठीचे भाषाधोरण यानिमित्ताने अलीकडे आम्ही वारंवार भेटत असू. दूरध्वनीवरून तर नेहमीच बोलणे होई. राज्यात मराठीसाठी काम करणाऱ्या पण असंघटित असणाऱ्या विविध घटकांना एकत्र आणले पाहिजे असे ते बोलून दाखवत, पण हे

सर्व करण्यासाठी लागणारे बळ त्यांच्या शरीरात नव्हते. ते थकले होते. मनाने खचले नव्हते तरी शरीर साथ देत नाही याची खंत ते अधूनमधून बोलून दाखवत. त्यावर, ''बापू तुम्ही फार त्रास करून घेऊ नका, तुम्ही मराठीसाठी खूप केलं आहे,'' असे मी म्हणे.मग त्यावर ते गंमतीने म्हणत, ''अहो सर, मराठी हेच माझं टॉनिक आहे. तुम्ही चिंता करू नका. जे होईल ते होईल.''

मराठी ही मुंबई उच्च न्यायालयाची प्राधिकृत भाषा व्हावी यासाठी दातारांनी जिवाचे रान केले. एकदा सहज बोलताना म्हणाले, ''आजकाल मला उच्च न्यायालयाच्या इमारतीचे जिने चढताना खूप त्रास होतो. धाप लागते. कधी कधी वाटते, हे जिने चढतानाच मी कोसळेन की काय.'' मला खूप अस्वस्थ वाटे.

अखेर दातारांनी ह्या जगाचा निरोप घेतला. उच्च न्यायालयाच्या इमारतीच्या जिन्यांवर नव्हे तर त्यांना परमप्रिय असलेल्या मायमराठीच्या मांडीवर डोके ठेवून घेतला. मराठीच्या चळवळीचे एक प्रेरणादायी पर्व संपले.

**– डॉ. प्रकाश परब**
भ्रमणध्वनी : ९८९२८१६२४०
parabprakash8@gmail.com

ग्रंथाली




# आरवली ते अरावली

**प्रकाश अंबुरे**


**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**

कोकणातल्या आरवलीसारख्या खेड्यातील शेतकरी कुटुंबातून सुरू झालेला लेखकाचा प्रवास राजस्थानातल्या अरावलीसारख्या विशाल पर्वतराजीत पोचलाय. सहकाऱ्यांना मदतीचा हात देत स्वतंत्र व्यवसायाला प्रोत्साहन देत लेखक सामाजिक भान जपतो. सारंच अविश्वसनीय आणि कौतुकास्पद. मुळातून वाचावं आणि प्रेरणा घ्यावं असं हे आत्मकथन.


# जीवन चाळ

**शुभांगी चेतन**

**मूल्य १०० रुपये**
**सवलतीत ६० रुपये**




बालपणीचे दिवस हे विशेष असतात. अगदी प्रत्येकाचेच. रेखाटलेल्या एखाद्या सुंदर चित्रासारखं. त्याचे रंग कधीही पिके पडत नाहीत. लेखिकेच्या बालपणातही असेच रंग आहेत. विविध व्यक्तींचे, त्यांच्या स्वभावाचे, शारीरिक बोलीचे अनेक रंग. चाळीने लेखिकेला खूप दिलं. अंगणाच्या रूपाने एक जिवलग मित्र लाभला आणि लाभली हिरवी मैत्री जपणारी झाडं, लाल मातीने सदैव रंगलेले पाय.




# झुंड

**संजय कळमकर**

**मूल्य ४०० रुपये**
**सवलतीत ३०० रुपये**

संजय कळमकर यांची ही कादंबरी उधळलेल्या झुंडीप्रमाणे थेट अंगावर येते, तितक्याच ताकदीने पत्रकारितेतील वेदना मांडून अज्ञात बाजूंवर प्रकाशही टाकते. मुद्रित माध्यमाचा उभा-आडवा छेद घेणारी, व्यवस्थेला सोलवटून काढणारी एक वास्तवदर्शी कादंबरी.

# कविताच... माझी कबर

**संजय चौधरी**

**मूल्य १५० रुपये**
**सवलतीत ९० रुपये**




ग्रामीण परिसरातून शहरात येणं, कृषिसंस्कृतीतून आधुनिक शहरी संस्कृतीत येणं हे नुसतंच स्थलांतर नसतं, ते कायांतर असतं. तो आपलं मूळ ठिकाण, खरंखुरं अस्तित्व शोधतो आहे. ते प्राप्त करताच येऊ नये यामुळे तो संत्रस्त झालेला आहे, अगतिक, क्रोधितही झालेला आहे. ही सारी अस्तित्वाशी, खऱ्या ओळखीशी निगडित तडफड संजय चौधरी यांनी या कवितासंग्रहात व्यक्त केली आहे.

# हिरवं भान जपणारा कवी नलेश पाटील

सतीश सोळांकूरकर

माणुसकीची जाण जपणाऱ्या नलेश पाटील या मराठीतील अविस्मरणीय कवीचा! 'हिरवे भान' हा कवितासंग्रह 'पॉप्युलर प्रकाशन'ने नुकताच प्रकाशित केला. नलेश पाटील यांच्या काव्यमय आठवणी जागवणारा हा लेख.




अरुणच्या (अरुण म्हात्रे) मुलुंडच्या खोलीवर गेलो तेव्हा अरुण बरोबर आणखी एक कोणीतरी व्यक्ती बसली होती. तसे दर शुक्रवारी सगळ्या कविमित्रांचा गोतावळा अरुणच्या जिन्याखालच्या खोलीत जमत असे आणि मग नवीन काय लिहिलं, काय वाचलं असं करत रात्र रात्र जागत असे. मी आणि संदेश ढगे याचे स्थापनेपासूनचे सभासद (फाउंडर मेंबर्स). अरुण म्हणाला, ''तुम्ही ओळखता ना एकमेकांना? मी त्या अनोळखी पण ओळख व्हावी असे वाटत असणाऱ्या व्यक्तीकडे पाहिले. नाकावर जरा खाली सरकत आलेला करड्या रंगाचा चष्मा एका हाताने वर सरकवत ती व्यक्ती उठली, माझा हात हातात घेतला आणि म्हणाली, 'मी नलेश पाटील.' त्याच्या खांद्याला झोळी होती आणि हातात कडं! 'मी सतीश सोळांकूरकर' – मी म्हणालो. 'अरे सतीश, आज याला ऐक. म ोठ्या जाहिरात एजन्सीमध्ये काम करतो हा आणि क्या लिखता है...। आज ऐकच तू.' असे म्हणत अरुणने माझीही ओळख करून दिली. नलेशची आणि त्याच्या कवितेशी झालेली ही माझी पहिली ओळख. त्या संध्याकाळी मग नलेशची कविता त्याच्या पेश करण्याच्या एका आगळ्या आणि वेगळ्या ढंगासह माझ्या जवळची झाली. अहो-जाहोचे अंतर संपून अरे-तुरेच्या एका घट्ट थांब्यापाशी येऊन थांबली. त्याचा मिश्किलपणा आणि शब्दाशब्दांवर कोट्या करण्याची अदा याचा मी फॅन झालो. तो चट्कन एखादे वाक्य असे बोलायचा की समोरचा हसून हसून बेजार व्हायचा. नलेश मस्करी करायचा पण त्याच्या तशा तिरकस कोट्यांनी किंवा मस्करीने समोरचा माणूस कधीही दुखावला जायचा नाही. किंबहुना तशी काळजी नलेशकडून आपसूकच घेतली जात असे कारण गावाकडून शहरात येताना तो मातीच्या गंधाचा गाभारा सोबत घेऊन आला होता आणि त्या अवीट अशा गंधाने सगळ्या आसमंताला आणि आपल्या सान्निध्यात जो जो येईल त्याला भारून टाकण्याचा त्याने वसा घेतला होता. तो वसा त्याने आयुष्यभर जपला आणि आपल्या दिलखुलास अशा वागण्यातून आणि नादमयी कवितेतून तो अगदी शेवटच्या क्षणापर्यंत जागता ठेवला.

कविवर्य शंकर वैद्य सर नलेशला 'दैवी चमत्कार' असे म्हणत असत. नलेशची कविता, तिची शब्दकळा आणि तिला लाभलेली अंतर्भूत लय याचे रसिक श्रोत्यांवर गारुड असे. नलेशचा आवाज ही त्याला लाभलेली दैवी देणगी होती. त्याच्या आवाजात, त्याच्या स्वत:सह चालीसह कविता ऐकणे हा एक दैवयोग असायचा. कार्यक्रमामध्ये त्याचे नाव घेतले जायचे. त्याची ओळख करून दिली जायची. नलेश शांतपणे उठून माईकसमोर जायचा. आता ज्याची इतकी मोठी ओळख करून दिली तो हाच का माणूस असावा? याची क्षणभर शंका यायची कारण नलेश अतिशय मिश्किलपणे आपल्या नाकावर सरकत आलेल्या चष्म्यातून सर्वांकडे एक नजर टाकत असे. तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर एकदम गंभीर भाव दिसत असत. मग तो हळुहळू बोलायला सुरुवात करत असे. त्याच्या गोड गळ्यातून कवितेच्या ओळी पहिल्या पावसासारख्या बरसत रहात असत आणि पहिल्या पावसाच्या मातीच्या वासासारखी त्याची शब्दकळा सगळ्या आसमंताला वेढून घेत असे. अगदी काही क्षणातच सगळे वातावरण भारून जात असे आणि नलेशच्या कवितेच्या तालावर अख्खा रसिकवृंद डोलायला लागत असे. कवितासंमेलनामध्ये कधी कधी एखादा कवी आपले रटाळ दळण दळत असे, श्रोत्यांचा अगदी अंत पाहात असे, त्याची कविता संपता संपत नसे. श्रोते चुळबूळ करायला सुरुवात करत असत. उठून जाण्याच्या तयारीत असत आणि नेमक्या अशा वेळेला सूत्रसंचालक 'आता कवी नलेश पाटील




**'पॉप्युलर प्रकाशन' द्वारा प्रकाशित 'हिरवं भान' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात डावीकडून सौमित्र, ऋग्वेदी प्रधान, रामदास भटकळ, सई परांजपे, राणी पाटील, कवी अशोक बागवे, अशोक नायगावकर आणि सचिन खेडेकर**

यांची कविता' असे म्हणून नलेशला बोलावत असे आणि काही क्षणातच सगळे वातावरण नलेशच्या कवितांनी भारून जात असे. असे अनेक कार्यक्रम नलेशने आपल्या कवितेने यादगार केल्याचे मी प्रत्यक्ष अनुभवले आहे.

नलेश एक उत्तम चित्रकार होता. एक नावाजलेला कॉपीराइटर होता. एका नामांकित जाहिरात एजन्सीमध्ये एका मोठ्या पदावर काम करत होता. या क्षेत्रामध्ये त्याचे मोठे नाव होते, त्याचा दबदबा होता. पण, मित्रांच्या खाजगी बैठकीमध्ये आणि बसण्याउठण्यामध्ये त्याने आपले हे मोठेपण कधीही येऊ दिले नाही. तो सर्वांसाठी फक्त नलेश होता. अनेकदा तो खाजगी मैफिलीमध्ये कविता म्हणणेही टाळत असे. सार्वजनिक कार्यक्रमाला जाणेही त्याला मनापासून आवडत होते असे नाही.

'कवितांच्या गावा जावे..' या कार्यक्रमातून नलेशने कवी अरुण म्हात्रे, अशोक बागवे, अशोक नायगावकर, किशोर कदम आदींच्या बरोबर अनेक ठिकाणी कविता पेश केल्या. त्याच्या कवितांचा एक खास असा श्रोतावर्ग निर्माण करण्यामध्ये नलेश यशस्वी झाला होता. अनेकदा, 'अमुक एक कविता म्हणा' असे रसिकांकडून त्याला सांगितले जात असे. 'कवितांच्या गावा जावे'च्या टीममध्ये वन्समोअर घेणारा बहुधा नलेश हा एकमेव कवी असावा.

नलेशचा मित्रसमुदाय प्रचंड होता. चित्रपट, नाटक, साहित्य, जाहिरात या क्षेत्रातल्या अनेक दिग्गजांशी त्याचा अतिशय जवळचा संबंध होता. त्याच्याशी ओळख झालेली व्यक्ती सहसा त्यापासून दुरावत नसे आणि याचे कारण म्हणजे नलेश माणुसकी मानणारा आणि ती जपणारा असा कवी होता. त्याच्या कवितेने जितके लोक जोडले गेले असतील त्यापेक्षा कितीतरी अधिक लोक मला वाटते त्याच्या माणुसकी जपणाऱ्या स्वभावामुळे जोडले गेले असावेत.

अलिकडेच पॉप्युलर प्रकाशनातर्फे नलेशचा 'हिरवं भान' हा कवितासंग्रह प्रकाशित करण्यात आला. हा संग्रह नलेशच्या जाण्यानंतर प्रकाशित झाला आहे. तसं पाहिलं तर कोणतीही गोष्ट ती वेळेवर किंबहुना वेळेच्या आधीच पार पाडायची असा नलेशचा दंडक होता आणि तशी शिस्तही त्याने स्वत:ला लावून घेतली होती. पण कवितासंग्रह प्रकाशनाच्या बाबतीत मात्र नलेश मागे राहिला. कदाचित त्याच्या अकाली जाण्यानं तसं झालं असावं. 'हिरवं भान'च्या प्रकाशनाला नलेशचे असंख्य मित्र आणि चाहते उपस्थित होते. 'सोनेरी सावलीत ज्याच्या अजान वृक्ष समाधी घेतो, त्या कवितेचा जीव माऊली तुझ्या मनी मी सोडून देतो' असे या कवितासंग्रहाच्या अर्पणपत्रिकेमध्ये नलेश याने म्हटले आहे.

नलेशची कविता आपल्यामध्ये आहे. त्याची कविता चिरंतन अशी आहे. पहिला पाऊस नेहमी नावीन्यपूर्ण वाटतो तशी नलेशची कविता नित्य ताजी आणि टवटवीत जाणवते, जाणवत राहते. मराठी कवितेचे दालन समृद्ध करणारा हा कवी पुढे निघून गेला. त्यानं जपलेलं हिरवं भान मात्र आपली नित्य सोबत करत राहणार आहे.

मला ढगाने धाडिले आहे टपाल थेंबाचे
डोळा ओलावुनी वाचे मजकूर पावसाचे...

असा थेंबाचे टपाल घेऊन येणारा नलेश प्रत्येक पावसात आपले डोळे ओले करत जाणार आहे, जुन्या-नव्या पावसाचे मजकूर समजावत राहणार आहे...!

**– सतीश सोळांकूरकर**
भ्रमणध्वनी : ९३२४३६३९३४
satishsolankurkar@gmail.com

# 'कमांडर'चा जीवनगौरव

मुलाखतकार : **श्रद्धा पेडणेकर**

नुकत्याच पार पडलेल्या अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या संमेलनात ज्येष्ठ अभिनेते रमेश भाटकर यांना 'जीवनगौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं हे औचित्य साधून रमेश भाटकर यांच्याशी साधलेला हा संवाद.....

• **अखिल भारतीय नाट्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रथमतः अभिनंदन. तुमच्या नाट्य कारकीर्दीला जीवनगौरव पुरस्काराचं कोंदण लाभलं. आज हा एवढा मोठा पल्ला गाठल्यावर मागे वळून पाहताना नेमकं काय वाटतंय?**

साहजिकच आनंद झाला. पुरस्कार घेताना स्टेजवर गेलो तेव्हा हौशी रंगभूमीपासून झालेला प्रवास, एकांकिका, व्यावसायिक नाटकं, मालिका, चित्रपट, मिळालेला मान-सन्मान, रंगभूमीने दोन्ही हातांनी भरभरून समाधान माझ्या ओंजळीत टाकलं. अशा सगळ्या आठवणींचा गेल्या ४७ वर्षांच्या कारकीर्दीचा कॅलिडोस्कोप डोळ्यासमोर फिरत होता. खूप काम केलं, प्रत्येक माध्यमात काम केलं.मी माझं नेहमीच शंभर टक्के देण्याचा मी प्रयत्न केला. त्या-त्या काळात माध्यमांच्या गरजांनुसार स्वतःला बदलत गेलो. मी ज्या काळात कामाला सुरुवात केली त्यावेळी आजच्या सारखं वाहिन्यांचं पसरलेलं जाळं नव्हतं. दूरदर्शन ही एकच वाहिनी होती त्यावेळी सर्व भाषांचे कार्यक्रम त्यात होत होते. खूप स्कोप नव्हता, मर्यादित वेळेत जे काही सर्वोत्तम करता येईल ते त्यावेळी होत होतं. नाटक आणि सिनेमाही मर्यादित होते आतासारखी अक्षरशः बादलीभर नाटकं तेव्हा नव्हती. अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतकी नाटकं तेव्हा होत होती. कानेटकर, कोल्हटकर, कालेलकर, खानोलकर अशा एकाहून एक श्रेष्ठ अशा लेखकांची नाटकं त्यावेळी मी रंगभूमीवर करत होतो.त्यांची प्रत्येकाची आपापली भाषा होती. ती-ती नाटकं रंगभूमी गाजवत होती. मी स्वतःला खूप भाग्यवान समजतो कारण अनेक ज्येष्ठ-श्रेष्ठ दिग्गजांचा सहवास मार्गदर्शन मला मिळालं आणि त्या पुण्याईच्या जोरावरच हा आजवरचा पल्ला गाठलाय. प्रभाकर पणशीकर, सतीश दुभाषी, लालन सारंग, मधुकर तोरडमल, भावनाबाई अशी बरीच मंडळी, ज्यांच्याकडून मला शिकायला मिळालं. माझी सुरुवात खरं तर हौशी रंगभूमीपासून झाली. तेव्हा विजय तेंडुलकरांची 'एक अशी परी,' मतकरींची तुमचे आमचे गाणे', मंगेश कुलकर्णींची 'दवबिंदू', अमोल पालेकरांची 'सूर्योदयाच्या प्रथम किरणापासून ते सूर्यास्ताच्या अखेरच्या किरणापर्यंत', सदानंद रेगे अशा अनेकांच्या एकांकिका त्यावेळी केल्या. 'महाराष्ट्र कलोपासक पुणे' यांच्यातर्फे राज्यनाट्य स्पर्धेत 'कालाय तस्मै नमः' हे नाटक मी केलं होतं. आमचं नाटक अंतिम फेरीत आलं आणि महाराष्ट्र पातळीवर मुंबईत जाऊन मुंबईच्या नाट्यकलावंतांशी स्पर्धा करण्याची संधी त्यावेळी मिळाली. त्यावेळेचे पुण्यातले अत्यंत परखड समीक्षा करणारे समीक्षक पंडित मांडके हे माझ्या कामाचं कौतुक करीत. त्यांना माझी कामं आवडायची. तेव्हा प्रभाकर पणशीकर 'अश्रूंची झाली फुले' या नाटकासाठी लाल्याच्या भूमिकेसाठी नवा नट शोधत होते. काशीनाथ घाणेकरांनी लाल्याचा रोल गाजवलेला होता. त्यावेळी पंडित मांडकेंनी पणशीकरांना 'पुण्यातला मुलगा आहे बघ लाल्याची भूमिका चांगली करील' असं सांगितलं. पणशीकरांनी मला बोलवलं माझी ट्रायल घेतली. त्यांना मी आवडलो आणि सिलेक्टही झालो. 'नाट्यसंपदे'च्या नाटकात लाल्याच्या भूमिकेत आलो. ती भूमिका इतकी गाजली की त्यामुळे मला एक वलय प्राप्त झालं. माझा बोलबाला झाला. तब्बल २८ वर्ष मी ते नाटक केलं. माझ्या कारकीर्दीमध्ये त्या नाटकाला अनन्यसाधारण महत्व आहे. त्या भूमिकेने खूप काही दिलं, खूप शिकवलं. साहजिकच त्यामुळे माझा व्यावसायिक नाटकांचा प्रवास खरं तर सोपा झाला. अनेक नाटकांसाठी मला समोरून विचारलं गेलं. खूप नाटकं केली. त्या काळात ज्युनियर असणंच मला आवडत होतं त्यामुळे फारशी जबाबदारी नसायची. तुम्ही जे काय करताय त्यामध्ये सिनियर लोक मार्गदर्शन करायला असायचे, त्यामुळे सुरुवातीची जेवढी नाटकं मी केली ती ज्युनियर म्हणून केली. सिनियर नट एक कोणीतरी असायचा. मग पणशीकर असायचे किंवा तोरडमल असायचे. कामं करता-करता ज्युनिअरचा सिनियर कधी झालो हे माझं मलाच कळलं नाही आणि साहजिकच मग जबाबदारीची जाणीवही येत गेली. नंदकुमार रावते, कमलाकर सारंग, दिलीप कोल्हटकर, प्रकाश बुद्धिसागर यांच्यासारखे दिग्दर्शक मला मिळाले. मी स्वतःला दिग्दर्शकाचा नट मानतो. दिग्दर्शक

चांगला असेल तर माझं काम अधिक उठून दिसतं, फुलून येतं. भूमिकेबद्दल माझा एक विचार असतोच पण त्या जोडीला मला दिग्दर्शकाची चांगली साथ, मार्गदर्शन मिळालं तर माझा अभिनय अधिक खुलून येतो. त्या काळात या मार्गदर्शनाची फळं ही नंतरच्या गतिमान झालेल्या माध्यमात मला चाखायला मिळाली.

मी एक 'राहू-केतू' नावाचं नाटक करत होतो. त्यामध्ये माझं आणि विक्रम गोखलेचं द्वंद्व होतं. त्यावेळी समीक्षक माधव मनोहरांनी आमची खूपच स्तुती केली होती.आमची तुलना थेट ब्रिटीश नटांबरोबर केली होती. बाळ कोल्हटकरांनी अनेक गाजलेली नाटकं लिहिली. त्यांनीही माझं 'राहू-केतू'तलं काम पाहिलं आणि 'रमेशला डोळ्यांसमोर ठेवून मला एक भूमिका लिहायची आहे', असं सांगितलं. कोल्हटकरांनही पहिल्यांदाच कोणा नटाला समोर ठेवून भूमिका लिहिली हे माझं भाग्य. ते नाटक म्हणजे 'वसिष्ठ विश्वामित्रां'वर आधारलेलं 'उघडले स्वर्गाचे दार'. त्यामध्ये मी रमेश भाटकर कोणाला वाटलोच नाही. विश्वामित्रच वाटायचो आणि अशा रितीने मी नाटकातच स्थिरावलो. लेखकाची स्वतःची शैली असते, ती मी आत्मसात करतो.




असंच एकदा माझ्या वडिलांसोबत स्नेहल भाटकरांसोबत दूरदर्शनवर गेलो होतो तेव्हा याकूब शेख तिथे होते. त्यांनी मला नाटकात काम करतोस का म्हणून विचारलं. मीही 'अश्रूंची झाली फुले'मध्ये करतोय सांगितलं. त्यांनी स्क्रीप्ट दिलं आणि दूरदर्शनवर माझा पहिलावहिला प्रवेश 'पियानो' या नाट्याविष्काराव्दारे झाला. तोही 'इनडोअर थ्री कॅमेरा' न करता सिनेमाचं जसं 'आऊटडोअर वन कॅमेरा' शूटिंग करतात तसं केलं. वंदना पंडित माझी सहकलाकार होती. नाटकात तुम्ही कसा अभिनय करता हे तुमचं तुम्हाला पाहता येत नाही पण इथे मी पहिल्यांदाच स्वतःला स्क्रीनवर अभिनय करताना बघत होतो. ते खूप थ्रिलिंग होतं. आजच्या मोबाईल शूटिंगच्या जमान्यात खरं तर त्याचं थ्रील नेमकं कळणार नाही पण माझा थ्रिलिंग अनुभव होता. ते खूप लोकांनी पाहिलं अनेकांना आवडलं. ते नाटक बघून मला 'चांदोबा चांदोबा भागलास का?' हा सिनेमा मिळाला. माझा लीड रोल असलेला हा पहिलावहिला सिनेमा. त्यानंतर 'अष्टविनायक' हा सिनेमा आणि मग सिनेमाचा प्रवास सुरू झाला. 'विक्रम वेताळ' नावाची पहिली सिरीयल मी केली. ती हिंदीत होती. त्यानंतर शुभांकर घोषच्या दिग्दर्शनाखाली 'रिश्ते नाते' केली. त्यावेळी सेटवर अधिकारी ब्रदर्सशी ओळख झाली मग 'बंदिनी', 'हॅलो इन्स्पेक्टर' केली त्या मालिका हीट होत गेल्या. त्याच्या लोकप्रियतेचा फायदा मला खूप झाला. ग्लॅमर मिळालं. रमेश भाटकर म्हणून माझी ओळख महाराष्ट्रभर झाली. नुकतंच चॅनलचं जाळं पसरत होतं. 'झी'ची पहिली सिरीयल 'कमांडर' त्या भूमिकेने रातोरात स्टारपद मिळालं. संपूर्ण भारतात ओळख मिळाली. 'स्टारडम' म्हणजे काय याची अनुभूती येत होती. ८७ साली नोकरी सोडली आणि खरोखरीचा व्यावसायिक नट म्हणून कारकीर्द सुरू केली. नाटकाने यश दिलं, पैसा दिला, प्रसिद्धी दिली आणि हो, पूर्वीची मृदुला बेहरे आताची मृदुला भाटकर ही माझ्या आयुष्याची सहचारिणी झाली. हौशी रंगभूमीवर काम करताना मृदुला फर्ग्युसनमध्ये होती. 'पुरुषोत्तम'साठी 'सूर्यास्ताच्या अंतिम किरणांपासून' बसवायला मी तिला मदत केली. त्याला पहिलं बक्षीस मिळालं. त्यानंतर 'रक्तपुष्प' केली आणि आमचं सूत जमलं. पुढे तिने लॉ केलं आणि आज ती न्यायाधीशाची भूमिका अत्यंत चोखपणे पार पाडते आहे. माझ्या कारकीर्दीची दखल घेऊन मातृसंस्था असलेल्या नाट्यपरिषदेने जो 'जीवनगौरव पुरस्कार' दिला, त्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो. मात्र 'जीवनगौरव' मिळाला म्हणून माझं काम संपलेलं नाही मी अजूनही रंगभूमीवर, चित्रपटात कार्यरत आहेच.

**● नाट्यपरिषदेचा खांदेपालट होऊन यंदाचं पहिलंच ६० तासांचं संमेलन पार पडलं. एकूणच या संमेलनाचा अनुभव कसा होता?**

मी दरवर्षी संमेलनाला जातोच. मग कुठेही का असेना. यंदा ते मुंबईत होतं, त्यामुळे मी आवर्जून गेलोच होतो. मुंबईत असल्यानेच अभिनेत्यांपासून ते नेत्यांपर्यंत सर्वांची उपस्थिती मोठी होती. प्रत्येक संमेलनात काही त्रुटी-उणिवा राहतात. कुठलीच गोष्ट परफेक्ट नसते तसंच याही संमेलनात होतं. मात्र तरीही अगदी आवर्जून दिसत होतं ते शिस्तबद्ध आयोजन. कलाकार उत्स्फूर्तपणे काम करत होते. प्रसाद कांबळीची माणसं बांधण्याची कला कामी आली. ही बिकेम व्हेरी गुड लीडर. उद्घाटन सोहळ्यातही स्टेजवर नेहमी असते तशी गर्दी केली नव्हती. ठरावीक माणसांची उपस्थिती. त्यामुळे अंदाधुंदी नव्हती. मच्छिंद कांबळीनंतर त्याचा मुलगा त्याचा वारसा समर्थपणे चालवतोय तोही तेवढाच कर्तबगार आहे. सक्सेसफुल लीडर कसा असतो यावर अनेक गोष्टी अवलंबून असतात. बाहेरगावी नाट्यसंमेलन असताना व्यावसायिक नाटकंच अधिक पाहायला मिळतात. मात्र मुंबईच्या प्रेक्षकांना ती काही नवीन नाहीत की कलाकार नवीन नाहीत. यंदाच्या संमेलनात पारंपरिकतेला फाटा देत आपल्या मूळ मातीतल्या लोककला बघायला मिळाल्या. त्यात लावणीपासून ते झाडीपट्टी रंगभूमी, दशावतार असे लोककलेचे अनेक पदर उलगडत गेले आणि विशेषतः लोकांचाही त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. झाडीपट्टी रंगभूमीवर मी स्वतः तीन वर्ष काम केलं आहे. त्यामुळे ते जंगलातून जाणं, तो मातीचा तात्पुरता उभारलेला स्टेज, रात्र जागवून रंगवलेलं नाटक या साऱ्याचा अनुभव मी घेतला आहे. म्हणून या अस्सल मातीतल्या कला त्या तिथेच जाऊन पाहण्याची एक वेगळी गंमत आहे. त्याचा अनुभवही

प्रेक्षकांनी घ्यायला हवा. रंगभूमीच्या सर्व कार्यक्रमांची निवड ही खूपच चांगली होती. परिसंवादातही अनेकांनी चांगले मुद्दे मांडले. मुद्यांपेक्षाही सगळे एकत्र आले त्यातून जो विचार प्रकट झाला ते महत्वाचं. प्रसाद कांबळी आणि टीमचं खरंच कौतुक करायला हवं. एवढ्या कमी कालावधी मध्ये एवढं सुंदर संमेलन त्यांनी पार पाडलं.

**● आजही रंगभूमीवर तुम्ही कार्यरत आहात. रंगभूमीची स्थित्यंतरं तुम्ही अनुभवली आहेत. आजच्या रंगभूमीबद्दल नेमकं काय वाटतंय?**

काळ बदलला तसे लेखक बदलले, नाटकं बदलंली, नाटकाची भाषा, प्रेक्षक, माध्यमंही बदलली. एक नट म्हणून त्यातूनही मी तावून-सुलाखून मी बाहेर पडलो. त्या त्या काळातले दिग्दर्शक, लेखक, नाटकं त्यांच्यानुसार मी स्वतःला बदलत गेलो. पूर्वी काही नाटकांच्या गरजेनुसार जशी भाषा असेल तसं गडद अंगाने काम करावं लागायचं, संवादफेक तशी करावी लागायची. आताची भाषा वेगळी आहे, आपण जसं नेहमी बोलतो तशी ती भाषा असते. त्यावेळची शिरवाडकर, कोल्हटकरांची भाषा बोलायची मजा काही औरच होती. जगच खूप फास्ट झालंय इथे सगळं इन्स्टन्ट हवं असतं मग कला असेल किंवा यश. नाटकाच्या रिहर्सल पूर्वी महिनोन्महिने चालायच्या. आता तसं होत नाही. पूर्वी १०-१२ पात्रांची नाटकं असायची. आता नाटकात दोन किंवा तीन डोक्यावरून पाणी किंवा चार-पाच पात्र असतात. पूर्वी तीन तीन सेट्स असत. आता फार तर एक सेट आणि दुसऱ्यात थोडा फार बदल केला जातो. पूर्वी महिना-महिना बाहेरगावी प्रयोग व्हायचे. आत्ता आठवड्याभरापुरते होतात. थिएटर्सचे दर वाढले, नटांच्या नाईट्स वाढल्या, वाहतुकीचा, जाहिरातीचा, लॉजिंगचा खर्च वाढला. त्याचा परिणाम तिकिटांवर झाला आणि त्याचे दरही वाढले. त्यामुळे खर्चिक भव्य-दिव्य नाटकं जी पूर्वी होत होती तशी करणं शक्य होत नाही. तिकिटाच्या दरावर सर्वंकष विचार करून तोडगा काढायला हवा. मात्र सगळीकडेच निराशा आहे असं नाही. चित्र खूप आशादायी आहे. तुम्ही मालिका करा. चित्रपट करा रंगभूमी हा शेवटी पाया आहे तो भक्कम असला तर तुम्ही कितीही उंच भरारी मारू शकता.

**● जुन्याच संहिता पुन्हा नव्या रूपात रंगभूमीवर दाखल होत आहेत. याला जुनं तेच सोनं म्हणावं की नव्या ताकदीच्या संहिता मिळत नाहीत म्हणावं?**

साधारण ४० नाटकांमध्ये चार ते पाच नाटकं चांगली चालतात. प्रेक्षकांना तुमचं नाणं खणखणीत आहे हे पटवून द्यावं लागतं. त्यासाठी जाहिरातबाजीला पर्याय उरलेला नाही. आज रंगभूमीवर चांगले प्रयोग होतायंत. ताज्या दमाचे कलावंत, लेखक तयार होतायंत, पण संख्या त्या मानाने कमीच आहे. मग अशा वेळी नवीन कलाकारांना घेऊन ते जुनी नाटकं नव्या ढंगात करतात. त्यावेळी पात्र संख्या वाढते, सेट्स वाढतात आणि साहजिकच मग तिकिटांच्या किंमतीही वाढतात. मग तीन अंकांचे दोन अंक होतात. काही वेळा प्रयोग रंगतो काही वेळा नाटकातला आत्माच निघून जातो. त्यामुळे नाटकाची भट्टी नेमकी कशी जमते आणि मायबाप प्रेक्षक त्याला प्रतिसाद कसा देतात यावरच सारं गणित अवलंबून आहे. मात्र एवढंही खरं तुम्ही चांगलं, दर्जेदार दिलंत तर प्रेक्षकही खुल्या दिलाने त्याचं स्वागत करतोय.

**● मराठी रंगभूमीवर काही नाटकांमधून भव्यदिव्यता आली पण तिकिटांचे दरही वाढले सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले. सर्वसामान्य प्रेक्षक हा नाटकाचा मूळ प्रेक्षक दरवाढीमुळे नाटकापासून दुरावला जाईल का?**

मध्यमवर्ग हा खरा नाटकाच्या प्रेक्षकातला कणा आहे. एकेकाळी गिरण्या होत्या. त्या गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांनी नाट्यचळवळीला मोठा हातभार लावला. प्रोत्साहन दिलं. त्यावेळी बाल्कनी त्यानंतर थिएटर्सच्या रांगा मागून भरल्या जात होत्या. मागून नाटक पाहण्यात कमीपणा वाटत नव्हता. गिरण्या गेल्या, कामगार गेले आणि नाटक पाहणारा हमखास प्रेक्षकही गेला. आज मध्यम आणि उच्च मध्यमवर्ग आहे. त्यामुळे ज्यांना तिकिटांचे दर परवडतात ते नाटकाला येतात. साहजिकच पुढच्या रांगा भरतात. पाठच्या रांगा, बाल्कनी रिकाम्याच राहतात. आज खरी गरज आहे ती नाटकांच्या तिकिटांचे दर कमी करण्याची. नाटक उभं करण्यासाठीच निर्मात्याचा एवढा पैसा खर्च होतोय की त्याला तिकिटदर कमी करणं शक्य होत नाही. अशा वेळी स्पॉन्सरशिपच्या माध्यमातून वर्तमानपत्रांनीही मराठी नाटकांना जाहिरातीच्या दरात सूट देऊन अशा काही उपाययोजना केल्या पाहिजेत.

**● आज कारकीर्दीच्या या टप्प्यावर आल्यानंतर काही करायचं राहून गेलं, काही मिळालं नाही अशी खंत, हुरहूर वाटतेय का?**

खरं तर मी आयुष्याच्या या टप्प्यावर आहे की जिथे खंत आणि हुरहूर माझ्या लेखी शून्य आहेत. माझ्या लहानपणी वडील संगीतकार असल्याने नाटकांचं गारूड माझ्या मनावर पहिल्यापासूनच होतं. नानासाहेब फाटक काय ज्योत्स्ना भोळे काय यांना पाहणं म्हणजे आम्ही स्वतःला भाग्यवान समजायचो.आज नट कोणत्या ना कोणत्या माध्यमातून प्रेक्षकांना भेटत असतोच पण पूर्वी तसं नव्हतं. त्या नटांचं दर्शनही दुर्मिळ असायचं. अशावेळी आपणही असं व्हावं असं मनापासून वाटायचं. नाटक, नाटकातले कलाकार हे सगळं मला खूप भारी वाटायचं. त्यावेळी पाहिलेला सुधाकर, हॅम्लेट यांचं गारूड खूप होतं. साहजिकच ते कधी तरी आपल्याला करता आले पाहिजेत असं वाटायचं. तसंच अनेकदा आपण उत्तम अभिनय केलाय, रसिकांनी तो उचलून धरलाय अशावेळी पारितोषिकाच्या रूपात पाठीवर थाप मिळावी अशी अपेक्षा त्यावेळी असायची. मात्र त्यातून माझ्या पदरी काही आलं नाही आणि मग मी या साऱ्यांच्या पलिकडे गेलो. रसिकांनी दिलेली उत्स्फूर्त दाद हेच माझं पारितोषिक आहे असं मानलं आणि माझं काम सुरू ठेवलंय ते आजतागायत! रसिकांच्या उदंड प्रतिसादाची उर्जाच तुम्हाला अधिक काम करायचं बळ देत असते.

**मुलाखतकार : श्रद्धा पेडणेकर**
भ्रमणध्वनी : ९९३०११२००४
shraddha.vasant@gmail.com

# मेहता पब्लिशिंग हाऊस

## आमची नवीन प्रकाशित पुस्तके




वास्तव जगात चांगलं-वाईटाची बेमालूम सरमिसळ झालेली दिसते. अशात मार्ग कधी थेट नजरेसमोर असल्यासारखा वाटतो, तर कधी कोसो दूर. या सर्वांमधून नियतीने तुमच्यासाठी आखलेला मार्ग शोधून काढून तुमची आयुष्याबद्दलची स्वप्ने योग्य प्रकारे प्रत्यक्षात कशी उतरवायची याचे मार्गदर्शन

### 'परवाना जगण्याचा'

**प्रिया कुमार**

अनुवाद - **श्यामल कुलकर्णी**


प्रवासी भारतीय तंत्रज्ञ आपल्या स्वत:च्याच शहरात राहून ऑफिसचं काम करू लागले, तर ते स्वत:चं शंभर टक्के उत्पन्न आपल्या राज्यातच खर्च करतील; त्यामुळे राज्यातील इतर लोकांनाही नोकरीच्या खूप संधी उपलब्ध होतील. केरळमधील खेड्यातून जागतिक कंपनीचं काम करणाऱ्या माणसाची यशोगाथा


'God's Own Office' चा अनुवाद

### देवाजीचं ऑफिस

**जेम्स जोसेफ**

अनुवाद - **सुनीता कट्टी**




अफगाणी खेड्यातल्या, आईच्या मायेला पारख्या झालेल्या दोन भावंडांमधल्या हृदय हेलावणाऱ्या घट्ट भावबंधाची कथा.. तीन वर्षांची परी आणि तिचा दहा वर्षांचा थोरला भाऊ अब्दुल्ला यांच्या आयुष्यात जे जे घडतं त्याचे त्यांच्या आणि त्यांच्या भोवतालच्या अनेकांच्या आयुष्यात जे पडसाद उमटतात, त्यातून मानवी आयुष्यातली नैतिक गुंतागुंत स्पष्ट होते.

### अँड द माउंटन्स एकोड

**खालिद हुसैनी**


अनुवाद - **वैजयंती पेंडसे**


आपण आता वार्धक्यावर अशा पद्धतीने उपचार करतो, जणू काही तो काही आजार आहे. या सरत्या वर्षांसाठी केवळ औषधोपचार गरजेचे नाहीत, तर या स्थितीतही आयुष्य अर्थपूर्ण, शक्य तेवढे संपन्न आणि परिपूर्ण असणेही तितकेच महत्त्वाचे आहे. आयुष्याच्या अंतिम काळात, स्वत:च्या मर्जीने, प्रतिष्ठेने आणि आनंदाने जगण्यासाठी केलेले यथार्थ मार्गदर्शन

### बीइंग मॉर्टल

**अतुल गवांदे**

अनुवाद - **वसु भारद्वाज**




कामाची व्यापकता, उपलब्ध वेळ आणि अपेक्षित परिणाम यांचा समतोल न साधल्यामुळे तणाव पातळ्यांमध्ये धोकादायक वाढ होत आहे. सुयोग्य वेळव्यवस्थापन व कामाचे नियोजन याद्वारे कमी कष्टात अधिक यश कसे मिळवावे हे सांगणारे पुस्तक

### वर्क लेस, डू मोअर

**जॅन येगर**

अनुवाद - **दिलीप गोगटे**

मेहता पब्लिशिंग हाऊस

Email: sales@mehtapublishinghouse.com
www.mehtapublishinghouse.com
Follow us on
http://www.facebook.com/mehta.publishinghouse

Mehta Books — 950+ Marathi books Available as e-Book
WhatsApp us on 9420594665

E-book available :
play.google.com/store/books
www.amazon.in

# याद'गार' नाट्यसंमेलन

नंदकुमार परशुराम पाटील

**साठ तासांच्या विक्रमी नाट्यसंमेलनाने यंदा सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. या यादगार संमेलनाचा हा धावता आढावा....**

**ज्या** संमेलनाचा थेट प्रेक्षकांशी, वाचकांशी संबंध येतो ती बरेचशी संमेलने वादविवादापासून सुरू होतात. यंदा मुलुंड येथे १३, १४, १५ जूनला झालेल्या नाट्य संमेलनाचीही त्यातून काही सुटका झालेली नाही. निवडणुका जाहीर झाल्यापासून ते अगदी संमेलन होईपर्यंत वाद-विवाद, आरोप-प्रत्यारोप हे सुरुच होते. एव्हाना या साऱ्या गोष्टी थांबल्या असल्या तरी एकंदरीत विचार करता संमेलन कसे प्रभावी झाले, नीटनेटके झाले, यादगार झाले, नाविन्याचा मार्ग त्याने चोखाळला, सर्व समावेशक झाले वगैरे चर्चा अद्याप शमलेली नाही. लेखाच्या शीर्षकात यादगार शब्दाची केलेली फोड बरेच अर्थ सांगून जाते. एकतर हे संमेलन 'याद' राखावी असे झालेले आहे. दुसरे म्हणजे विरोधकांना 'गार' करणारे ठरलेले आहे. नवीन कार्यकारिणीने अवघ्या दोन महिन्यात हे नाट्यसंमेलनाचे आव्हान पेललेले आहे. याचा किमयागार कोण तर अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष प्रसाद कांबळी हे सांगता येईल. एकंदरीत त्याची स्वतःची मराठी रंगभूमीवरील कारकीर्द लक्षात घेता अल्प कालावधीमध्ये रंगकर्मींना तसेच प्रेक्षकांना थक्क करणारी अशी त्याची वाटचाल आहे. वैयक्तिकरित्या निर्मितीत जी चपळता त्याने दाखवली ती त्याने रंगभूमीच्या सामाजिक कार्यातही दाखवलेली आहे. थोडाफार वाद सोडला तर परिषदेच्या निवडणुकीत बाजी तर मारलीच, परंतु कार्यपद्धतीतही त्याने हौशी कलाकारांपासून तर ते सेलिब्रिटी कलाकारांपर्यंत सर्वांचे मन जिंकून घेतलेले आहे. परिषदेचा सदस्य म्हणून संमेलनातली उपस्थिती हा अनुभव सोडला तर आपल्या अध्यक्षतेखाली झालेले ९८ वे मराठी नाट्यसंमेलन त्याच्यासाठी नवीन होते. खरं तर वर्ष फुकट जाऊ नये म्हणून केवळ वर्षभराचा उपक्रम म्हणून त्याला हे नाट्यसंमेलन छोट्या प्रमाणावर निभावता आले असते, पण सामूहिकपणे धाडस करणे हा त्याच्या कार्यप्रणालीचा एक भाग आहे. तो त्याने इथे दाखवून दिला. एवढे मोठे नाट्यसंमेलन म्हटल्यानंतर चुका या होणारच परंतु पहिल्या प्रयत्नात जी काही किमया त्याने केली ती नोंद घेणारी ठरलेली आहे. अनपेक्षितपणे संमेलन घ्यायचे ठरले तेव्हा तीन दिवस काय करणार, त्यात पावसाळा, संमेलन मुंबईसारख्या ठिकाणी, या विवंचनेत अनेक रंगकर्मी होते. सहकाऱ्यांशी सुसंवाद साधला. कामावर निष्ठा, प्रामाणिकपणा दाखवला की आपोआप अडचणी दूर होतात, यावर नव्या कार्यकारिणीचा जबरदस्त विश्वास. पद भूषवण्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीला महत्त्व देणारे, कलेशी निष्ठा असणारे मामा, मामी, दादा, काका, काकी, अण्णा अशा प्रसादच्या आपुलकीच्या शब्दांनी सच्च्या रंगकर्मींना एकत्र आणले. सांस्कृतिक मंत्री विनोद तावडे यांच्यावर स्वागताध्यक्षाची जबाबदारी सोपवली. ज्येष्ठ रंगकर्मी सतीश आळेकर यांना उद्घाटनासाठी निमंत्रित केले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष शरद पवार यांना प्रमुख पाहुणे म्हणून येण्याचा आग्रह धरला. मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांना संमेलनात सहभागी करून घेतले. विविध पक्षाचे नेते एकाच व्यासपीठावर येणे हाच मुळात अनेकांसाठी चर्चेचा विषय होता. नावाला की पक्षाला महत्त्व द्यायचे यावर नावाचा क्रम हा अवलंबून असतो. संमेलन झाल्यानंतर यावरही अनेकवेळा वादविवाद होत असतात. नाटकाच्या निमित्ताने मराठी माणसांना एकत्र आणायचे असेल तर वैयक्तिक प्रतिष्ठेला अलिप्त ठेवले पाहिजे अशा विचारसरणीचे हे सगळे नेते-रंगकर्मी एकत्र आले होते. नाट्यसंमेलन यशस्वी होण्याला बहुधा ही एक विचारसरणी कारणीभूत ठरली असावी.

पूर्वरंग आणि संमेलन असा पाच दिवसांचा रंगकर्मींचा हा उत्सव होता. आजवरचे नाट्यसंमेलन लक्षात घेतले तर दिंडी, परिसंवाद, मनोरंजन कार्यक्रम असा काहीसा ठरलेला साचा होता. वेळ पाहून कार्यक्रमाची रूपरेषाही ठरलेली असायची. नव्या कार्यकारिणीने या गोष्टीला बगल दिलेली आहे. खऱ्या अर्थाने नाट्यसंमेलन व्हावे, त्यात नावीन्यता असायला हवी, हा एकच ध्यास सर्वांनी घेतला होता. हे करत असताना स्वार्थी हेतूला त्यांनी अलिप्त ठेवले होते. कलाकार, निर्माते असून सुद्धा आपली








कुठलीही निर्मिती किंवा आपल्या कलेचे दर्शन या संमेलनात होणार नाही याची काळजी या नव्या टीमने घेतली होती. सलग पाच दिवस कार्यकर्ता म्हणून वावरण्याचे त्यांनी ठरवले होते. या त्यांच्या निर्णयाचे प्रतिबिंब संपूर्ण संमेलनावर पडले. निवडणूक लढताना निर्माण झालेले विरोधक प्रत्यक्ष क्रियाशील झाले होते. प्रशांत दामले, मोहन जोशी यांचा यथोचित गौरव करून त्यांना संमेलनाच्या प्रवाहात आणले होते. दुसरे म्हणजे रंगभूमीशी संबंधित संघ कुठलाही असो, त्यात दोन गट दिसलेले आहेत. विरोधकांनी संमेलनाला विरोध जरी केला नसला तरी फिरकायचे नाही हे तत्त्व अनेकांनी गेल्या काही वर्षापासून अंगिकारले होते. नाट्यसंमेलन हे काही ठरावीक रंगकर्मींचे नाही तर ते सर्वांचे आहे हे गेल्या अनेक वर्षापासून प्रत्येक अध्यक्ष ठामपणे सांगत आलेला आहे. परंतु त्याला फारसा काही प्रतिसाद मिळालेला नाही. उलट याच दरम्यान नाटकाचे प्रयोग करून कलाकार, तंत्रज्ञ अशा संमेलनापासून कसे अलिप्त राहतील हे विरोधक निर्मात्यांनी पाहिलेले आहे. यंदा मात्र यावरही विजय मिळवण्यात नव्या कार्यकारिणीला यश आलेले आहे. या महोत्सवाच्या काळात नाट्यप्रयोग होणार नाही याची काळजी सर्वच निर्मात्यांनी घेतलेली होती. त्याला कारणही तसेच आहे. अन्य निर्मात्यांना दिलासा देणारी एक गोष्ट इथे घडलेली आहे. ती म्हणजे शनिवार-रविवार हा निर्मात्यांसाठी व्यवसायाचा दिवस असतो. या दिवशी प्रेक्षक नाटक पाहण्यासाठी बाहेर पडत असतात. त्याची झळ निर्मात्यांना बसू नये याची काळजी नव्या कार्यकारिणीने घेतली होती. आजवरचा नाट्यसंमेलनाचा प्रवास लक्षात घेतला तर प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळावा, रंगकर्मींना सुट्टीच्या दिवशी संमेलनाच्या ठिकाणी येता यावे यासाठी तीन दिवसाच्या महोत्सवात शनिवार-रविवार या दिवसांचा विचार केला जातो इथे मात्र तो मोह आवरलेला आहे. संमेलनाच्या आयोजनात व्यावसायिक निर्मात्यांचा विचार केला आहे म्हणताना त्याची झळ संमेलनाला पोहोचेल असे काहीसे वाटत होते, पण प्रत्यक्षात तसे काही घडले नाही. संमेलनाच्या ऐवजी खऱ्या अर्थाने उत्सव, भव्यदिव्य कार्यक्रमांची रेलचेल, मनोरंजक कार्यक्रमाची मेजवानी अशीच काहीशी कौतुकपर वाक्ये ऐकायला मिळाली. यावरून संमेलन काय दर्जाचे झाले याची आपल्याला कल्पना येईल.

ज्यांनी संमेलनाला हजेरी लावली त्यांच्यासाठी अविस्मरणीय असे हे संमेलन ठरलेले आहे, परंतु जे संमेलनाच्या ठिकाणी फिरकलेले नाहीत त्यांना ऐकीव बातम्यांवर अवलंबून राहावे लागलेले आहे. हे संमेलन यशस्वी होण्याला जी अनेक कारणे आहेत त्यात सर्वात मोठे कारण म्हणजे सलग साठ तास प्रेक्षकांचे मनोरंजन होईल अशी हमी देणारे हे संमेलन होते. १३ जूनला पहाटे सहाला 'मराठी बाणा' सुरू झाला आणि १६ जूनला 'सुखन'च्या निमित्ताने या अविरतपणे

चाललेल्या कार्यक्रमाला पूर्णविराम मिळाला. नाट्यदिंडी, उद्घाटन सोहळा, संगीत सौभद्र, पंचरंगी पठ्ठे बाबूराव, रंगबाजी, प्रातःस्वर, बालनाट्ये, एकांकिका, 'सांस्कृतिक आबाधुबी' हा परिसंवाद, गो.ब. देवल पुरस्कार सोहळा, संगीत बारी, लोककला जागर, दंडार, दशावतार, नमन, आराधी लोकनृत्य, एकपात्री महोत्सव, 'शिकस्त-ए-इश्क' हे प्रायोगिक नाटक, 'अपूर्व मेघदूत' हा अंध कलाकारांचा नाट्यप्रयोग, 'रंगयात्रा' यातून संगीत रंगभूमीचा उलगडलेला प्रवास अशा अनेक अभिजात कलाकृतींचे दर्शन या साठ तासांच्या प्रवासात प्रेक्षकांना अनुभवायला मिळाले. संमेलन हे फक्त सेलिब्रिटी, क्रियाशील रंगकर्मींचे न राहता ते महाविद्यालयीन विद्यार्थी, बॅकस्टेज आर्टिस्ट यांचेही झाले होते. संमेलनात उत्साही वातावरण दिसण्यात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा मोठा वाटा होता. निमंत्रणापासून ते प्रवेशद्वारापर्यंत, सगळ्याच गोष्टीत कल्पकता दिसत होती. 'नाटकाचा पेटारा' हे यंदा नाट्यसंमेलनाचे खास आकर्षण होते. निमंत्रणपत्रिकेत ते पाहायला मिळालेच परंतु नाटकासाठी वापरले जाणारे पेटारेही तमाम प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत होते. एकावर एक रचलेले, गाजलेल्या नाटकाचे पेटारे जुन्या स्मृतीला उजाळा देणारे होते. जून महिना म्हटला की पाऊस हा आलाच. याची नव्या कार्यकारिणीला कल्पना होती. उत्स्फूर्तपणे मिळालेल्या प्रतिसादात निराशा निर्माण होऊ नये यासाठी 'कालिदास'च्या आवारात भव्य शामियाना उभारलेला होता. तोही वातानुकुलित असा होता. प्रेक्षकांची मोठी संख्या या दालनात सामावेल अशी त्याची रचना होती. त्यामुळे उद्घाटनसोहळा, समारोप यांच्याबरोबर महत्वाचे कार्यक्रम याच दालनात झाले. आतापर्यंतच्या वाटचालीत ज्यांनी नाट्यसंमेलनाध्यक्षपद भूषवले त्यांची छायाचित्रे सतत स्क्रीनवर दिसतील याची काळजी आयोजकांनी घेतली होती. पावणेदोनशे वर्षांचा मराठी रंगभूमीचा प्रवास आहे. नाटक अजरामर करण्यासाठी ज्या कलाकारांचे योगदान राहिले त्यांचे स्मरण सुद्धा छायाचित्राच्या माध्यमातून होईल असा प्रयत्न महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी केला होता. या संमेलनाची जी अनेक वैशिष्ट्ये कायम स्मरणात राहतात त्यात संगीत रंगभूमीवरच्या कीर्ती शिलेदार यांची ९८ वे संमेलनाध्यक्ष म्हणून निवड होणे हेच मुळात रंगकर्मींमध्ये आनंद निर्माण करणारे आहे. 'संगीत रंगभूमी' समृद्ध होण्याला जे अनेक दिग्गज कलाकार कारणीभूत आहेत त्यात शिलेदार कुटुंबीयांचा मोठा वाटा आहे. त्यांच्या दोन पिढ्यांचे योगदान या रंगभूमीला लाभलेले आहे. आईबरोबर मुलीलाही संमेलनाचे अध्यक्षपद भूषवायला मिळावे यातच मुळात संगीत रंगभूमीचा आदर आहे.

नाट्यसंमेलन म्हटल्यानंतर नाटकाच्या संदर्भात कार्यक्रम, परिसंवाद, त्याविषयीची चर्चा असे काहीसे असेल असे वाटण्याची शक्यता आहे, पण प्रत्यक्षात इथे मात्र रंगभूमीपासून अलिप्त असलेल्या, स्वतंत्र प्रवास करणाऱ्या लोककलेला प्राधान्य दिलेले होते. मुंबईकरांना जी लोककला पाहता आली नाही, त्याचे दर्शन या संमेलनात होईल हे आयोजकांनी पाहिले होते. परंपरेने आलेल्या तमाशा संस्कृतीचे दर्शन इथे घडवले गेले. झाडीपट्टी हा नाट्यप्रकार इथे प्रेक्षकांना अनुभवता आला. दिंडी म्हटलं की स्थानिक शाळा महाविद्यालयांचा सहभाग असे काहीसे ठरलेले असायचे, पण यंदाच्या नाट्यसंमेलनात महाराष्ट्रातल्या कानाकोपऱ्यातून लोककलेचे जीवन जगणाऱ्या लोककलावंतांना या दिंडीसाठी निमंत्रित केले होते. मुलुंड स्टेशनपासून ते महाकवी कालिदास नाट्यमंदिरापर्यंत असा हा दिंडीचा प्रवास होता. जिच्यात चारशेहून अधिक कलाकारांनी सहभाग घेतला होता. सुभाष नकाशे यांच्या संकल्पनेतील लोककलेचा हा नजराणा तमाम पादचाऱ्यांनाही पाहता आला. संगीत, वेषभूषा, रंगभूषा, वातावरणनिर्मिती, गीत गायन सारे काही मराठी मातीतले अस्सल, निखळ आनंद देणारे होते. पत्रकार परिषदेमध्ये साठ तासाच्या कार्यक्रमाची संकल्पना मांडली, त्याची प्रसिद्धी झाली, दिवस-रात्र अविरतपणे सुरू राहणाऱ्या या कार्यक्रमांना प्रेक्षक कोण येणार? अशी कुजबुज ऐकायला मिळत होता, पण मुंबईकरांनी तो फोल ठरवला. कालिदास नाट्यगृह, सुधा करमरकर रंगमंच, डॉ. हेमू अधिकारी रंगमंच इथे झालेल्या सर्वच कार्यक्रमांना प्रेक्षकांनी उत्तम प्रतिसाद दिला. संमेलनाच्या अगोदर निर्माण झालेल्या वादविवादांचे प्रतिबिंब संपूर्ण संमेलनावर पडेल असे वाटले होते, पण प्रत्यक्षात तसे काही घडले नाही. मराठी नाटकाच्या कक्षा रुंदावल्या जाव्यात असे मत प्रत्येकाने व्यक्त केले. समग्र नाट्यप्रवासाचे दर्शन घडेल असे दालन उभारण्याची तयारी उद्धव ठाकरे यांनी दाखवली. गावोगावी प्रयोग होण्याच्या दृष्टीने सुविधा निर्माण व्हायला हव्यात असा आग्रह शरद पवार यांनी धरला. नाटक हे ठरावीक साच्यात न होता त्यातली भव्यता सादरीकरणात दिसायला हवी असे राज ठाकरे यांचे सांगणे होते. नवकलाकारांना मुंबईत स्थिर होता यावे यासाठी हक्काचे बेट उभारले जावे अशी संकल्पना संमेलनाध्यक्ष कीर्ती शिलेदार यांनी मांडली. वैविध्याने नटलेल्या या नाट्यप्रवासात दलित रंगभूमीचाही विचार व्हायला हवा असे सुशीलकुमार शिंदे यांनी सुचवले. ''आता मी माजी संमेलनाध्यक्ष असलो तरी एक कार्यकर्ता म्हणून पुढची काही वर्षे मला काम करणे शक्य आहे.'' असे जयंत सावरकर यांनी सांगितले. भविष्यातली रंगभूमी उज्ज्वल करायची असेल तर बालरंगभूमीला प्राधान्य दिले पाहिजे, अभिनयाच्या कार्यशाळांचा विस्तार व्हायला हवा असे सतीश आळेकर यांनी उद्घाटनपर भाषणात सांगितले. रंगभूमी व्यापक आणि समृद्ध होण्याच्या दृष्टीने सांस्कृतिक मंत्री या नात्याने पुढाकार घेणार असल्याचे संमेलनाचे स्वागताध्यक्ष विनोद तावडे यांनी आपले मत व्यक्त केले. थोडीफार टीकाटिप्पणी सोडली तर येणाऱ्या पाहुण्यांनी, सेलिब्रिटींनी हे संमेलन यादगार कसे झाले हे सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. महाराष्ट्रातल्या अन्य शाखांनी प्रयत्न न केल्यामुळे आयत्यावेळी हे संमेलन मुंबईत घेण्यात आले होते, जे कायम आठवणीत राहणारे झालेले आहे.

**– नंदकुमार परशुराम पाटील**
भ्रमणध्वनी : ९८६९००८८०५
nandu.journalist@gmail.com

कनातीमागची पायरव

# तमाशातील वगनाट्याची जादुई दुनिया

श्यामल गरुड

> कधी काळी ज्या वगनाट्यांनी गावगाड्यातल्या लोकांना हसवले, रडवले व प्रेक्षकांवर गारुड केले. त्यांची शेवटची धुगधुगी आता उरली आहे.

'आपल्याकडे नाटकाचा खरा शौकीन हा मराठी मध्यमवर्गीयच' या आत्मप्रौढीवरचा थोडा शेंदूर खरवडला की त्या खालचा दिसणारा मातकट रंग आपल्याला थेट बोट धरून लोकरंगभूमीच्या वगनाट्यापाशी नेऊन उभा करतो. पांढरपेशी साचेबंद बॉक्स थिएटरातला रंगमंचीय अवकाश व तमाशातील जत्रे-यात्रेतला खुल्या आस्मानाखालच्या संपत चाललेल्या वगनाट्याचा माहौल या तीन-चार वर्षात खूप जवळून बघता आला. आजही बुजुर्ग तमाशा कलावंतांना भेटले की, त्यांच्या तोंडून तमाशातील चलतीच्या काळातल्या वगनाट्यासंबंधीच्या अनेक आख्यायिका ऐकायला मिळतात. त्यावेळी ऐतिहासिक - पौराणिक वग बघताना ग्रामीण कष्टकरी माणूस पार स्वतःला विसरून जायचा. तांबडं फुटेस्तोवर अंगावर घोंगडी घेऊन तल्लीन व्हायचा. 'संत तुकाराम' या वगात तुकारामाचे विमान सदेह वैकुंठाला पाठविताना 'आम्ही जातो आमुच्या गावा' हा अभंग सुरु झाला की माळकरी-वारकरी श्रद्धेने हात जोडून व्याकूळ व्हायचा. काही भावविवश होऊन रडू लागायचे. तेच 'संत ज्ञानेश्वर' वगनाट्याचे. समाधी घेण्याची वेळ समीप आली की तमाशा बोर्डावर ट्रीक सीन सुरु व्हायचा. काही भाबडे प्रेक्षक हात जोडून शेवटचे दर्शन घ्यायचे. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर झालेल्या कलावंतांच्या अनेकदा पाया पडायचे. ही जादू वगनाट्यांनी कोणे एकेकाळी तमाशात निर्माण केली होती. याच वगनाट्याच्या काळात युगपुरुषांच्या प्रतिमेला कुठेही धक्का लागू नये याचीही खबरदारी काही वगलेखक घ्यायचे. उदा. बाबुराव पुणेकर (मोकाशी) यांनी शिवाजींवर लिहिलेल्या वगनाट्यात कधीही त्यांचा शिवाजी त्यांनी तमाशा बोर्डावर आणला नाही. 'शिवाजी पन्हाळगडावरून रायगडाकडे निघाले', 'शिवरायांनी दक्कनेला कूच केली आहे' यासारखे वाक्य यायचे. शिवाजी मेंदूभर फिरायचे पण पुढ्यात यायचे नाही. बाबुरावांना कुणीही शिवाजी व्हावे हे मान्यच नव्हते म्हणे !

तमाशाच्या भरभराटीच्या काळात वगनाट्याचा प्रचंड बोलबाला होता. वगांनी प्रेक्षकांवर गारुड केले होते. त्यातलेच दोन किस्से तमाशातील महानायक रघुवीर खेडकरांनी मला सांगितलेले. एकदा पुण्याच्या बालगंधर्व थिएटरात चंद्रकांत ढवळपुरीकरसह दत्ता महाडिक यांच्या तमाशात 'महाराष्ट्र झुकत नाही' हा वग रंगात आला होता. संभाजी राजांना मारण्याचा प्रसंग व राजे यांची 'मी मराठा आहे. मराठा राहीन व मराठा म्हणूनच मरेन' ही गर्जना सुरु असते. तसतशी औरंगजेबाची क्रूरता वाढू लागते. तो राजेंच्या एकेका अवयवांना छाटू लागतो. संपूर्ण सभागृह या भावनिक प्रसंगात गुंतलेले, जणू की आपल्या राजाला एवढे निर्दयीपणे मारल्या गेल्याच्या जखमा पुन्हा ओल्या झाल्यागत भासू लागल्या होत्या. तेवढ्यात प्रेक्षकांमधून एक गोरा-गोमटा, घारोट्या डोळ्यांचा माणूस काही क्षणातच चपळाईने स्टेजच्या दिशेने धावला. औरंगजेबाच्या हातातलीच तलवार घेऊन तो त्याला मारायला धावला. या प्रसंगाने स्टेजवरचे कलाकार व सभागृहातले सारेच काही क्षण बुचकळ्यात पडले. पण काही क्षणातच त्या सावरलेल्या माणसाने कलाकारांची व प्रेक्षकांची व्यत्यय आणल्याबद्दल माफी मागितली व वगनाट्याच्या जादूविषयी भरभरून बोलले. हा प्रेक्षक दुसरा-तिसरा कुणी नव्हता तर ते साक्षात डॉ. काशिनाथ घाणेकर होते! हे त्याकाळी घडले, ज्या काळात घाणेकर हे नाव रंगभूमी व चित्रपटांमधून चांगलेच गाजत होते.

दुसरा अनुभव 'रायगडच्या राणी अर्थात पन्हाळगडचा कैदी' या वगनाट्यातील होता. कांताबाई सातारकरांची या वगातील व्हिलनची भूमिका इतकी गाजली होती की नगर जि. बोधेगावी या प्रयोगाच्या दरम्यान दोन-तीन स्त्रिया रडत स्टेजवर एका आवेगाने पळत आल्या व त्या संभाजी राजे करणाऱ्या कलावंताला 'या बाईला सोडून द्या संभाजी राजे, शेवटी ती तुमची आई आहे असे विनवू लागल्या.' शेवटी तो वग काही काळ थांबवून त्या स्त्रियांची समजूत काढण्यात आली. असाच थोडा वेगळा प्रसंग... 'रक्तात न्हाली कुऱ्हाड'मधील विठाबाईंची बलात्कारामुळे वेडी झालेली 'स्त्री' लोकांना घाबरवून टाकायची. विठाबाई प्रेक्षकांमध्येच कुठेतरी दबा धरून बसायची व तिच्या एन्ट्रीला सुसाट पळत व आक्रोश करीत



स्टेजवर जायची. प्रेक्षक खूप घाबरून मागे सरकायचे. या प्रसंगाच्या उलट चंद्रकांत ढवळपुरीकरांच्या 'चित्ता फाडला जावळीचा' यातल्या चंद्रराव मोरे या व्हिलनला अनेकदा मारायला लोक धावून गेलेले आहेत. तमाशासृष्टीत चंद्रकांत ढवळपुरीकरांसारखा मेकअप आजही कुणाला जमणार नाही, असे तमासगीर सांगतात. ते दोन-दोन तास एखाद्या व्यक्तिरेखेच्या मेकअपसाठी घेत. चंद्रकांत-सूर्यकांत, निळूभाऊ व इतर अनेक मराठी कलावंत ते मेकअप कसा करतात ते बघायलाही यायचे म्हणे. एक ना अनेक किश्श्यांची ही स्मरणमाळा वगनाट्यातल्या जादुई भावविश्वातली होती.

उमाबाबू मांग सावळजकर यांच्या 'मोहना बटाव'( १८४०-१८५०) या वागपासून सुरु झालेली ही वगनाट्याची परंपरा पुढे पठ्ठे बापूराव यांच्या 'मिठ्ठाराणी' या वगापासून तमाशात अधिक गडदरित्या अधोरेखित झाली. मधल्या काळात लिखित वग जरी नसले तरी मौखिक परंपरेची कास धरीत ऐतिहासिक - पौराणिक मुख्य घटनेतलं एखादं बीज घेऊन कलावंत तीन-चार तास एक वगनाट्य उभं करायचे. त्यातली पात्र रोज नव्याने बदलायची. तमाशा सुरु होण्यापूर्वी बिडी ओढत, चहा पित एकमेकांना सूचना दिल्या जायच्या. 'आज तू राजा, तू प्रधान, तू पाटील.....' अक्षरओळख नसलेले हे कलावंत आपल्या ग्राम्य रांगड्या भाषेतून त्या त्या विषयाची मांडणी करायचे. ते कथाबीज खुलवत प्रेक्षकांना बांधून ठेवायचे.

वगनाट्यात विषयांची व कलावंतांची जेवढी जादू त्याकाळी ठसायची तेवढीच ती मंचावरच्या वगनाट्यात प्रसंगानुरूप बदलणाऱ्या वेगवेगळ्या रंगीन पडद्यांचीही होती. तमाशाच्या सुरुवातीलाच ढोलकी, तुणतुणं, हलगीच्या गजरात गणरायाचे पडद्यावरचे वंदन संपताच, रंगबाजीचा झकास पडदा बदलायचा. कृष्ण-गवळणींची थट्टा-मस्करी, हाळीच्या-विनवणीच्या गौळणी आपले कान तृप्त करीत असतांनाच मध्ये साध्या लेंगा पँट व बनियनवरच साडी नेसून दाढी मिशी असणारा पुरुष कपाळभर कुंकू लावून मावशीच्या वेशात धमाल करीत पुढ्यात यायचा. गौळणींना मथुरेला घेऊन जाणाऱ्या मावशीच्या कोट्या संपताच वृंदावनातल्या पडद्यावरच्या दृश्यात आपण रमतो ना रमतो तोच 'लेक्चर पोवाडा' आणि दुसऱ्या पडद्यावरचे बदललेले दृश्य आपल्याला बोट धरून वीररसात नेते. शाहीर शेवटची शिलकार टाकून वगाची नांदी आळवतो तोच मंचावर आणखीन एक पडदा आपल्याला वगनाट्याच्या भावविश्वात आणून सोडतो. तमाशाच्या स्टेजवरची (बोर्डावरची) कुठलीच प्रॉपर्टी बदलत नाही, परंतु तमाशाच्या चलतीच्या काळात ८-१० वेळेस वेगवेगळे पडदे बदलले जायचे. प्रेक्षकांना बसल्या-बसल्या मंदिर, राजमहाल, जंगल, नदी, किल्ला, झोपड्या अशा विविध दृश्यातून फिरवले जायचे. अनेकदा पडद्याच्या आतूनच अत्यंत कलात्मकरित्या कलाकारांची ये-जा करण्यासाठी पडदा रंगवला जायचा. राजमहाल किंवा जंगल किंवा गावाचा आभास निर्माण करून पडदा रंगवतानाच त्यात डेप्थ आणली जायची. त्याला 'कटमहाल' व इतर दृश्याचे नाव देऊन या चित्रात्मक पडद्याला विभागून दृश्य अधिक सजीव केले जायचे. गावगाड्यातील कष्टकरी त्या रंगीत पडद्यावरची जादू डोळे भरून बघायचे. तीन-चार तास चालणाऱ्या वगनाट्याचा अवकाश या बदलणाऱ्या पडद्यांवरच अवलंबून असायचा. या पडद्यांची सरासरी लांबी १८ फूट उंच व १२ फूट रुंद असायची. पूर्वीचे फडमालक वगनाट्याच्या विषयानुरूप आवडीने पडदे रंगवून घेण्यासाठी नारायणगावला जायचे. या एका माहितीवरच मी नारायणगावतल्या एका जुन्या पडदे रंगविणाऱ्या पेंटरपर्यंत जाऊन पोहोचले.

एकेकाळी ज्याने आपल्या जादुई रंग-रेषांतल्या चित्रांनी गावगाड्यातल्या प्रेक्षकांच्या नजरेत तमाशातली कला अधिक जिवंत बोलकी केली होती. ज्ञानेश्वरांचा रेडा, चालती - बोलती भिंत केली. ऐतिहासिक-पौराणिक समाजवास्तवाची तत्कालीन नस पकडून अवघी तमाशा पंढरी पडद्यावर पुन्हा जिवंत केली होती. तमाशाच्या



गाडीवरच्या आकर्षक पाट्या असोत. गाड्यांची सजावट, पोस्टर, कनातीपुढचा मुख्य गेट ज्याला फडमालक स्वतःच्या तमाशाचं नाक समजतात. या साऱ्या गोष्टींना रंगविणारा नंदकुमार पेंटर (खोल्लम) मात्र नेहमीच प्रसिद्धी अभावी मागे राहिला. जवळजवळ पन्नास वर्षे ज्या नंदकुमार पेंटरनी तमाशा कलेत कैक रंग भरलेत, त्याच्या आयुष्याच्या मावळतीचे रंग मात्र फिके - फिके उदासलेले होते. त्या उदास कॅन्व्हासवर प्रसिद्धीच्या उजेडाची साधी तिरीपही कधी कलंडली नाही. या दुर्लक्षित कलावंताला हुडकून काढण्यातला आनंद खूप मोठा होता.


नंदकुमार खोल्लम

नंदकुमार खोल्लम यांचे आजोबा (नीरु खोल्लम) सोनार (कारागीर) होते. त्यांचे वडील रामचंद्र सोनार कामासोबतच पेंटिंग - मूर्तिकाम करायचे. पण एकोणीसशे सत्तरच्या आसपास पित्याचे छत्र हरपले व पौगंडावस्थेतील नंदू पोटासाठी कधी हॉटेलात, पान टपरीवर तर कधी आकाश कंदील बनविणे, कुणाच्या हाताखाली मूर्तिकलेत मदत करणे हे काम करू लागला. त्यातून त्याच्या हातातली कला अधिक विकसित होत गेली. हळूहळू नारायण गावात नंदकुमार पेंटरचं नाव होऊ लागलं. याच तमाशा पंढरीत नारायणगावात एकदा दत्ता महाडिक पुणेकर यांनी आपल्या पिठाच्या गिरणीची पाटी रंगवून घेतली. महाडिकांना काम आवडल्यानंतर त्यांनी आपल्या तमाशाचे पडदे रंगवून घेतले. त्या पडद्यांचा खूप बोलबाला सुरू झाला. पूर्वी तमाशाचे पडदे बनवून घेण्यासाठी खास कोल्हापूर गाठावे लागायचे, पण नंदकुमार पेंटरमुळे आता लोकांना नारायणगावातच काम करून मिळू लागले. १९७४ चा काळ नंदकुमार यांच्यासाठी भरभराटीचा ठरला. या काळात एका वर्षासाठी रघुवीर खेडकर नारायण गावात वास्तव्यास गेले होते. यावेळी रघुवीर खेडकरांच्या वगाचे पडदे त्यांचा मित्र नंदकुमार यांनी असे काही रंगवले की अख्ख्या तमाशाक्षेत्रात त्याची चर्चा सुरू झाली. त्या नंतर तर चंद्रकांत ढवळपुरीकरांपासून ते दत्तोबा तांबे, पांडुरंग मुळे यांच्यापासून ते छोट्या-मोठ्या बहुतांश तमाशा फडांनी मग आपले तमाशाचे पडदे व इतर साहित्य येथेच रंगवून घ्यायला सुरुवात केली. नंदकुमार पेंटर यांनी आपल्या कलेमागील प्रेरणा मांढरे बंधू व कोल्हापूरचे चित्रमहर्षी जी. कांबळे व बेल्हेकर पेंटर, कृष्णा जुन्नरकर पेंटर, लक्ष्मण पेंटर यांचा उल्लेख केला.

दत्ता महाडिक हे आपल्या तमाशात ट्रीक सीन वापरायचे. त्यांना ट्रीक सीनचा राजा म्हणूनही ओळखले जायचे. परंतु या ट्रीक मागे नंदकुमार यांच्या बोटाची जादू काम करायची. माऊलींची भिंत चालवणे, तुकारामाच्या बुडालेल्या गाथा तरून येणे, भक्त 'कबीर' या वगातील कबीराच्या मुलाचे छाटलेले मुंडके एका तबकड्यात हुबेहूब बनविलेले पेश करणे किंवा अशा असंख्य गोष्टी असतील ज्यात नंदकुमार पेंटरची कलात्मकता वगनाट्याला अधिक सजीव करीत होती. दत्ता महाडिकांनंतर तर मोठमोठ्या तमाशा फडात ट्रीक सीनची चलतीच सुरु झाली. कुणी स्टेजवर जीप आणली तर रघुवीर खेडकरांनी 'राजीव गांधी' या वगात स्टेजवर छोट्या चार्टर विमानाची प्रतिकृती आणली. कधी स्टेजवर पाऊस पाडण्याचा सीन असेल किंवा प्रत्यक्ष घोडा, नाग व इतर प्राणी आणणे मग सुरु झाले. फडमालकांची विषयाला अनुसरून वेगवेगळ्या वस्तू-प्राण्यांसंबंधीची जणू स्पर्धाच सुरु झाली. अर्थात ऐंशी नंतर चित्रपटांमधल्या डिस्को परंपरेला शह देणे व दुसऱ्या बाजूस ऑर्केस्ट्राला थोपविण्यासाठी १९९० पर्यंतचा काळ तमाशासाठी मोठा जिकिरीचा होता. त्यात जागतिकीकरणाच्या पायवाटेने अनेक अवधाने लोकांना खुणावू लागली होती. या पार्श्वभूमीवर मनोरंजनाचे खेळणे मोबाईलच्या रूपाने हातात रुळले. दुसऱ्या बाजूस हळूहळू मुंबापुरीतला तमाशाचा बाजार उठू लागला होता. याच काळात तमाशा प्रेक्षकांची अभिरुची बदलू लागली. वगनाट्याची गोडी कमी होऊ लागली. अगदी ग्रामीण भागातलाही तमाशासाठी रात्र-रात्र जगणारा प्रेक्षक रंगबाजीनंतर पांगू लागला. कोणे एकेकाळी ज्या वागासाठी ८-१० पडदे रंगवून घेतले जायचे तिथे आता रस्ता - महाल - जंगल या तीन पडद्यांवरच काम भागवू लागले. आज नंदकुमार खोल्लम पेंटर सत्तरी पार नारायणगावात तमाशाच्या रंगीन दुनियेपासून अलूफ होऊन जगत आहेत. त्यांचा मुलगा रमेश नंदकुमार व राजेश नंदकुमार मात्र आजही उर्वरित कंठास आलेल्या तमाशाच्या वगनाट्याला रंगवत बसले आहेत.

तमाशातील वगनाट्याचा सुवर्णकाळ हा खरोखर अभ्यासनीय व रोचक असाच आहे. गावगाड्यातल्या अल्पशिक्षित वगलेखकांनी विविध सामाजिक प्रश्नांना हात घालीत प्रबोधनाचेही काम केले आहे. उदा. हुंडाबळी, व्यसनमुक्ती इ.स. १९३५-४० च्या दरम्यान तर वगनाट्यांनी गारुड घातले होते. या काळात बाबुराव पुणेकर (मोकाशी) हे नाव खूप गाजले. त्यांनी अनेक ऐतिहासिक, पौराणिक व सामाजिक वगनाट्याचे लेखन केले. उदा. 'नायकिणीचा रंगमहाल', 'दोन मुलांचा खून अर्थात जय-विजय', 'उज्जेनची दहिवाली', 'गवळ्याची रंभा', 'लडू सिंग', 'उल्लू दरबार' इ. अनेक वगांचे लेखन केले. बाबुरावांच्या 'संत तुकाराम' व 'संत ज्ञानेश्वर' या वगांनी तर तुफान लोकप्रियता मिळवली होती. १९४० नंतर हरिभाऊ वडगावकर यांचा 'सावळा कुंभार' हा वग पुढे तो 'गाढवाचे लग्न' या नावाने अजरामर झाला. हरिभाऊंनंतर रामा कुंभार वर्धनकर, अर्जुनबुवा वाघोलीकर यांच्या वगनाट्यांनी तमाशाला मोठे योगदान दिले.

१९७० नंतर गणपत व्ही. माने यांची अत्यंत महत्त्वपूर्ण कारकीर्द सुरु झाली. त्यांचे गाजलेले वग होते, 'लग्नाआधी कुंकू पुसले', 'इंदिरा मठाचे गुपित', 'धन्य झाली पावनखिंड', 'का दिलेस कर्णा दान ते', 'रक्तात भिजला बांगला', 'मानवत खून खटला', 'जन्माला येई इंदिरा पुन्हा' इ. एकूण शंभराच्या वर वगलेखन करणारे

गणपत व्ही. माने यांच्या वगनाट्यांनी तमाशासृष्टी खूप समृद्ध झाली. त्यांच्या वगांना आजही तमाशात मागणी असते. विशेष बुजुर्ग लोक आपल्या गावातल्या जत्रे-यात्रेची जेव्हा तमाशा फडांना सुपारी देतात तेव्हा मानेंच्या वगांसाठी आग्रह धरतात.

गणपत व्ही. माने नंतर नाथा मास्तर घोडेगावकर यांनीही आपला काळ गाजवला. त्यांचा सर्वात गाजलेला वग 'डोम्या नाग' या वगनाट्याने रघुवीर खेडकरांच्या तमाशाला प्रसिद्धी शिखराकडे नेण्याची मदत केल्याचे बोलले जाते. यानंतर एम. दस्तगीर यांचा काळ आला. ज्यात 'संत रोहिदास', 'डाकू फुलनदेवी', 'थोरातांची कमळा', 'जिवंत हाडांचा सैतान', 'रक्तात रंगली दिवाळी' इ. दस्तगीर यांची वगनाट्ये गाजली. समांतरपणे सुभाष माने यांनी देखील पन्नासच्या वर वगनाट्य लिहिली. त्यांचे गाजलेले वगनाट्य 'सूनबाई कुंकू लेऊन जा', 'आग भडकली सौभाग्याची', 'राजीव गांधी हत्याकांड', 'अंजनबाई गावित' इत्यादी.

भांडे सरकार उर्फ दिनकर पाटील हे असेच महत्त्वाचे नाव. 'कोर्टादारी फुटला चुडा', 'पत्री सरकार' हे दोन्ही वग रघुवीर खेडकरांच्या तमाशात प्रचंड गाजले. या वगात मंचावर छोटी रेल्वेगाडी आणणे किंवा इंग्रजांच्या छावणीला जाळण्याचे 'पत्री सरकार' या वगातल्या दृश्यात चक्क आग लावणे, असे ट्रीक सीन होते. भांडे सरकार यांचे 'कायदा पैशाचा गुलाम नाही', 'काळ्या पैशाचे लाल हात' हेही वग तुफान चालले होते. सुधाकर पोटे यांचे 'आक्कू यादव' व उद्धव होवाळ यांचे 'कुठे गेली आईची माया?', 'कारगिल रणसंग्राम', 'काय दिले या स्वातंत्र्याने' या वगांनी सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली. यानंतर वगनाट्यलेखनाच्या परंपरेत शिवराम बोरगावकर यांचे चिरंजीव बाबुराव बोरगावकर हे नाव आता वगनाट्य परंपरेची शेवटची धुकधुक आपल्या पेनाच्या टोकावर पेलून उभे आहे.

महाराष्ट्र-कर्नाटक सीमारेषेवरचे चिकोडी, ता. बोरगाव अजूनही सीमावाद जिथे घोंगावतोय, तिथले बाबुराव बोरगावकर. बाबुराव यांचे गुरु व जन्मदाते शिवराम बोरगावकर गुरा-ढोरांना सांभाळत सीमारेषेच्या आडोशाने ढोलकी तुणतुण्याच्या नादाने पुरते वेडावले होते. पुढे गावातल्या डोडू अण्णाने. तुणतुणे-हलगी घेऊन दिले. तुणतुणे-हलगी व इतर साहित्य घेऊन शिवराम बोरगावकरांनी महाराष्ट्रात आपला तमाशा आणला व तो तमाशा त्या काळात प्रचंड नावारूपाला आला. त्यांचे कर्नाटकी हेल काढून मराठी बोलणे अफलातून होते. त्यांचाच मुलगा बाबुराव बोरगावकर शिकला सवरलेला, नाटकात व फिल्म्समध्ये करिअर करायला उत्सुक होता, पण सूर्यकांत - चंद्रकांत, निळूभाऊ, जगदीश खेबुडकर यांच्यासारख्या अनेक रंगकर्मींनी त्याला सांगितले की अरे, तुझ्याच घरात कला असताना कशाला बाहेर जातो? मग सुरू झाला बाबुराव बोरगावकरांचा तमाशातला लेखन प्रवास. वडिलांच्या तमाशातच त्यांनी वगाचे दिग्दर्शन व स्वतःला अपेक्षित असणारा 'शिक्षेला धनी कोण?' हा वग लिहिला. एका अर्थी तमाशाला एक उच्चशिक्षित वगलेखक लाभला. आज बाबुराव बोरगावकरांच्या वगनाट्य लेखनाला तब्बल पस्तीसावे वर्ष सुरु आहे. जवळजवळ पन्नासपेक्षा जास्त वगनाट्य लिहिणारे बाबुराव पुणेकर यांना मंगला बनसोड यांच्या तमाशा वगनाट्याच्या तालमीदरम्यान भेटता आले.

बाबुराव बोरगावकरांचे गाजलेले वग- उदा. 'कायद्याचे हात खिशापर्यंत', 'कुठे आहे ती लोकशाही', 'रक्ताने धुतला कलंक', 'दिल्या घरी सुखी राहा', 'जन्माला आला अतिरेकी', 'झुंजला शंभूराजे' इ. व त्यातले अनेक वग आजही तमाशात सुरु आहेत. आज तमाशाक्षेत्रातला वगनाट्याच्या परंपरेतला शेवटचा शिलेदार म्हणून त्यांचा उल्लेख करता येईल.

कधी काळी ज्या वगनाट्यांनी गावगाड्यातल्या लोकांना हसवले, कधी रडवले तर कधी श्रद्धेने पाया पडायला लावले. त्या वगनाट्याची शेवटची धुकधुक आता तमाशात उरली आहे. आता तमाशात लावण्या - रंगबाजी संपली की तंबूतले तरुण प्रेक्षक पांगायला लागतात. तुरळक वयोवृद्ध मात्र आजही वग संपेपर्यंत बसून राहतात. भैरवीचे सूर कानात साठवल्यानंतरच घराकडचा रस्ता धरतात अन मध्यानरात्रीची शुक्राच्या चांदणीची साक्ष ठेवून तमासगीर अंगाचं मुटकुळ करून कुणी तंबूत.... गाडीत... गावाने सोय केलेल्या उघड्या मैदानी शांत झोपी जातात. तमाशाचीही अर्ध्या रात्रीची शांत पायरव काळीज चिरणारी असते. तमाशाच्या सुवर्णकाळाच्या वर्खाखाली मात्र आजही जगताप पाटील पिंपळेकरांची शिवाजी वेषातली अनेक गावातून काढली जाणारी मिरवणूक ताजी असते. पुणे जिल्ह्यातल्या शिरोली गावातली दगडोबासाळी शिरोलीकर या तमासगीराच्या गावकऱ्यांनी नदीकाठी बांधलेल्या मंदिरातली ज्योत अजूनही तेवत असते. ...संत तुकारामांच्या भूमिकेतल्या दत्ता महाडिकांच्या आठवणी व श्रद्धेने त्यांचे पाया पडणारे आजही डोळ्यातल्या धुक्यात वैकुंठाला निघालेल्या तुकोबांसाठीचे व्याकुळ झालेले दिवस आठवतात. एक नाही तर अनेक आठवणींनी भारलेले ते दिवस! गावगाड्यातल्या अठरा पगड जातीच्या खांद्यावरून वाहत गेलेली ही कावड आपल्या बीजकोशात पंचक्रोशीतलं साती आसरांचं कलासक्त गाणं घेऊन थोडी थंडावली आहे. पण आज मराठी सारस्वतांच्या अंगणात या तमाशा कलावंतांसाठी कुणी 'दुरितांचे तिमिर सरो' ही प्रार्थना जरी आळवली नाही तरी चालेल, पण मराठी नाटकांचा झेंडा खांदाभर उंचावताना या सर्वहारांच्या लोककलेतली वगनाट्यांची एक मोठी परंपरा आहे, ही नोंद इमाने-इतबारे आपल्याला करून ठेवावीच लागणार आहे.



**नटसम्राट**
**कै. जगताप पाटील पिंपळेकर**

**- श्यामल गरुड**
shyamalmangesh@gmail.com

# लिओ टॉलस्टॉय यांची ॲना कॅरेनिना

धनंजय गांगल

लिओ टॉलस्टॉय या लेखक व विचारवंताची 'ॲना कॅरेनिना' ही जगातली एक श्रेष्ठ कादंबरी मानली जाते. कथानकाच्या अंगाने तिची वैशिष्ट्ये उलगडत जाणारा हा लेख.

**लि**ओ टॉलस्टॉय 'ॲना कॅरेनिना' या कादंबरीची सुरवातच अशी करतो All happy families are alike; but, each unhappy family is unhappy in its own way आणि पुढे एका unhappy फॅमिलीची, प्रिन्स स्टीफन ओब्लँस्की आणि डॉली या दांपत्याची कथा ऐकवत तो आपल्याला कादंबरीत खेचतो आणि गुंगवून टाकतो.


'ॲना कॅरेनिना' ही टॉलस्टॉय याची कादंबरी १८७३ ते ७७च्या दरम्यान, 'द रशियान मेसेंजर' या मासिकात, मालिका स्वरूपात प्रसिद्ध झाली. 'वॉर अँड पीस' ही त्याची गाजलेली कादंबरी याआधीची म्हणजे १८६३ ते १८६९ दरम्यान लिहिलेली. 'वॉर अँड पीस' ह्या कादंबरीमुळे एकोणिसाव्या शतकातला श्रेष्ठ कादंबरीकार म्हणून त्याचा ठसा उमटला होताच, पण 'ॲना कॅरेनिना' ह्या कादंबरीने यावर शिक्कामोर्बत केले. 'ॲना कॅरेनिना' ही आजही जगातली एक सर्वश्रेष्ठ कादंबरी समजली जाते. दोस्तोवस्की, गोगोल, तुर्गनेव, लेर्मोनतोव हे त्याचे समकालीन.

१८६०-७० च्या दशकात रशियात अनेक आर्थिक, सामाजिक घटना घडत होत्या. १८६१ साली झार अलेक्झाण्डर -२ ने रशियात सामाजिक आणि आर्थिक असे बरेच बदल घडवले. मुख्य म्हणजे वेठबिगारी संपुष्टात आणली, पण जमिनदारांच्या जोखडातून मुक्त झालेल्या या श्रमिकांकडे स्वत:ची अशी जमीन आणि शेतीसाठी काहीच भांडवल नव्हते. त्यामुळे पुन्हा त्याच जमिनदारांकडे मजूर म्हणून त्यांना काम करावे लागले. हे नवीन नातं दोघांसाठीही त्रासदायक होतं. स्वातंत्र्य मिळूनही ते उपभोगता येत नसल्याचा असंतोष या नवीन श्रमिकांमध्ये होता.

त्याच सुमारास दुसरीकडे पाश्चात्त्य युरोपच्या प्रभावामुळे आधुनिकीकरण आणि औद्योगिकीकरणाचे वारे रशियाच्या दिशेने वाहू लागले होते. युरोपातील लोकशाही, वैचारिक स्वातंत्र्य आणि सामाजिक बदल यांचा प्रभाव रशियावरही पडू लागला होता. रशिया या सगळ्याच स्थित्यंतरांमध्ये उर्वरित युरोपपेक्षा खूप मागे होती. रशियन बुद्धिवंतांची वैचारिक फरफट होत होती. खुद्द टॉलस्टॉय या सगळ्या बदलांच्या बाबतीत साशंक होता. विशेषतः औद्योगिकीकरणासोबत येणारे शहरीकरण, त्यातली अंतर्भूत यांत्रिकता आणि माणसाचे जमिनीपासून तुटणारे नाते हे सगळं त्याला भयंकर वाटत होतं. दुसरीकडे देव, धर्म आणि श्रद्धा यातील वैचारिक द्वंद्वही त्याच्या मनात चालू होते. या पार्श्वभूमीवर टॉलस्टॉयने ॲना कॅरेनिना लिहिली. एकप्रकारे अनेकांना ही कादंबरी त्याचं वैचारिक, मानसिक आत्मचरित्र वाटतं.

प्रिन्स स्टीफन ओब्लँस्की (स्टीव्ही) हा मॉस्को गव्हर्मेंट बोर्डाचा प्रमुख आहे. त्याच्या घरी त्याच्या मुलांना शिकवण्यासाठी ठेवलेल्या फ्रेंच गव्हर्नेसशी असलेले त्याचे संबंध नुकतेच त्याची पत्नी डॉली हिला समजले आहेत. त्यावरून त्यांचे भांडण झाले आहे आणि डॉलीने मुलांसकट घर सोडण्याची धमकी दिली आहे. बभ्रा झाला तर! त्याच्या समाजातील स्थानाला धक्का देणारे हे सगळं प्रकरण आहे. त्यासाठी तो डॉलीची क्षमा याचनाही करून बघतो. त्याचा अपराधीपणा हा आपण पकडलो गेलो यासाठी जास्त आहे. शिवाय डॉलीची टोकाची प्रतिक्रिया त्याला अनपेक्षित होती, पण एकूणच डॉली बधत नाही. खरं तर आतापर्यंत अगदी त्याच्या मनासारखं त्याचं आयुष्य पुढे जात असतं. जमिनदारी, समाजात मान, मोठा हुद्दा. आदर्श लेकुरवाळी पत्नी. तिला कुणकुण न लागलेले पण फ्रेंच गव्हर्नेसशी असलेले संबंध. मित्र, पार्ट्या, बौद्धिक चर्चा! सगळं छान चालू असतं. शिवाय उद्या त्याची लाडकी बहीण ॲना (कॅरेनिना) येणार असते. ॲना, पती काउन्ट सोबत सेंट पीटर्सबर्ग येथे राहते. काउन्ट हा सरकारदरबारी मंत्री पदावर आहे आणि ॲनापेक्षा जवळपास दोन दशकांनी मोठा आहे. त्यांना सर्गी नावाचा आठ-नऊ वर्षाचा मुलगाही आहे. या दाम्पत्याचा उच्च वर्तुळात वावर आहे. ॲनाचे देखणेपण, वागणं याची मोहिनी आणि कौतुक त्या वर्तुळात आहे.

घरचं भांडण मागे ठेवून स्टीव्ही रोजच्यासारखं त्याच्या कार्यालयात जातो. तेथे त्याला त्याचा गावाकडील मित्र लेव्हीन




अचानक भेटतो. लेव्हीन हा त्याला भेटायला त्याच्या गावाहून मुद्दाम आला आहे आणि त्याचे कारणही विशेष आहे. स्टीव्हीची पत्नी डॉली, हिची लहान बहीण किटी (वय अठरा). तिच्या प्रेमात लेव्हीन पडला आहे आणि ते प्रकरण पुढे नेण्यात त्याला स्टीव्हीची मदत हवी आहे. किटी आणि लेव्हीन एकमेकांना ओळखतात आणि त्यांची मैत्रीही आहे, पण भावी पती म्हणून किटीला लेव्हीन फारसा पसंत नाही. तिचे मन जडले आहे काऊंट व्होन्स्की या श्रीमंत तरुण तडफदार लष्करी अधिकाऱ्यावर! याचा अंदाज स्टीव्ही लेव्हीनला देतो. लेव्हीनच्या आयुष्यात त्या दिवशी अनेक घटना घडतात. लेव्हीन त्यानंतर आपला भाऊ सर्गियस आणि त्याच्या प्राध्यापक मित्रांना भेटतो. त्यांच्या बौद्धिक चर्चेत तो एकटा पडतो. मग किटी आणि तिची आई यांना भेटतो. किटी त्याला नकार दर्शवते. नंतर पाहुणी म्हणून आलेली काउन्टटेस नोरडस्टन तर त्याच्या गावरान वागण्याची थट्टा उडवते. शेवटी किटीचे मन जडले आहे तो काऊंट व्होन्स्की, याचीही भेट होते. त्याचे व्यक्तिमत्त्व बघून लेव्हीनला न्यूनगंड येतो. आपण या जगात शोभत नाही आणि या विचाराने अत्यंत विषण्ण मनाने तो परत घरी जातो. तिथे आपले घर, जमीन, कुटुंब, शेतमजूर ह्यात त्याला हायसं वाटतं. तो पुन्हा अशा उच्च वर्तुळात न जायचं ठरवतो आणि मनोमन लग्नाच्या फंदात न पडण्याचा निर्णय घेतो. काऊंट व्होन्स्की किटीमधे स्वारस्य दाखवतो, तरी ते त्याच्याकडून तात्पुरतंच असतं. त्यापलीकडे किटीसोबत नातं वाढवण्यात त्याला रस नाही, पण किटी आणि लेव्हीन यांना त्याची कल्पना नसते. किटी आणि लेव्हीन हे पुन्हा पुढे एकत्र येणार असतात. हे सगळेच प्रसंग टॉलस्टॉय याने अत्यंत सूक्ष्मपणे रेखाटले आहेत. अगदी शाही जेवणाचे शिष्टाचारही खूप तपशीलात सांगितले आहेत.

ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी स्टीव्ही आपल्या बहिणीला ॲनाला आणण्यासाठी रेल्वे स्टेशनवर येतो. त्याचवेळेला किटीचं मन ज्यावर जडले आहे तो काऊंट व्होन्स्की ही आपल्या आईला आणण्यासाठी रेल्वे स्टेशनवर येतो. योगायोगाने ह्या दोघी एकाच डब्यात सहप्रवासी म्हणून असल्यामुळे त्यांची ओळख झालेली असते. इथे पहिल्यांदा काऊंट व्होन्स्की ॲनाला बघतो, भेटतो आणि तिच्या प्रेमात पडतो. दुसरीकडे रुबाबदारपणा आणि शिष्टाचार यामुळे व्होन्स्कीही ॲनाच्या मनात भरतो. याच सुमारास रेल्वे स्टेशनवर थोडी खळबळ उडते. कोणीतरी गाडीखाली येऊन मृत्यू झाल्याची बातमी असते आणि तो अपघात की आत्महत्या हे नक्की कळत नाही. यावरून या चौघांमध्येही चर्चा होते. आयुष्यात असं काय घडतं की मनुष्याला आत्महत्या करावीशी वाटते? असा प्रश्न ॲनाला पडतो. दैवदुर्विलास असा की कादंबरीचा शेवटही तिच्या रेल्वेगाडीखालील आत्महत्येत होतो! १८६०/७० च्या काळात रेल्वे युरोपात आणि रशियात नवीन होती. ती आधुनिकीकरण आणि औद्योगिकीकरणाचे प्रतीक होती तर गाडीखाली आत्महत्या हे या औद्योगिकीकरणामुळे उध्वस्त झालेल्या जुन्या संस्कृतीचे प्रतीक!

रेल्वे स्टेशनवरून स्टीव्ही आपल्या बहिणीला- ॲनाला घरी घेऊन येतो. तेथे ती डॉलीला स्टीव्हीबरोबरचं नातं-लग्न न तोडण्याचा सल्ला देते. हो-नाही करत डॉली ते मान्य करते. पुढचा दिवस ॲना डॉली-स्टीव्हीबरोबर त्यांच्या घरी राहते. यादरम्यान काही-ना-काही कारणांनी काऊंट व्होन्स्की आणि ॲना यांच्या भेटी होतात. हळूहळू काऊंट व्होन्स्की आणि ॲना एकमेकांच्या जवळ येतात आणि प्रेमात पडतात. त्यांची जवळीक किटीलाही लक्षात येते. काऊंट व्होन्स्कीशी लग्न करायचं आपलं स्वप्न भंगल्याचं तिच्या लक्षात येतं. ती उद्विग्न होते आणि या धक्क्याने आजारी पडते. इकडे काऊंट व्होन्स्कीच्या प्रेमातून ॲना सावरते. तिला आता एकदम अपराधी वाटू लागतं. ती काऊंट व्होन्स्कीला टाळण्यासाठी तातडीने सेंट पीटर्सबर्ग येथे आपल्या घरी निघून येते आणि पुन्हा आपल्या संसारात, उच्च वर्तुळात मन रमवू पाहते. इकडे तिच्या प्रेमात वेडा झालेला काऊंट व्होन्स्की तिच्या मागोमाग सेंट पीटर्सबर्ग येथे दाखल होतो आणि वारंवार तिला भेटून प्रेम-याचना करतो. ती सुरुवातीला त्याला नकार देते, पण प्रत्यक्षात ती अनेक मानसिक आंदोलनातून जात असते. एकीकडे काउंट कॅरेनिनशी असलेला यांत्रिक संसार. फक्त समाजाला दाखवण्यासाठी! दुसरीकडे व्होन्स्कीशी रोमँटिक नातं. हळूहळू ती काऊंट व्होन्स्कीकडे ओढली जाते. आता त्यांचे प्रेमसंबंध आणि गाठीभेटी ह्या त्यांच्या वर्तुळात कुजबुजीचा विषय झालेला असतो. एकाच तथाकथित प्रमादाकडे बघण्याचा समाजाचा

दृष्टिकोन हा स्त्री आणि पुरुष यांच्यासाठी वेगवेगळा असतो. स्टीव्हीच्या प्रेमप्रकरणाबद्दल त्याच्या पत्नीने- डॉलीने त्याला माफ करून जुळवून घ्यावं असं सर्व साधारण मत असतं. पण तशाच प्रेमप्रकरणाबद्दल ॲनाकडे मात्र गुन्हेगार म्हणून बघितले जाते. ती एकटी पडत जाते. काउंटलाही हे लक्षात येतं. तो ॲनाला हे संबंध तोडून टाकण्याचे फर्मान देतो. त्यात ॲनाच्या काळजीपेक्षा समाजात बभ्रा होण्याची चिंता जास्त असते. दुसरीकडे काऊंट व्होन्स्कीच्या कुटुंबाला ॲना प्रकरणामुळे त्याच्या कारकीर्दीवर परिणाम व्हायला नकोय म्हणून तेही व्होन्स्कीने ॲनाशी संबंध तोडावेत म्हणून त्याच्या मागे लागतात, पण काऊंट व्होन्स्की आणि ॲना एकमेकांपासून दूर जाऊ शकत नाहीत. पुढे ते एकमेकांच्या खूप जवळ येतात आणि ॲना व्होन्स्कीपासून गर्भवती राहते.

काऊंट व्होन्स्कीशी लग्न करायचं स्वप्न भंगल्याने आजारी पडलेल्या किटीला तिचे कुटुंबीय प्रकृती सुधारण्यासाठी जर्मनीला एका स्पामधे पाठवतात. तिथे तिची ओळख व्हारेन्का या धार्मिक वृत्तीच्या स्त्रीशी होते. तिच्या प्रभावामुळे किटीही श्रद्धा, देव, अध्यात्म याचा विचार करू लागते. आपलं आकलन कमी पडतंय हेही तिच्या लक्षात येते, पण ते करताना तिला स्वतःच स्वतःची वेगळी ओळख पटते. पुन्हा सकारात्मक आयुष्य जगण्याचं ठरवून ती तो स्पा सोडून घरी परतते. दुसरीकडे लेव्हीन गावाकडे आपल्या शेतीवर लक्ष केंद्रित करतो. तो शेतीत स्वतः राबतो. नवीन-नवीन प्रयोग करतो. मजुरांशी वेगवेगळ्या प्रकारे संवाद साधतो. काहीवेळा यशस्वी होतो, काही वेळा अयशस्वी! दारूच्या आहारी गेलेल्या आपल्या एका भावाचा मृत्यू तो जवळून बघतो. पुढे योगायोगाने किटी आणि लेव्हीन यांची भेट होते. लेव्हीनला लग्नासाठी नकार देण्याची आपली चूक किटीला लक्षात येते. स्टीव्ही, डॉली यांच्या पुढाकाराने किटी आणि लेव्हीन यांचे लग्न होते. आंबट-गोड सुरुवात होऊन पुढे ते सुखी दाम्पत्य जीवन जगतात.

काऊंट व्होन्स्की, काउंट कॅरेनिन आणि ॲना हे तिघेही वेगवेगळ्या प्रकारे आपल्या नात्याची पुनर्मांडणी करण्याचा प्रयत्न करतात. समाजात काउंटबद्दल सहानुभूती, काऊंट व्होन्स्कीबद्दल कौतुक आणि ॲनाबद्दल मात्र नापसंती, तिरस्कार आहे. जुने बंध तोडवत नाहीत आणि नाविन्याचे आकर्षण सुटत नाही अशा द्विधा मनःस्थितीत ॲना आहे. ती सतत अनेक मानसिक आंदोलनातून जाते. विवाहित स्त्रीवर अन्यायकारकपणे लादलेले त्यावेळचे घटस्फोटाचे कायदे, चर्चचे नियम आणि समाजाचे अलिखित पायंडे यामुळे गुंतागुंत वाढतच जाते. एका टप्प्यावर ॲना काऊंट व्होन्स्कीला आर्जवते Everything is finished. I have nothing but you now. Remember that. यातून मार्ग काढण्यासाठी काउंट कॅरेनिन मोठ्या मनाने दोघांना माफ करतो. आणि घटस्फोट घेऊन दोघांसाठी मार्ग मोकळा करण्याची सुरुवात करतो. व्होन्स्की ॲनासाठी त्याच्या कारकीर्दीला पुढे घेऊन जाणारी एक संधी सोडून देतो. दोघांना समाज एकप्रकारे वाळीत टाकतात. हा सर्व ताण असह्य होऊन आत्महत्येचा अयशस्वी प्रयत्नही करतो. काउंट कॅरेनिन ख्रिश्चॲनिटीकडे वळतो. त्याचा परिणाम म्हणून आपले घटस्फोटासाठीचे सहकार्य मागे घेतो. ॲना व्होन्स्कीच्या अधिकृत लग्नाचा मुहूर्त पुन्हा लांबवणीवर पडतो. सहज भेटायला गेलं असताना डॉली आणि किटीकडूनही ॲनाला कोरडा प्रतिसाद मिळतो. एकाकी पडल्यामुळे आता ॲना व्होन्स्कीकडून जास्त-जास्त सहवासाची मागणी करते. काही वेळा ती खोटं बोलून त्याला कामातून अर्ध्यात घरी बोलवून घेते. व्होन्स्कीला याची आता कटकट आणि मनस्ताप होऊ लागतो. त्या दोघांच्यात खटके उडू लागतात. तिच्यामुळे आपली लष्करी कारकीर्द लयास गेली या समजुतीने व्होन्स्की तिचा तिरस्कार करू लागतो. तिला टाळू लागतो. या जगात आता आपण एकाकी पडलो आहोत या भावनेने ॲना पछाडते आणि एका निर्णायक क्षणी हताश होऊन ती आपलं आयुष्य संपवण्याचा निर्णय घेते. कादंबरीच्या सुरुवातीला ज्या रेल्वे अपघात-आत्महत्येवर ॲना भाष्य करते. त्याच रेल्वे खाली जीव देऊन ती आपलं आयुष्य संपवते! नाट्याच्या दृष्टीने कादंबरी इथेच संपते. टॉलस्टॉय मात्र काही पाने पुढे कादंबरी चालू ठेवतो. त्यात थोडक्यात व्होन्स्की, किटी आणि लेव्हीन यांच्या पुढील जीवनातील काही घटना नोंदवतो.

स्ट्रीम ऑफ कॉन्शसनेस म्हणजे एकाच-वेळी अनेक विचार मनात येणे. टॉलस्टॉयने याचा वारंवार वापर केला आहे. यानिमित्ताने कादंबरीतील पात्रांकरवी तो आपले विचार मांडतो. जमीन, शेती, गुलामी, निसर्ग, आधुनिकीकरण, औद्योगिकीकरण, स्त्री-पुरुष संबंध, नैतिकता, देव, चर्च, मृत्यू अशा अनेक विषयांवर त्याच्या कादंबरीतील पात्र विचार करतात. तर कधी ती एकमेकांशी चर्चा करतात. वादही घालतात. व्यक्तिस्वातंत्र्य आणि लग्न-बंधन यांच्यातील विरोधाभास आणि त्याच्या अनेक छटा टॉलस्टॉय अलगद उलगडून दाखवतो. प्रिन्स स्टीफन ओब्लँस्की-डॉली, काउन्ट कॅरेनिन-ॲना, काऊंट व्होन्स्की आणि लेव्हीन-किट्टी यांच्याभोवती तो सगळी कादंबरी रचतो. एक दाम्पत्य टोकाचे मतभेद असूनही जुळवून घेते. एक दाम्पत्य उध्वस्त होतं. तर लेव्हीन-किट्टी सुरवातीला दूर जाऊन मग एकत्र येतात.

जगभर अनेक भाषांत तिची भाषांतरे झाली आहेत. सुरुवातीला अनेक ऑपेराज, क्वचित नाट्य-रूपांतर आणि अनेक भाषात अनेक टीव्ही-मालिका आणि चित्रपट या कादंबरीवर निघाले आहेत. गेले दीड शतक ही कादंबरी जगभरच्या वाचकांना, प्रेक्षकांना भुरळ पाडत आहे आणि पुढेही अनेक दशकं ती भुरळ पाडेल यात शंका नाही.

**– धनंजय गांगल**


भ्रमणध्वनी : ९८२१०३२८३०

dhananjay.gangal@gmail.com

# गिरणगावचा विठू

संजीव सावंत

**आपल्या जवळच्या माणसांच्या माणूसपणाचा अनुभव आपण सतत घेतो मात्र त्याला दाद देणे अनेकदा राहून जाते. महेंद्र पवार या दिलदार माणसाचे हे त्यांच्या मित्राने रेखाटलेले व्यक्तिचित्र.**



**ला**लबाग-परळ म्हणजे कामगारवर्गातील अठरापगड कलावंताची दुनिया. या गिरणगावाने सोन्याचा धूर पाहिला. इथल्या कापडगिरण्या आपल्या देशाचा आर्थिक कणा होता. पारंपरिक उत्सव, कुस्ती, तमाशा, नाटके, दहीहंडी, असंख्य मोर्चे, अनेक वक्ते, ते अगदी बदलत्या तरुणाईपर्यंत सगळे अनुभव इथल्या वस्तीने घेतले आहेत. जसे अनेक कलावंत, गायक होते तसेच सामाजिक कार्यकर्ते या मातीने दिले आहेत. त्यातलाच एक आमचा कार्यकर्ता मित्र. असंख्य मित्रांचा, हितचिंतकाचा आणि चिंताग्रस्त लोकांचा सतत आधारवड बनून राहिलेला. कुठल्याही कामाला कधीही नाही न म्हणणारा, किंबहुना 'तुझे काम होईलच' हा आशावाद सतत जिवंत ठेवणारा! हा आशादायी झरा म्हणजे महेंद्र पवार. खरे तर कुठलाही पाठिंबा (आर्थिक, सामाजिक) नसताना एकखांबी तंबूत असंख्यांना सामावून घेणारा! अप्रूप एकाच गोष्टीचे वाटते, की हा ऊर्जामयी झरा तो जोपासतो कसा! सतत बोलणे, सतत दुसऱ्यांची कामे करत रहाणे, नवनवीन संकल्पना घेऊन जगणे, कसे जमते त्याला?

साधारण १९८५ मध्ये हा सावळा गोंधळी (महेंद्ररूपी विठ्ठल) मला रूपारेलच्या प्रांगणात भेटला. खरे तर मी लॉ कॉलेजमध्ये आणि तो बी.ए. करत होता. कुठल्याही विषयाशी काहीही संबध नसताना आम्ही नकळत मित्र झालो. रूपारेलच्या कॅन्टिनमध्ये तासन्‌तास आमच्या गप्पा रंगत. कम्युनिस्टांपासून समाजवाद, बौद्धिकवाद आणि शेवटी पोटासाठी घातलेला वाद! तो मग वडापाव खाऊनच शमत असे. त्याचे काही मित्र, विनायक पडवळ, क्रांती बांदेकर आणि चळवळीतील काही मित्र अशी मैफल कायम जमायची. सतत नवनवीन विषयांचा त्याच्याकडे राबता असे. नाटक म्हटले की त्याला स्फूर्ती येत असे.


त्याच्या १३ साफल्य या करीरोड येथील घरी गेल्यावर तिकडचा दिसणारा परिसर म्हणजे जुन्या मुंबईची झलकच होती. बाजूलाच काम गारसम्राटांचे ऑफिस, सतत वर्दळ, अगदी २४ तास तो संपूर्ण परिसर जागा असे. हा गिरणगाव कधी झोपतच नसे. मला आठवते, महेंद्रच्या घरासमोरचा गावठी दारूचा एक धंदा होता. फार जुना अड्डा आणि नावाजलेला दादा. त्यांच्या दोन गटांतल्या मारामाऱ्या, त्याने आणि त्याच्या आईने 'याचि देही याचि डोळा' कित्येक वेळा पाहिल्या. तो प्रकार बंद करायचे धाडस कुठून आले माहीत नाही, पण त्याने ते थांबवले. कदाचित याने त्याला धीरोदात्त बनवले असेल.

त्याची 'रविकिरण' नाट्यसंस्था आणि त्यात असणारे त्याचे मित्रमंडळ, सतत स्फूर्तीने काम करणारे त्याच्या मंडळाचे असंख्य हात, हा एक चिरंतन विषय आहे. त्यांची 'ढोल वाजतोय' ही एकांकिका अतिशय गाजली. त्यातून विजय टाकळेसारखे लेखक आणि अविनाश नारकरसारखे कलावंत उदयास आले. महेंद्रची सतत धडपड्या स्वभावाची वृत्ती आणि माणसे जमवण्याची, ती बांधण्याची त्याची हौस ह्याला तोड नाही. मी लॉ कॉलेजचा कल्चरल सेक्रेटरी असताना त्याने एकांकिकेत काम करणाऱ्या कलावंतांचा मेकअप स्वत: केला होता आणि मेकअपमनचा भत्ता संध्याकाळी मित्रांसोबत खर्च केला होता.

त्याच्या करीरोडच्या घरी बऱ्याच वेळा जाणे होत असे. त्याच्याबरोबर कित्येकदा त्याच्या तीर्थरूपांना मिलमध्ये डबा देण्यासाठी आम्ही दोघे जात असू. त्यावेळी ते मिलकामगार आणि त्यांची असणारी एकंदरीत आर्थिक ओढाताण जवळून अनुभवली. मिलकामगार हा अतिशय कष्टकरी पण प्रामाणिकपणे आपले काम चोख बजावणारा. याच भागात अतिशय हौसेने नाटक बसवणारे कलावंत होते. तमाशाचा फडही इथे रंगायचा तसाच कुस्तीचा फडही उत्साहात रंगायचा. दिवाळी तर पाहण्यासारखी होती. मराठी सणवार अगदी नित्यनेमाने उत्साहात होत असत, आजही होतात. परंतु गिरणगावच्या त्या दिवाळीची सर आता नाही. आता ही अप्पर वरळी झाली आहे. आजूबाजूला गगनचुंबी इमारती आणि जीभ अवघडेल अशी तिथल्या रेस्तराँची नावे. या नव्या खुणा आधी अस्तित्वात असलेल्या गिरणगावाची दुनिया कुठेतरी लुप्त करून टाकतील असे वाटते.

याच वस्तीत कलेवर आणि साहित्यावर नितांत भक्ती असणारे अनेकजण निपजले नि याच वस्तीत हा माझा सावळा गोंधळी मला सापडला. सतत प्रयोगशील आणि सळसळता उत्साह असणारा आणि कुठल्याही विषयावर त्याच्याकडे हमखास उत्तर असणार! सतत बोलणारा प्रत्येक प्रश्नाची गुरुकिल्ली याच्याकडेच हा त्याचा आत्मविश्वास कायम!







**महेंद्रचे मित्र व चाहते – दीपक राजाध्यक्ष, संजीव सावंत, सुचित्रा व आदेश बांदेकर आणि सुमीत राघवन**

एक प्रसंग आठवतो. साधारण ऑक्टोबर १९९८ला आमच्या परिचयाची डॉक्टर मैत्रीण कॅलिफोर्नियाहून आली होती. तिच्या वडिलांची कम्बाला हिल हॉस्पिटलमध्ये हार्ट सर्जरी झाली होती. सर्जरीनंतर गुंतागुंत झाल्याने अचानक रक्ताची गरज लागली आणि त्वरित ब्लड डोनर हवे होते. मी नेहमीप्रमाणे माझ्या विठू सावळ्याला फोन केला. त्याने त्याच दिवशी अख्खी रक्तदात्यांची टीम उभी केली. वेळेवर रक्तदाते आले आणि संपूर्ण मदत केली.

महेंद्रचा आणखी एक प्रकल्प म्हणजे समस्त गरजू पेशंटांना हॉस्पिटलमध्ये ॲडमिशन मिळवून देणे. केईएम हॉस्पिटलपासून ते उच्च दर्जाच्या हॉस्पिटलमध्ये सर्वत्र याची ओळख. असाच एक प्रसंग. एक गरीब पेशंट चिपळूणहून आलेला. अंगावरच्या कपड्याव्यतिरिक्त, एका वेळच्या जेवणाचेही पैसेही त्याच्याकडे नव्हते. कोणीतरी त्याला महेंद्रचे नाव सांगितले व त्याने महेंद्राला फोन केला. नंतर सगळेच चित्रच बदलले. परळच्या महापालिकेच्या हॉस्पिटलमध्ये त्या पेशंटची कोणी विचारपूसही करत नव्हता, तिथे थेट महापौरांचा फोन आला आणि पुरते हॉस्पिटल चक्रावून गेले. पेशंटची आत्यंतिक काळजी घेतली गेली. त्या पेशंटला हा कोणीतरी जादूगार असावा हा भास झाला.

फलटणची एक ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ती आणि त्यांचे कित्येक वर्षे प्रलंबित असलेले काम याच्या कानावर आले. जे-जे कायद्याच्या कक्षेत बसेल त्याप्रमाणे त्यांचे काम त्याने करून दिले आणि त्यांच्या त्या संस्थेला सरकार दरबारी पोचपावती मिळवून दिली. कोणालाही मदत करणे हा त्याचा स्थायीभाव. कोणाची के.जी.ची ॲडमिशन असो वा तत्सम, याच्याकडून कायम असे उत्तर येते की 'काम होणार. मी प्रयत्न करतो.'

गिरणगावात असणाऱ्या सगळ्या कार्यक्रमांना त्याची आवर्जून हजेरी असे. अनेक सामान्य त्याला भेटत. जणू सामान्यांच्या कामासाठीच तो वेगवेगळ्या कार्यक्रमांत सहभागी होत असे. खरे म्हणजे त्याचे गुपित म्हणजे याची ओळख त्याला करून देणे. आणि दोघांची योग्य गाठ करून देणे. ह्यांचा मेळ बसला की हा दुसरे काम करण्यास मोकळा. हे सर्व करणे त्याला नि:स्वार्थपणे आणि कुठलाही मोबदला न घेता जमले.

आमच्यातील अनेक मित्रांची आणि ओळखीच्यांची त्याने पळवून लग्ने लावली आहेत. त्याच्याच साफल्य बिल्डिंगमध्ये जिथे तो आधी राहायचा तिथल्या अनेक प्रेमीयुगुलांचा विवाह त्याने करून दिला. घरच्यांचा विरोध असला की महेंद्र तिथे हजर. कायदेशीर लग्न कसे करायचे हे कायद्याचा अभ्यास न करता त्याला जमले होते. एकदा, तो मला कॉलेजमधून काही काम आहे म्हणून ना.म. जोशी मार्ग पोलिस स्टेशनला घेऊन गेला. त्याच्याच साफल्य बिल्डिंगमध्ये राहणाऱ्या मित्राचे लग्न वैदिक पद्धतीने करून कायदेशीर रीतीने पोलिस स्टेशनला कळवले होते. मुलीच्या घरच्यांचा कट्टर विरोध होता. आता मुलीच्या कुटुंबीयांकडे



**महेंद्र पवाराचा (विठू सावळा) सन्मान करताना विनोद पवार, दत्ताजी देसाई व त्यांच्या पत्नी**

कोण जाणार हा प्रश्न. त्याने मला विनंती केली. मी कोर्टाचा समन्स (गेल्याचे मला सांगितले होते) होऊन नववधूच्या घरच्यांना समज द्यायला गेलो की तुमच्या मुलीने कायदेशीर विवाह केला आहे आणि आपण तिची वाट पाहू नये. मी ते त्या नववधूच्या घरी सांगून कसाबसा निघालो. नंतर कळले की हे काही कोर्टाचे समन्स किंवा तत्सम काही नव्हते तर केवळ एक Content Affidavit Cum Declarections होते. आणि ते केवळ एका बंद लिफाफ्यात होते. एक आवर्जून सांगावेसे वाटते, की त्याने पळवून केलेली सगळी लग्ने यशस्वी आहेत. प्रसिद्ध कलाकार ज्यांना झी मराठीवर भावोजी म्हणून ओळखले जाते, त्यांचे लग्न यानेच आणि याच पद्धतीने जुळवून आणले.

असाच एक जुहू कोळीवाड्यातील किस्सा. आमच्या मित्राच्या मित्राने पळून जाऊन लग्न करण्याचा बेत आखला. मुलाच्या घरचे राजी होते पण मुलीच्या कुटुंबीयांकडून जोरदार निषेध. सगळे कायदेशीर सोपस्कार करून पळवून लग्न केले. मॅरेज सर्टिफिकेट घेऊन आता कोणालातरी त्या मुलीच्या आईवडिलांकडे जाणे भाग होते. आमचा मित्र बजरंग त्या आईवडिलांकडे (मुलीच्या) गेला आणि त्यांना कायदेशीर समज देऊन त्यांच्या घराबाहेर येताच, त्यांच्या दरवाजापाशी आलेल्या गटारात पडला. ते अवर्णनीय दृश्य पाहण्यासारखे होते. जे आईवडील मुलगी पळून गेली म्हणून रडत होते तेच आईवडील आमच्या मित्राचे पाय धुऊन काढत होते. आमचा मित्र पूर्ण भिजला होता. संपूर्ण जुहू कोळीवाडा ते पाहायला हजर होता. आम्ही कोपऱ्यात दबा धरून बसलो होतो आणि काय होईल या चिंतेत होतो. आज आठवले की हसू फुटते. आमचा बंजरग मित्र पोलिसखात्यात मोठ्या हुद्यावर आहे आणि परदेशी ट्रेनिंग घेऊन आज तो International Cop. आहे.

आमची रूपारेल कॅन्टिनमध्ये गाण्याची मैफल रंगत असे. त्यात महेंद्रचा विनोद आणि त्याचा आवडता विषय म्हणजे विडंबनपर गीत. शब्दांच्या कोट्या करणे हा त्याचा विशेष प्रांत. साधारण त्या न कमावत्या काळात रूपारेल कॉलेजमध्ये आमचा अर्धा दिवस कॅन्टिनमध्ये जात असे.

एके दिवशी सकाळी फोन खणाणला. 'महेंद्रचे वडील गेले'. आम्हाला मित्रत्वाने वागवणारे महेंद्रचे वडील आषाढीवारीला गेले असताना स्वर्गवासी झाले. आम्ही सगळे मित्र त्याच्याकडे पोहोचले. महेंद्र ओक्साबोक्सी रडत होता. वडिलांवर त्याचे नितांत प्रेम. त्यानंतर त्याची आर्थिक स्थिती दोलायमान होती, पण कधी कुठल्याही मित्राच्या मदतीची अपेक्षा त्याने केली नाही. वेळप्रसंगी रस्त्यावर वह्या विकल्या. मी त्याला १९८६-८७ ला करीरोडच्या मेच्या दुपारच्या दोनच्या उन्हात वह्या विकताना पाहिले आहे. कारण मी त्याच्याबरोबर तासन्तास तिथे उभा राहून गप्पा मारत असे. भूक लागली तर पाठीमागे विष्णुपंताची मिसळ खाणे म्हणजे स्वर्गीय आनंद. ही मिसळ जॉर्ज फर्नांडिस यांच्यापासून अनेक मोठ्या कामगार आणि इतर नेत्यांनी चाखली आहे. असो.

या अखंड परिश्रमानंतर त्याला सरकारी नोकरी लागली आणि आता तरी त्याचा हा समाजसेवेचा छंद सुटेल असे वाटले, पण तो तर अजून जोमाने काम करू लागला. ऑफिस सुटल्यावर संध्याकाळी त्याचे अथक सोशल वर्क सुरू झाले. कोणाला काही सुचवणे तर काही जणांकडून काहीतरी क्रिएट करून घेणे. थोडक्यात, समोरच्या व्यक्तीला कामाला लावणे. कोणी काही लिहीत असेल तर त्याला प्रोत्साहन देणे (त्याच्या सततच्या प्रोत्साहनाने डॉ. नीना सावंत यांची पुस्तके सुदेशने, ग्रंथालीने प्रकाशित केली) तसा हा रिंगमास्टर आहे. विदुषकापासून त्या सर्कशीत काम करणाऱ्या असंख्य कलाकारांचे काम तो सहजी एकटा करत असतो आणि ते न थकता. आयुष्य हे सत्कारणी लागावे आणि अवतीभवती असलेल्या लोकांना आपल्या प्रचंड ऊर्जेद्वारे तेवत ठेवावे हे काम तसे सोपे नाही. सतत गर्दीत राहणे आणि लोकांच्या कामी पडणे हा वारसा त्याने या गिरणगावातून घेतला असावा.

सार्वजनिक, सांस्कृतिक कार्यक्रमात जी जी काही मदत करता येईल ती त्याने केली. खरे म्हणजे याबाबतीत त्याचा उत्साह हा दांडगा आहे. त्याची दुनियादारी ही सामान्य माणसासाठी फारच न्यारी आहे. अशी त्याची ही दुनियादारी अविरत चालत राहो.

त्याच्या या सततच्या क्रियाशीलतेला आणखी एक जिवंत झरा सापडला आणि या दोघांनी रसिक प्रेक्षकांसाठी सुंदर कार्यक्रम दिले. खरे तर हे रसिकांसाठी वरदानच ठरले. विनोद पवार नावाच्या सुपीक मेंदूतून नवनवीन संकल्पना आल्या आणि महेंद्र पवारने त्या उचलून धरल्या. समाजातील कलागुणांना या दोघा पवारांनी यथायोग्य वाव त्यांच्या कार्यक्रमातून दिला. समाजाचे थोड्याफार प्रकारे का होईना यांनी सांस्कृतिक दायित्व स्वीकारलेले आहे. त्यांचे 'दिवाळीपहाट ते चैत्रचाहूल' हे कार्यक्रम पाहून त्यांची समाजासाठी काहीतरी करण्याची घालमेल दिसून येते. थोर साहित्यिक भैरप्पा यांच्याशी संवाद ते अशा विविध विषयांवर त्यांनी केलेले प्रयोगशील कार्यक्रम आपली दादच घेऊन जातात. समाजात काम करणाऱ्या अनेक व्यक्तींचा यांनी सत्कार केला आहे. चौरंगी अभ्यास, चौफेर संपर्क, कोणत्याही कामात झोकून देण्याची वृत्ती यामुळे घेतलेले काम यशस्वीपणे तडीस जाते. त्यांची जिज्ञासूवृत्ती आणि क्रियाशील राहणे हे त्याचे जिवंतपण सांगून जाते. खरे तर याचे आपल्याकडून कौतुक व्हायला हवे. सतत पाझरत असणारे ऊर्जेचे जिवंत झरे असेच अखंड जिवंत राहोत आणि मायबाप रसिकांना आनंद देत राहोत.

**– संजीव सावंत**
भ्रमणध्वनी : ९८२०१८०६१०
advsawant@yahoo.co.in




# ट्रम्पची अमेरिका

## डॉ. अनंत पां. लाभसेटवार

**मे** २०१८ मध्ये मोदींनी चार वर्ष पूर्ण केली. त्यावेळी त्यांच्या कर्तृत्वाचा आढावा घेण्यात आला. आपण सत्तारूढ झाल्यापासून देशात काय बदल केले व भारताचा कायापालट केला याविषयी भाजपने शंख फुंकले. तोच कारभार विरोधी पक्षाला कस्पटासमान वाटला. अशीच टोकाची मतं अध्यक्ष ट्रम्पविषयी अमेरिकेत आढळतात. त्यांचे चाहते त्यांचा उदो-उदो करतात तर डेमॉक्रॅटिक पक्षाचे डावे त्यांच्यावर आग पाखडतात. लवकरात लवकर अभिनियोगाची (impeachment) कारवाई सुरू करा असा तो अट्टाहास करतात. जवळजवळ सर्व चॅनलवाले व दैनिकं डाव्यांना धार्जिणी असल्यामुळे ही टकळी रोज उलटी येईपर्यंत फिरवण्यात येते. एवढी की माध्यमांवरील अमेरिकन लोकांचा विश्वास पार उडालेला आहे. एका सर्वेक्षणानुसार ६ टक्के तर दुसऱ्यानुसार १५ टक्के लोक या डावीकडे झुकणाऱ्या माध्यमांवर विश्वास आहे असं म्हणतात. भारतात याच पक्षपाती बातम्या प्रसारित होत असल्यामुळे तिथल्या जनतेचंही मन दूषित झालेलं आहे. एवढं असूनही मे २०१८ मध्ये ट्रम्पची लोकप्रियता कमी होण्याऐवजी वाढली हे विशेष. स्वत:ला लोकशाहीचा चौथा स्तंभ समजणारी माध्यमं त्यामुळे अजूनच बिथरली व बूड नसलेल्या बातम्या धावू लागल्या. ही फेक न्यूज आपल्या पेड न्यूजपेक्षा लोकशाहीला जास्त घातक असते, पण हे पूर्वग्रह सोडले तर गेल्या १८ महिन्यात ट्रम्पनी देशासाठी काय केलं असा प्रश्न उद्‌भवतो. त्यांची प्राप्तव्ये लक्षात घेण्यासारखी आहेत. पहिली गोष्ट अशी की ट्रम्प जिंकतील असं कुणालाच वाटलं नाही. डाव्यांचा विश्वसनीय पेपर म्हणजे न्यूयॉर्क टाइम्स. या दैनिकानं हिलरी सत्तारूढ होण्याची ९१ टक्के शक्यता आहे असं निवडणुकीपूर्वी जाहीर केलं. जवळजवळ सर्व मतमोजणीत हिलरीच बाजी मारीत होती. त्यामुळे ट्रम्प, त्यांचं कुटुंब व निकटवर्तीयांमध्ये एक प्रकारची निराशा पसरली होती, पण अमेरिकन जनतेला व्यावसायिक राजकारण्यांचा व त्यांनी दिलेल्या पोकळ आश्वासनांचा उबग आला होता. म्हणून ते एक यशस्वी, कृतिप्रवण, राजसापेक्ष भाषेत (politically correct) न बोलता स्पष्टोक्ती करणारे व ध्येयलक्ष्यी दावेदार निवडण्यास तयार झाले. त्यांच्यात असलेले दोष त्यांनी नजरेआड केले. नेहमी भंपकबाज व अतिशोयक्त भाषेत

बोलणं, काही लोकांचा अपमान करणं, शत्रूला आव्हान देणं आणि पूर्वीच्या अध्यक्षांवर टीकास्त्र सोडणं हे सर्व अमेरिकन जनतेला ठाऊक असूनही तिनं ट्रम्पना वरलं. त्यामुळे क्रांती घडली. एका राजकारणात सर्वस्वी अननुभवी असलेल्या उद्योजकावर जगातील सर्वाधिक बलवान पद सोपवणं ऐतिहासिक होतं.

कुठलीही क्रांती म्हणजे प्रस्थापितांना बसलेला धक्काच! उदारमतवादी, डाव्या व काही त्यांच्या रिपब्लिकन पक्षाच्या, अशा सर्वांनी कोल्हेकुई सुरू केली. निवडणुकीचा निकाल मान्य केला नाही. प्रचंड विरोध दर्शवला. मोर्चे काढले. प्रदर्शनं केली. त्यांना अभिनियोगाची कारवाई करण्याची घाई झाली. अधिकांश माध्यमं त्यांच्या बाजूला असल्यामुळे या डाव्यांना व्यासपीठ मिळालं. असं असूनही ट्रम्पनी गेल्या १८ महिन्यात जी पावलं उचललीत त्यामुळे अमेरिकेत व परराष्ट्रधोरणात लक्षणीय बदल झाले हे नाकारता येत नाही.

### अर्थकारण

एक उद्योजक असल्यामुळे ट्रम्पना अर्थव्यवस्थेत व रोजगारनिर्मितीत भारी रस! ओबामांच्या ८ वर्षांच्या कारकीर्दीत अमेरिकेचं अर्थकारण आजारी होतं. त्यांच्या काळात त्यानं कधीच ३ टक्के वाढदर गाठला नाही. ते सरासरी १.८ टक्क्यानं कसंबसं पुढे सरकत होतं. महत्त्वाचं म्हणजे विश्वासार्हता निर्देशांक (Confidence Index) पार घसरला होता. अधिकांश लोक देश चुकीच्या मार्गानं जात आहे असं म्हणत, पण ट्रम्पनी एका वर्षात वाढदर २.९ टक्के केला. शिवाय विश्वासार्हता निर्देशांकानं दिशा बदलली. आता अधिकांश लोक देश योग्य मार्गावर चालत आहे असं म्हणू लागले. अर्थवृद्धीचा परिणाम रोजगारनिर्मितीवर झाला. ती वाढल्यामुळे बेकारीचं प्रमाण मे २०१८ मध्ये ३.९ टक्क्यांवर घसरलं. काळे व हिसपॅनिकमध्ये तर त्यानं ऐतिहासिक नीचांक गाठला. ओबामा आपल्या कृष्णवर्णीय बंधूंसाठी असं कधीच करू शकले नाही. आता नोकऱ्यांऐवजी नोकरांची वानवा निर्माण झाली. या दुष्काळामुळे प्रथमच त्यांचे पगार वाढले. अर्थकारणाला आलेली ही उभारी आता डावेसुद्धा मान्य करीत आहेत.

हा चमत्कार करण्यास ट्रम्पनी कुठली जादू केली? ती म्हणजे करकपात. करदर कमी केल्यानं उद्योगांच्या व व्यक्तींच्या उपजत गुणांना उत्तेजन मिळतं हा मंत्र नवीन नाही, पण डाव्यांचा त्याला विरोध आहे. अमेरिकेत उद्योगांचे सर्वाधिक कर दर ३५ टक्के व वैयक्तिक दर ३९.५ टक्के असे. ट्रम्पनी ते अनुक्रमे २१ टक्के व ३९.४ टक्क्यावर आणले. त्यामुळे उद्योगवाढीला व रोजगाराला उत्तेजन मिळालं. करकपात सुरू होऊन फक्त ६ महिनेच झाले. पण त्यामुळे अमेरिकेचं अर्थकारण उर्जितावस्थेत गेलं यात शंका नाही. करसवलतीतून वाचलेल्या पैशाचा उपयोग अनेक कंपन्यांनी व बँकांनी कर्मचाऱ्यांना कामगिरी वेतन (Bonus) व किमान वेतन वाढवण्यास केला. याचा तूर्त ५ दशलक्षाहून अधिक कर्मचाऱ्यांना फायदा झाला. निवडणूक जिंकण्याचा मार्ग शेवटी मतदारांच्या खिशातून जातो. ते सध्या फुगलेले असल्यामुळे २०२० मध्ये ट्रम्पची पुर्ननिवड शाश्वत आहे असं अनेक राजपंडित म्हणतात.

### नियम निमूर्लन

अर्थकारणाला पुष्टी मिळण्याचं दुसरं एक कारण म्हणजे लालफितीच्या कारभाराला लावलेली कात्री. ट्रम्पनी सत्तेवर येताच अध्यादेशाचा वापर करून ओबामांचे अनेक नियम रद्द केले. त्यामुळे उद्योगांची गळचेपी होत होती. २००८-२००९च्या वित्तजलितकांडानंतर ओबामांनी बँकांवर कठोर नियम लादले. वित्तसंस्थांना तरंगत ठेवण्यासाठी सरकारला ११० अब्ज डॉलरहून जास्त पैसे पुनर्भांडवलीकरणासाठी वापरावे लागले. ते त्यांनी सव्याज परत केले. मग ओबामांनी बँकांना दंडात्मक शिक्षा देऊन १०० अब्ज डॉलरचा भुर्दंड वसूल केला. बँकांची वर्तणूक एकदम बदलली. त्यांनी ग्राहकांना कर्ज देणं कठीण केलं. सर्वसामान्यांना गृहकर्ज जवळजवळ मिळेनासं झालं. आता अमेरिकन बँका जगात सर्वाधिक सुदृढ झाल्यामुळे या बंधनांची जरुरी राहिली नाही म्हणून ट्रम्पनी ते शिथिल करून सर्वसामान्यांना जास्त पतपुरवठा करून दिला. त्यामुळे गृहकर्ज मिळणं सुलभ झालं आहे.

### स्थलांतर धोरण

दक्षिण सरहद्दीवरून घुसखोरी करणाऱ्या लॅटिन अमेरिकन लोकांचे लोंढे बघून अमेरिकन जनता प्रक्षुब्ध झाली. हिसपॅनिक लोकांची मतं डेमॉक्रॅट पक्षाला महत्त्वाची असल्यामुळे ओबामांनी ते लोंढे थोपवण्यासाठी फक्त लाक्षणिक पावलं उचललीत, पण ट्रम्पनी ते थांबवण्यासाठी आपण २१ अब्ज डॉलरची अभेद्य भिंत उभारू व देशातील अवैध व गुन्हा करणाऱ्यांची उचलबांगडी करू म्हणून आश्वासन दिलं होतं. त्यांच्या यशाचं ते एक कारण आहे. ट्रम्पचा वैध स्थलांतरांना मुळीच विरोध नाही. त्यांच्या कंपनीत सुमारे १४,००० कर्मचारी काम करतात. त्यातले अनेक भारतीय आहेत, पण डाव्यांनी 'वैध' हा शब्द गाळून ट्रम्प सर्व स्थलांतरांचा निषेध करतात असा विपर्यस्त अर्थ लावला. या बौद्धिक चलाखीचा फारसा उपयोग झाला नाही. अधिकांश जनता या बाबतीत त्यांच्या पाठीशी आहे तरीही डेमॉक्रॅट पक्षानं भिंत बांधण्यासाठी २१ अब्ज डॉलर्स पुंजीची संमती दिली नाही. ट्रम्प निवडणूक प्रचारात हे पैसे मेक्सिकोकडून वसूल करू असं म्हणत. त्याचा पिच्छा त्यांनी सोडला नाही. ते करणं फार कठीणही नाही. अमेरिकेतले मेक्सिकन लोक दरवर्षी ६९ अब्ज डॉलर्स मायदेशी पाठवतात. अनिवासी भारतीय आपल्या जन्मभूमीला त्यापेक्षा जास्त समृद्ध करतात. ते सर्वाधिक म्हणजे ७२ अब्ज डॉलर्स दरवर्षी दिल्लीला पाठवतात. या अर्थसंक्रमणावर कर लादणं अशक्यप्राय नाही. तसंच मेक्सिको आयातीपेक्षा अमेरिकेला ६८ अब्ज डॉलरचा जास्त माल निर्यात करतो. या व्यवहाराला देखील कर लावून लक्ष्य करता येईल. खरं म्हणजे या विषयी सध्या वाटाघाटी सुरू आहेत.

भारताच्या दृष्टीनं ट्रम्पच्या स्थलांतर धोरणाचा महत्त्वाचा भाग म्हणजे H1-B व्हिसा. त्याचा कोटा सध्या ६५,००० व अतिरिक्त २०,००० असा एकूण ८५,००० आहे. त्यातले ८० टक्के एकट्या भारताला मिळतात. भारतीय सरकारला हा व्हिसा म्हणजे एक दुभती गाय वाटते. त्यांनी घरी पाठवलेलं परदेशी चलन चालू

खात्यातील तूट कमी करण्यास मदत करते. या योजनेत अमेरिकन सरकारला अनियमितपणा व भ्रष्टाचार सापडला. त्यासाठी आपल्या इंफोसिसला २०१३ मध्ये ३६ दशलक्ष डॉलरचा दंड भरून सरकारी नियंत्रण स्वीकारावं लागलं. भारतीय संगणक कंपन्या अमेरिकेत स्वस्त मजूर आणण्यासाठी हजारोनं H1-B व्हिसे मिळवतात. असे एकगठ्ठा परवाने मिळवणं या देशात कायद्याविरुद्ध समजण्यात येतं म्हणून ट्रम्पनी व्हिसाप्राप्ती कठीण केली आहे कारण त्यांना अमेरिकन कर्मचाऱ्यांना प्राधान्य द्यायचं आहे. त्यांच्या धोरणाचं उद्दिष्ट साध्य झालं असं म्हणता येईल. इंफोसिस, TCS, विप्रो व कॉगनिझंट या कंपन्यांनी भारतातल्या गुणवत्तेवर विसंबून न रहाता अमेरिकेत कार्यालयं उघडून त्या देशातील कर्मचारी कामावर ठेवले. इंफोसिसनं चार कार्यालयं उघडून १०,००० अमेरिकन अभियंत्यांना नोकऱ्या दिल्या. इतर भारतीय कंपन्यांनी तसंच केलं. त्यामुळे ते आता H1-B व्हिसावर तेवढे विसंबून नाहीत.

H1-B व्हिसा हा खास कौशल्य असलेल्या तज्ज्ञ, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ किंवा कलाकारासाठी १९९० मध्ये सुरू करण्यात आला. पण त्याचा उपयोग गावरानी किंवा सुमार कौशल्य असलेले अभियंते वापरून अमेरिकन कर्मचाऱ्यांना डच्चू देण्यात व पैसे वाचवण्यात करण्यात आला. याची अनेक उदाहरणे अमेरिकेत आहेत. डिस्ने कंपनीनं २०१५ मध्ये २५० भारतीय अभियंत्यांना कामावर ठेवून तेवढ्याच अमेरिकन कर्मचाऱ्यांना दरवाजा दाखवला. यातली गोम अशी की मावळत्या अधिकाऱ्यांना गच्छंती वेतन मिळण्यापूर्वी नव्या भारतीय कर्मचाऱ्यांना आपलं काम व कौशल्य समजावून सांगावं लागलं. हे अमेरिकन लोकांना डोक्यात गोळी घालण्यापूर्वी खड्डा खोदल्याचा हुकूम सोडण्यासारखं वाटलं. त्यामुळे जनता बिथरली. संसदेनं त्याची दखल घेतली आणि बंगळुरूची जागतिक प्रतिमा मलिन झाली. ट्रम्पनी ही दुखरी नस छेदली व H1-B व्हिसा मिळवणं कठीण केलं.

H4-B हा अवलंबित्व व्हिसा (dependent). तो H1-B धारकांच्या बायकांना देण्यात येतो. त्याचे ९४ टक्के लाभार्थी म्हणजे भारतीय महिला. त्या अधिकांशानं अभियांत्रिकी शिक्षण घेतलेल्या व काम करण्यास समर्थ. परंतु कायद्यानुसार त्यांना अर्थार्जन करता येत नाही. ओबामांनी २०१५ मध्ये औदार्याच्या भरात तो नियम काही H4-B व्हिसाधारकांसाठी सैल केला. पण अमेरिकन लोकांच्या नोकऱ्यांवर लक्ष ठेवून ट्रम्पनी ती बंदी पुन्हा सुरू केली. त्यामुळे सिलिकॉन व्हॅलीमध्ये अनेकांच्या स्वप्नांवर गदा पडली. पण ट्रम्पचं सर्वच धोरण भारताला हानिकारक नाही.

सध्या अमेरिकेत दरवर्षी १० लाखापेक्षा जास्त ग्रीनकार्डधारक वैधपणे येतात. त्यातले फक्त १५ टक्के गुणवत्तेच्या आधारे प्रविष्ट होतात. ८५ टक्के कुटुंबं एकत्रिकरणाच्या योजनेखाली देशात शिरतात. यातले बहुतेक अर्धशिक्षित, अल्पकौशल्यधारी व इंग्रजी धड न बोलणारे. यांच्या भरण्यामुळे अमेरिकेच्या अर्थकारणात फारशी भर पडत नाही म्हणून ट्रम्पनी गुणवत्तेवर आधारित ग्रीन कार्ड देण्याचं धोरण मोडलं. असं जर झालं तर त्याचा भारतीयांनाच जास्त फायदा होईल कारण सध्या जे १० लाखांहून अधिक इच्छुक ग्रीनकार्डासाठी अनेक वर्षांपासून ओळीत उभे आहेत त्यांचा नंबर लगेच लागेल. ते अर्थवृद्धीसाठी महत्त्वाचं ठरेल. सध्या कॅनडा, ऑस्ट्रेलिया व ब्रिटन तसंच करतं. आधुनिकीकरणामुळे आधुनिक कौशल्याचं महत्त्व वाढलं आहे, पण ट्रम्पला कुठलंच श्रेय मिळू नये या सूडभावनेनं डेमॉक्रॅट पक्षानं या विधेयकाला विरोध केला. त्यांना अशा धोरण परिवर्तनातून होणारं देशहित ट्रम्पपुढे गौण वाटतं.

**परराष्ट्रधोरण**

ट्रम्पनी तर हे क्षेत्र अगदी ढवळून टाकलं. त्यांच्या मते जगानं एकतर्फी करार करून अमेरिकेचं शोषण केलं. याचं एक मोठं उदाहरण म्हणजे चीन. दरवर्षी ३७५ अब्ज डॉलरची व्यापारी तूट झाल्यामुळे अमेरिकेतले कारखाने बंद पडले व ७ दशलक्ष नोकऱ्या त्या लाल देशात स्थलांतरित झाल्या. याचा दोष ते चीनला न देता वाटाघाटीशून्य ओबामा, बुश व क्लिंटनला देतात कारण त्यांनी मुक्त व्यापाराच्या नावाखाली परदेशात जाणारे डॉलरचे लोंढे कधीच रोखले नाहीत. हा असंतुलित व्यापार संतुलित करण्यासाठी ट्रम्पनी प्रथमच चीनला लक्ष्य केलं. अमेरिका आयात केलेल्या वाहनांवर फक्त २.५ टक्के शुल्क लादते तर चीन १० पट जास्त आकारते. अमेरिकन कंपन्यांना त्या साम्यवादी देशात विस्तार करून त्या देशाच्या भव्य बाजारपेठेचा फायदा घ्यायचा असेल तर अशा इच्छुकांना आपली व्यापारी गोपनीय माहिती (Trade secrets) चिनी कंपन्यांना द्यावी लागत होती. या अन्यायाविरुद्ध एकाही अध्यक्षानं आवाज उठवला नाही. त्यांनी बौद्धिक संपदा हक्कांचं (Patent) उल्लंघन डोळे मिटून स्वीकारलं. याचा फायदा घेऊन चिनी कंपन्या देशांतर्गतच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवर अमेरिकेशी स्पर्धा करू लागल्या. जवळजवळ सगळे महत्त्वाचे शोध अमेरिकेत लागत असल्यामुळे याचा चीनला फायदाच झाला. पण ट्रम्पनी यावर बंदी घालून व्यापारी त्रुटी कमी करण्यासाठी वाटाघाटी सुरू केल्या. त्या सध्या सुरू असून शेवटी एकतर्फी व्यापार कमी होईल यात शंका नाही. तसंच कॅनडा, मेक्सिको व अमेरिकेमध्ये नॉर्थ अटलांटिक फ्री ट्रेड ॲग्रीमेंट (NAFTA) या करारानुसार होणारा व्यापारही अमेरिकेला हानिकारक ठरला. त्या दोन देशांशी व्यापारी त्रुटी वाढली व अमेरिकेतल्या कारखान्यांवर व मजुरांवर गदा पडली. ट्रम्पनी एकदम हा 'नॅफ्टा' बंद करून नवीन करारासाठी वाटाघाटी सुरू केल्या. त्यांनी घेतलेली अमेरिकाधार्जिणी भूमिका या दोन देशांना मुळीच आवडली नाही, पण नवीन करार जर अस्तित्वात आला तर असंतुलित व्यापार बंद होईल यात शंका नाही.

भारतानं तर मुळीच लढा दिला नाही. कुरुक्षेत्रावर शस्त्रत्याग करणाऱ्या द्रोणाचार्याप्रमाणे आपल्या प्रभूंनी गुडघ्यावर बसून हात जोडले. ट्रम्पची नजर भारताच्या २२ अब्ज डॉलरच्या शिलकीच्या व्यापारावर होती. म्हणजे आपण अमेरिकेकडून जेवढा माल व सेवा विकत घेतो त्यापेक्षा सवाईनं त्या देशाला निर्यात करतो. ट्रम्पनी मागणी न करताच आपल्या वाणिज्य मंत्र्यांनी पुढील ७-८ वर्षांत त्या पाश्चात्त्य देशाकडून १००० विमानं आणि दरवर्षी ५

अब्ज डॉलरचं खनिज तेल विकत घेऊन व्यवहार संतुलित करण्याचं कबूल केलं. याशिवाय लष्करी शस्त्रास्त्रावर केलेला खर्च वेगळा. सध्या H1-B व्हिसा मिळण्यासाठी हतबल झालेल्या अनिवासी भारतीयांसाठी या वाटाघाटीत सवलती मागण्याचं त्यांना सुचलं नाही. या व्यवहारशून्यतेला काय म्हणावं?

अमेरिका केंद्रस्थानी ठेवून ट्रम्पनी पॅरिसमध्ये केलेला आंतरराष्ट्रीय पर्यावरण करारातून आपलं अंग काढून घेतलं. कारण त्यामुळे अमेरिकन उद्योगांवर बंधनं आली असती, पण चिनी व भारतीय कंपन्या त्यापासून मुक्त राहिल्या असत्या. तो लाल देश आता अमेरिकेचा प्रतिस्पर्धी झाल्यामुळे ही सवलत अमेरिकेला अन्यायी वाटली, पण जगाला ट्रम्पचं हे धोरण मुळीच आवडलं नाही. सर्वांनी त्यांचा निषेध केला.

**इराण व नॉर्थ कोरियाशी टक्कर**

ओबामांनी इतिहासात आपला वारसा रहावा म्हणून इराणशी २०१५ मध्ये एकतर्फी अणुकरार केला. त्याच्या अनेक अटी गोपनीय ठेवण्यात आल्या असून त्यावर इराणनं सह्यादेखील केल्या नाहीत. अमेरिकेच्या अधिसभेनं (Senate) संमती न दिल्यामुळे या कराराला ट्रीटीचं (Treaty) महत्त्व कधीच लाभलं नाही. ती सभा त्या कराराला विरोध करेल म्हणून ओबामांनी तो करार मंजुरीसाठी सादर न करण्याची चलाखी दाखवली. पण इराणच्या आयातोलाशी हातमिळवणी करण्यासाठी अमेरिकेच्या अध्यक्षांना लांच्छनास्पद अटी मान्य कराव्या लागल्या. त्यातली एक म्हणजे मध्यरात्रीला अब्जावधी डॉलरची रोकड विमानात भरून ती त्या तेलसंपन्न देशाला द्यावी लागली. ओबामांनी हा अवैध व्यवहार लपवून ठेवण्याचा प्रयत्न केला. पण पत्रकाराला त्याचा वास लागला आणि बिंग फुटलं.

त्यातली दुसरी एक अट तत्कालीन परराष्ट्र सचिव (मंत्री) जॉन केरी यांची वाटाघाटीशून्यता दर्शवणारी होती. आपण अणुबाँबसाठी युरेनियमचं शुद्धीकरण १५ वर्षं करणार नाही असं इराणनं कबूल केलं. पण आपल्या लष्करी छावण्या निरीक्षकांपासून वंचित ठेवल्या. तिथे अवैध शुद्धीकरण जर केलं तर ते कळायला मार्ग नव्हता. शिवाय अमेरिकेचे दोस्तराष्ट्र इस्राएलचा या कराराला तीव्र विरोध होता. म्हणून ट्रम्पनी तो करार रद्द करून ओबामांचा वारसा पुसून टाकला. त्यामुळे युरोपी राष्ट्र नाराज झाले तरी ते ज्यू राष्ट्र खूश झालं. याचं कारण, असं की या करारामुळे युरोपी कंपन्यांनी अब्जावधी डॉलरचा व्यापार त्या आयातोलाच्या देशाशी सुरू केला. पण अमेरिकन कंपन्या मागे पडल्या. हे अमेरिकेला अर्थातच हितावह नव्हतं. म्हणून ट्रम्पला त्या करारतून अंग काढून घेण्यात मुळीच अडचण पडली नाही. निवडणूक प्रचारात हा करार म्हणजे वाटाघाटीशून्यतेचं एक उत्कृष्ट उदाहरण म्हणून त्यांनी जबरदस्त टीका केली होती.

याहीपेक्षा महत्त्वाचं कार्य म्हणजे उत्तर कोरियाच्या उपद्रवाला तोंड देणं. तो देश अण्वस्त्रधारी होऊन त्यानं महासत्ताक देशाला शह दिला. याचंही खापर ट्रम्पनी गेल्या तीन अध्यक्षांच्या खांद्यावर फोडलं. ओबामांच्या काळात तो देश अण्वस्त्रधारी झाला. तरीही ते स्वस्थच बसले. आता त्या देशानं अमेरिकेपर्यंत पोचणारं आंतरखंडीय क्षेपणास्त्र विकसित केल्यामुळे या प्रश्नानं गंभीर स्वरूप धारण केलं असताना तो ट्रम्पच्या ताटात पडला. त्या साम्यवादी देशाचा काटा काढण्याचं कठीण काम त्यांच्या खांद्यावर पडलं. त्यांनी प्रथम चीनवर दबाव आणून त्या देशाची मदत घेतली. तसं करण्यास ओबामा असमर्थ ठरले होते. मग त्यांनी अमेरिकेचं शक्तिप्रदर्शन करून त्या देशाच्या अध्यक्षांना (किम जाँग ऊन) भीतिग्रस्त केलं व अण्वनिशस्त्रीकरण (Denclearization) करण्यासाठी वाटघाटी सुरू केल्या. ट्रम्प त्याच्या मोबदल्यात किम ऊनला अभय देण्यास तयार झाले. या वाटाघाटीची निष्पत्ती कशात होईल हे सध्या सांगणं कठीण!

– **डॉ. अनंत पां. लाभसेटवार** (Ph.D.)
anantlabh@gmail.com
(लेखक 'फर्स्ट नॅशनल बँक आणि ट्रस्ट कंपनी', कॅन्सास अमेरिका या वित्तसंस्थेचे १४ वर्षं 'चेअरमन ऑफ दी बोर्ड' होते.)

ग्रंथाली





**मूल्य ३५० रुपये**
**सवलतीत २५० रुपये**

## हुंकार – डॉ. अनंत पां. लाभसेटवार

...जीवनात कुठेही संघर्ष दिसला की माझ्यातला कथालेखक जागृत होतो आणि तो शब्दबद्ध करण्यास माझी लेखणी सरसारते. जगात सुखापेक्षा दु:ख, त्यागापेक्षा भोग आणि सौहादापेक्षा कलह जास्त सापडत असल्यामुळे विषयांना तोट नाही. पाहिजे ती चिकित्सक बुद्धी आणि लिहिण्याची ओढ. देश व वेष वेगळे म्हणून माणसाच्या भावना व मनोवृत्ती बदलत नाही. सगळ्यांच्या डोळ्यांत तीच आसवं उभी राहतात आणि छातीत तेच काळीज धडधडत असतं. त्यामुळे घटना वेगळ्या असल्या तरी प्रतिक्रिया कशी होते हा कथेचा सार ...लघुकथा म्हणजे एक प्रकारचं शीघ्र साहित्यच. मॅकडोनल्डच्या शीघ्र अन्नाप्रमाणे (फास्ट फूड) ...लघुकथांचे दोन प्रकार म्हणता येतील– मनोविश्वलेषणात्मक व घटनात्मक. मनाचे विविध पापुद्रे उलगडून कथा लिहिल्यामुळे मराठीच्या साहित्याच्या मुशीत फ्रॉईड केव्हाच फ्राईड (तळलेला) झाला आहे... रोजच्या जीवनात जगभर जो कलह सापडतो, तो कलात्मकरीतीने गुंफला तर लालित्यपूर्ण कथा निर्माण होऊ शकते. त्यासाठी मनोविकारतज्ज्ञाची जरुरी नसते. अनुभवांचं भांडवल आपण कृतीतून व वाचनातून मिळवू शकतो. म्हणजे लेखक होण्यासाठी प्रथम वाचक होणं आवश्यक असतं.

**ग्रंथाली**




# कथा रत्नावली

**प्रा. डॉ. द. ता. भोसले**


खऱ्या जीवनाचा आणि खऱ्या जीवनमूल्यांचा साक्षात्कार वाचकांना घडविला तरच तिच्यात सामर्थ्य जन्माला येते. जीवनावर विदारक प्रकाश टाकण्याची क्षमता जितकी अधिक, मानवी जीवनातील शल्य जितक्या कौशल्यपूर्ण रीतीने सांगितले जाते. मानवी जीवन व मानवी मनाची गुंतागुंत चित्रित करण्याचे व सोडविण्याचे कसब जितके मोठे तितकी ती कथा श्रेष्ठ पदाला व परिपूर्ण स्थितीला जाऊन पोचते. मानवाची आत्मपूजा आणि आत्मवंचना, राजसत्तेचा जुलूम, पदोपदी धारण करावे लागणारे मुखवटे, स्वत:ची आणि समाजाची होणारी फसवणूक, पांडित्याचे प्रदर्शन, भूक, भय आणि भोग यातून येणारी गुलामगिरी, धर्माचरणाला आलेली कर्मकांडाची सूज आणि अंतरंगातील घाण नष्ट होण्यासाठी अत्तरे उपयोगाची नाही. तर व्यक्ती आणि समाज यांना नव्या जीवनमूल्यांची आणि इंद्रियसुखांच्या पलीकडे जाणाऱ्या आयुष्याची जाणीव होणे आवश्यक असते. त्यातूनच मानवता निष्कलंकित होईल.

**मूल्य १५० रुपये**
**सवलतीत ९० रुपये**

# आषाढी


**भक्तिसंगीताची रौप्यमहोत्सवी वारी**

**योजना शिवानंद**




गायिका श्रीमती योजना शिवानंद यांनी योजना प्रतिष्ठानतर्फे१९९२ ते २०१६ या २५ वर्षात आषाढी एकादशीच्या निमित्तानं भक्तिसंगीताच्या २७ मैफिली यशस्वीपणे सादर करून या उपक्रमाचा रौप्यमहोत्सव यशस्वीरीत्या पूर्ण केला. त्यातून एक मोठा भक्तिप्रकल्प, त्यामागच्या विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि व्यक्तिगत संदर्भांचा एक व्यापक पटच आपल्यासमोर उभा राहतो. योजनाच्या अथक धडपडीचा हा आलेख.

**मूल्य ३५० रुपये**
**सवलतीत २०० रुपये**




# बखर वास्तुकलेची

**प्रकाश पेठे**

सर्वगुणसंपन्न वास्तुनिर्मिती होणे ही गरज अबाधित राहील. कारण माणूस सौंदर्याचा भुकेला असतो. उत्तम वास्तूंचे जतन करण्याचा प्रश्न नंतर हाती घेता येईल. जॉन रस्किनचे 'सेव्हन लॅम्प्स ऑफ आर्किटेक्चर' अभ्यासाला होते. त्या सात ज्योती म्हणजे त्याग, सत्य, शक्ती, सौंदर्य, जीवन, स्मृती आणि आज्ञाधारकपणा. त्याने १८४९ साली लिहिलेल्या त्या सात गोष्टींबद्दल वादविवाद होऊ शकतात, पण दोन हजार वर्षांपूर्वी व्हिटुव्हियसने वास्तूच्या सर्वगुणसंपन्नेचे स्थैर्य, उपयुक्तता आणि सौंदर्य हे तीन निकष मानले जातात असे म्हटले. ते तीन निकष जागतिक प्रतिष्ठेचे प्रिटझकर बक्षिस देतानाही तपासले जातात.

**मूल्य ३५० रु.**
**सवलतीत २५० रु.**

# 'आरवली ते अरावली' या पुस्तकप्रकाशन समारंभात धनंजय गांगल यांनी व्यक्त केलेले मनोगत


डॉ. अनिल काकोडकर


वाय.एम. देवस्थळी


धनंजय गांगल


प्रकाश अंबुरे


श्रद्धा अंबुरे


अभिजित अंबुरे

कुतूहल, जिज्ञासा, ज्ञान, विवेक, संवेदना, चांगुलपणा, सुसंस्कृतपणा या सगळ्यांना कवेत घेणारा एक छान शब्द आहे ... आणि तो म्हणजे जाणिवा. मनुष्याच्या या जाणिवा रुंदावण्याचे आणि त्याला प्रगल्भ करण्याचे काम 'ग्रंथाली' करत असते.

आमच्या याच प्रवासात A२A म्हणजे 'आरवली ते अरावली' आणि त्याचे कर्ते- 'प्रकाश अंबुरे' आम्हाला विनायक कुलकर्णीमुळे भेटले आणि ते आमच्यातले झाले. शाहरुखला एकदा विचारलं की, ''तू आत्मचरित्रं कधी लिहिणार?'' तर उत्तर टाळण्यासाठी तो गंमतीत म्हणाला, ''आत्मचरित्र लिहावं असं 'ड्रॅमॅटिक' माझ्याकडे काही नाहीये - म्हणजे फुटपाथ वर झोपणे वगैरे.'' प्रकाश अंबुरेंच्या आयुष्यातही प्रचंड ड्रॅमॅटिक असा काही नाहीये, पण तरीही त्यांचा प्रवास लहान-सहान चांगल्या-वाईट विलक्षण घटनांनी भरलेला आहे. 'आरवली' या खेड्यातून निघालेला हा प्रवासी 'अरावली' या राजस्थानमधील पर्वतराजीत कसा पोचला, स्थिरावला आणि पुढच्या टप्प्यावर आता पुढच्या पिढीसोबत आफ्रिका खंडात कसा पोचला याची ही हृदयस्पर्शी कथा आहे. वैभव वझे आणि अरुण जोशी यांनी त्याचे उत्तम शब्दांकन आणि संपादन केले आहे. प्रत्येक कलाकृतीच्या घडण्यात नेहमीच मनोरंजक असं 'मेकिंग ऑफ...' असतं. साधारण तशाच धर्तीवर 'शब्दांकन करताना' अशी एक छानशी नोट वैभवनी लिहिली आहे. ती आवर्जून वाचण्यासारखी. ''प्रकाशजी बोलताना सूक्ष्मसा पॉज घेतात... तेव्हा ते आतल्या आत त्या घटनेचं संपादन करत असतात'' माझा अनुभव असा की प्रकाशजी सूक्ष्मसा नाही तर वाजपेयी, दिलीपकुमार आणि विक्रम गोखले यांना मागे टाकेल असा लांबलचक पॉज घेतात! असो. सतीश भावसार यांचे मुखपृष्ठ अंबुरेंच्या प्रवासाला साजेसे. याला देवस्थळीसरांची प्रस्तावना लाभली आणि आज डॉ. काकोडकर यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन होत आहे. या दोन्हीचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. त्यासाठी या दोघांचेही आम्ही कृतज्ञ आहोत.

सर्वसाधारण उद्योजगताचे जे 'थंब रूल्स' म्हणजे ढोबळमानाने नियम किंवा गुण म्हणून व्यवस्थापनशास्त्रात ओळखले जातात त्यांना, हे पुस्तक छेद देत पुढे जाते. यातले बहुतेक गुण प्रकाश अंबुरे यांच्यात वारंवार तरी अजिबात दिसत नाहीत. मी जे प्रकाश अंबुरे यानां थोडेफार ओळखतो त्या आधारावर अत्यंत धारिष्ट्याने आणि गंभीरपणे मी हे विधान करतो आहे. इंग्लिशमधील काही गाजलेल्या व्यवस्थापनशास्त्रावरील पुस्तकांची काही उदाहरण घेऊया.

आयन रँड या लेखिकेची 'द फाउंटनहेड' (१९४३) ही एक गाजलेली कादंबरी. भांडवलशाही आणि भौतिकवाद यांची पुरस्कर्ती अशी ही लेखिका! कादंबरींतेही तेच विचार अधोरेखित. यातली अंतर्निहित कल्पना (अंडरलाईंग थिम) अशी आहे की man's ego is the fountainhead of human progress.. .... माणसाचा अहं हाच त्याच्या उत्कर्षाचा मूलभूत स्रोत असतो. अंबुरेंच्या बाबतीत उत्कर्ष आहे पण इगो म्हणजे अहं शोधावा लागतो!

पीटर ड्रूकर हा आपल्या बेस्ट-सेलर 'द एफ्फेक्टिव्ह एक्सेक्युटिव्ह'मधे हाऊ टू डू एव्हरीथिंग राईट सांगत व्यवस्थापनशास्त्राचे फंडे म्हणजे मूलभूत तत्त्वे सांगतो. अंबुरे रूढ अर्थाने यात कुठेही बसत नाहीत. तरीही ते एव्हरीथिंग राईट करत आहेत गेली अनेक वर्षे. वेल ऑलमोस्ट एव्हरीथिंग. काहीवेळा त्यांना अपयश येतं आणि ते मोकळेपणाने मान्य करतात.

थॉमस फ्रीडमनचे The world is flat हे बेस्ट-सेलर आले साधारण २००५ साली. त्यात फ्रीडमनची मांडणी साधारण अशी होती की - ग्लोबलायझेशन, लिबेरलायझेशन, इंटरनेट म्हणजे जागतिकीकरण, उदारीकरण आणि माहिती तंत्रज्ञान यामुळे ज्ञान, वस्तू, भांडवल, श्रम आणि पर्यायाने उद्योजकता यांचे दळणवळण जगभर सुलभ झाले आहे. त्यांनी देशांच्या सीमारेषा ओलांडल्या आहेत. आता उद्योजकतेची संधी जगाच्या पाठीवर सर्वांना समान उपलब्ध आहे. या अर्थाने जग गोल नसून आता ते सपाट आहे! अंबुरे यांचीही कथा उद्योजकतेच्या समान संधीची आणि त्यांच्या कर्तृत्वाची, पण हे सगळं थॉमस फ्रीडमनच्या ग्लोबलायझेशन, लिबेरलायझेशन आणि इंटरनेट यांच्याशिवाय!

क्रायस्लरचा ली आयकोका किंवा ॲपलचा स्टिव्ह जॉब यांच्याप्रमाणे म्हणजे हिरो ते झीरो आणि परत हिरो असा ड्रामॅटिक प्रवास अंबुरे यांचा नाही.




लिओ टॉल्स्टॉय हा आपली मॅग्नम ओपस ऍना कॅरेनिना या महाकादंबरीची सुरुवातच अशी करतो की All happy families are alike but every unhappy family has its own story to tell. आणि मग एका unhappy फॅमिलीची कथा (खरे तर गॉसिप) ऐकण्यात नेहमीच अत्यंत उत्सुक असणाऱ्या आपल्या सगळ्यांना कादंबरीत खेचतो आणि गुंगवून टाकतो. इथे उलटं आहे. अंबुरेंची फॅमिली हे एक परस्परांबद्दल जिव्हाळा असलेलं आनंदी कुटुंब आहे. ह्या कुटुंबाचे उल्लेख या उद्योजकतेच्या प्रवासात अधूनमधून विणलेले आहेत आणि त्यातही आपण गुंगून जातो. मग अंबुरे यांची व्यवस्थापन पद्धती नक्की आहे तरी कशी? आणि त्याच्या जवळपास जाणारी तीन चार पुस्तक लक्षात आली.

एड कॅटमूल हा पिक्सर ऍनिमेशन आणि डिस्ने ऍनिमेशन या कंपनींचा मुखिया. त्याने टॉय स्टोरी, मॉन्स्टर्स, द इनक्रेडिबल्स अशा अनेक मोठ-मोठ्या गाजलेल्या हॉलिवूड सिनेमांचे ऍनिमेशन केले आहे. व्यावसायिक यश आणि अनेक पुरस्कार मिळवले. आपल्या व्यावसायिक अनुभवांवर आधारित त्याने एक व्यवस्थापनशास्त्राचे पुस्तक लिहिले. त्याचं नाव Creativity, Inc.: Overcoming the Unseen Forces That Stand in the Way of True Inspiration त्यात त्याने कंपनीच्या प्रमुखापासून कनिष्ठ व्यवस्थापकापर्यंत लागू होणारे व्यवस्थापनाचे फंडे सांगितले आहेत.

चांगल्या नेतृत्वाने जोखीम घेणे टाळायचे नसते. चुका, त्रुटी टाळण्याचा किती प्रयत्न करायचा याला मर्यादा आहेत. एका टप्यापलीकडे ते फार खर्चिक होते. त्यापेक्षा चुका झाल्या तर नंतर दुरुस्त करणं हे तुलनेने स्वस्त असतं. म्हणून नेतृत्वाने असं वातावरण निर्माण करायचं की सहकाऱ्यांना जोखीम घेताना या नेतृत्वाची भीती नाही तर आदर आणि आधारच वाटेल. दुसरं म्हणजे – कुठल्याही कंपनीत अधिकाराची श्रेणीबद्ध उतरंड (हायरार्कीकल) असलेली रचना असते. तरीही सर्वात कनिष्ठ अधिकाऱ्याला अत्यंत वरिष्ठ अधिकाऱ्याशी काही संभाषण करायचे असेल तर या अधिकाराच्या श्रेणीबद्ध रचनेतून वर टप्याटप्याने जायची सक्ती नसावी. त्याला थेट वरिष्ठांशी आणि खुद्द स्वतःशी बोलण्याचे स्वातंत्र्य चांगल्या नेतृत्वाने दिले पाहिजे. हे सगळे गुण नक्कीच अंबुरे यांच्याकडे आहेत.

पीटर थील या लेखकाचे "Zero to One : Notes Startups, or How to Build the Future" असे लांबलचक नावाचे व्यवस्थापनशास्त्राचे पुस्तक आहे. त्यातील मुख्य कल्पना अशी की "There is no reason why progress should be limited to computers or Silicon Valley. Progress can be achieved in any industry or area of business. It comes from the most important skill that every leader must master: learning to think for your business." सतत ऍपलपासून फ्लिपकार्टपर्यंत आय-टी कंपन्यांच्या यशाच्या आणि मोठमोठ्या आकड्यांचा चर्चा ऐकून असा (गैर) समज होण्याची शक्यता असते की प्रगती, वाढ, विकास हा फक्त आय-टी क्षेत्रातच शक्य आहे. बाकी कुठल्याच क्षेत्रात राम उरला नाहीये, पण हे चुकीचे आहे. अंबुरे हे जाणतात आणि अशा कुठल्याही बातम्यांचा ओरखडाही ते आपल्या निर्णयांवर उठू देत नाहीत. ते आपल्या व्यवसायात पूर्ण लक्ष केंद्रित करून काम करतात!

जनरल स्टॅनले मख्रिस्टल हा अमेरिकन सेनानी. जॉइंट स्पेशल ऑपेरेशन्स कमान्ड (JSOC) चा मुख्य म्हणून त्याच्यावर एक विशेष जबाबदारी होती. अल-कायदा, हकानी-नेटवर्क इत्यादींना इराक आणि आजूबाजूच्या भागातून संपवण्याची. स्टॅनले यांना लक्षात आले की त्यांचा शत्रू विकेंद्रित छोट्या-छोट्या मोड्यूल (गटात) काम करतो. गनिमी कावा करून तो चपळाईने आणि निर्दयीपणे आपला निशाणा साधतो आणि स्थानिक लोकसंख्येत विरघळून दिसेनासा होतो. त्याचा मुकाबला करण्यास पारंपरिक सैन्याची श्रेणीबद्ध उतरंड (हायरार्कीकल) असलेली रचना फारशी उपयोगाची नाही; मग अल-कायदाच्या मोड्यूलला आपलं एक मोड्यूल आणि त्यांना जागेवरच स्वतःचे निर्णय घेण्याची मुभा – अशी सैन्याची फेररचना त्याने तयार केली. अल्पावधीतच त्याला यश आले आणि अल-कायदा, हकानी-नेटवर्क त्याने बरेचसे मोडून काढले. त्याच्या या अनुभवांवर ख्रिस फुस्सेल, टॅनटम कॉलिन्स आणि डेव्हिड सिल्वरमन यांनी व्यवस्थापनशास्त्रावर एक पुस्तक लिहिले- 'टीम ऑफ टीम्स.' गुंतागुंतीच्या आणि सतत बदलण्याऱ्या परिस्थितीत टिकून राहण्यासाठी अंबुरेही जवळपास हीच अत्यंत लवचीक व्यवस्थापन पद्धती अमलात आणतात. त्याची तात्त्विक किंवा सैद्धांतिक मांडणी करणं त्यांच्या प्रकृतीत नाही, पण ती व्यवस्थापन पद्धती त्यांच्या स्वानुभवातून त्यांनी विकसित केली आहे.

सरतेशेवटी अंबुरेंसाठी मी पीटर डायमंडीस आणि स्टीवन कोटलर या लेखकद्वयीच्या 'ॲबडन्स' (Abundance) या पुस्तकाचा उल्लेख करीन. जगातील बुद्धिवंतांपैकी अनेकांचे हे मानणे आहे की प्रचंड लोकसंख्या, वाढता भौतिकवाद, मनुष्याची न संपणारी लालसा यामुळे मानवी मूल्य, चांगुलपणा आणि आसपासचा निसर्ग ह्याचा प्रचंड ऱ्हास सतत होतो आहे आणि या सगळ्याचा परिणाम म्हणून भविष्यात दुष्काळ, रोगराई, युद्ध हे अपरिहार्य आहे. एकूणच मानवजातीचे भविष्य हे अंधकारमय आहे पण हे पुस्तकं त्याच्या नेमकी उलट मांडणी करतं- ''द फ्यूचर इज बेटर दॅन यू थिंक.'' भविष्य हे आपल्याला वाटतं त्यापेक्षा खूप आनंदी आणि उज्ज्वल असणार आहे! अंबुरे हे ह्याच गाढ विश्वासाने काम करतात आणि त्यांच्या व्यवस्थापनशास्त्राची ही गुरुकिल्ली आहे.

# शहाण्यांनीच राजकारणात यावे - कुमार केतकर
# आमची पिढी ही पराभूतांची पिढी नाही - डॉ. दीपक पवार


कुमार केतकर


जयंत पाटील


राजन राजे


डॉ. दीपक पवार


चिन्मयी सुमित


डॉ. वीणा सानेकर

'मराठी अभ्यास केंद्र' आणि 'ग्रंथाली' आयोजित कार्यक्रमात दिनांक ५ जून २०१८ रोजी डॉ. दीपक पवार लिखित 'भाषाविचार' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा मिनी थिएटर, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई येथे पार पडला. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ पत्रकार आणि खासदार कुमार केतकर, प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील उपस्थित होते. तर धर्मराज्य पक्षाचे अध्यक्ष राजन राजे आणि मराठी शाळांच्या पालक महासंघाच्या सदिच्छादूत, सुप्रसिद्ध अभिनेत्री चिन्मयी सुमीत यांची विशेष उपस्थिती होती.

मुंबई विद्यापीठात राज्यशास्त्राचे अध्यापन करत असणारे डॉ. दीपक पवार गेली पंधरा वर्षे मराठीच्या चळवळीशी अभ्यासक कार्यकर्ता म्हणून जोडले गेले आहेत. भाषेशी निगडित विविध पैलूंचा परामर्श घेणाऱ्या 'भाषाविचार' या पुस्तकात त्यांनी संशोधन, आंदोलने, लेखन अशा सर्व अंगानी मराठीकारणाची मांडणी केली आहे. डॉ. पवार यांचे भाषेच्या चळवळीतील चिंतन आणि अनुभवांचे प्रतिबिंब 'भाषाविचार'मधून साकारले आहे.

'ग्रंथाली'चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी मराठी साहित्य समाजाच्या तळागाळातील वर्गात पोहचवण्यात 'ग्रंथाली'ने राबवलेल्या वाचक चळवळीच्या उपक्रमांचा आढावा घेतला. 'ग्रंथाली' मुंबईतील माहीम ते वरळी या भागातील महानगरपालिकेच्या दहा शाळा दत्तक घेऊन या शाळांना ग्रंथपेट्या देणार असल्याचे आणि दर दोन महिन्यांनी तिथे अभिवाचनाच्या कार्यक्रमासोबत विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

धर्मराज्य पक्षाचे अध्यक्ष राजन राजे यांनी मराठी शाळांचा लढा हा समाजातल्या श्रमिकांचा, शोषितांचा लढा आहे, असे उद्गार काढले. तर ज्ञान मिळवताना मूलभूत संकल्पना या मातृभाषेतूनच अधिक स्पष्ट होतात या जगभरच्या शिक्षकतज्ज्ञांच्या मताला दुजोरा देत 'मराठी अभ्यास केंद्र' करत असलेल्या मराठी भाषा आणि मराठी शाळांच्या कामाचे कौतुक केले.

''मी मिळेल त्या व्यासपीठावरून मराठी शाळांबद्दल बोलत असते. बिरबलाच्या गोष्टीत भाकरी का करपली, घोडा का अडला या प्रश्नाचं उत्तर जसं 'फिरवलं नाही' हे दिलं जातं, तसंच मुलांच्या कोणत्याही समस्या कुणी सांगायला लागलं की, माझं एकच उत्तर असतं, ते म्हणजे, मातृभाषेत शिक्षण घेतलं नाही.'' अशा खुमासदार शैलीत मराठी अभ्यास केंद्राच्या 'मराठी शाळा - पालक महासंघा'च्या सदिच्छादूत अभिनेत्री चिन्मयी सुमित यांनी आपले विचार मांडले.

डॉ. दीपक पवार आपल्या पुस्तकाविषयी मनोगत मांडताना म्हणाले की, '' 'मराठी अभ्यास केंद्र' मराठीकारणाचा, मराठी भाषेचा जो विचार करत आहे, तो सबंध भारत देशाच्या संदर्भात आहे. वि. का. राजवाडे, श्रीधर व्यंकटेश केतकर यांसारख्यांनी आयुष्यभर ज्ञानाचा व्यासंग केला. पण खेदाची गोष्ट ही की, ते एकांडे शिलेदार म्हणून लढत राहिले. त्यांचं असं एकांडे शिलेदार असणं खरंतर मराठी समाज म्हणून आपल्याला शरमेची गोष्ट असली पाहिजे. त्यांच्या तुलनेत मी आणि माझे सहकारी करत असलेले मराठी भाषेचं काम नगण्य आहे. मात्र मी कधीच एकांडा शिलेदार नव्हतो. माझं जे काही काम आहे, ते माझ्या संपूर्ण टीमचं अन् 'मराठी अभ्यास केंद्रा'ला साहाय्य करणाऱ्या प्रत्येकाचं आहे. माझी पिढी पराभूतांची नाही, तर लढणाऱ्यांची आहे. त्यामुळे आम्ही करत असलेलं काम पुढच्या पिढीला करायला लागू नये, एवढं इथलं मराठीचं जग चांगलं झालं पाहिजे, असं आमचं स्वप्न आहे.''

कार्यक्रमाचे अध्यक्ष खासदार कुमार केतकर यांनी महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर १९६० नंतर इंग्रजी शाळांचे जग उत्तरोत्तर कसे वाढत गेले याचा आढावा घेतला. शहाण्या माणसाने राजकारणात आलं तरच राजकारण चांगलं होऊ शकेल असं मत मांडलं. भाषा ही राजकारण, संस्कृती, समाज या कशापासूनही मुक्त असू शकत नाही. मात्र भाषेचा आग्रह, अस्मिता आणि अभिनिवेश हे नेमके कुठून सुरू होतात अन् कुठे संपतात यांच्या सीमारेषा सांगणं कठीण असतं. आर्थिक जागतिकीकरणाबरोबरच भाषिक-सांस्कृतिक जागतिकीकरणही सुरू होणं आवश्यक आहे, तरच आपल्याला एकमेकांच्या भाषांचा गोडवा कळू शकेल, असंही ते म्हणाले.

# 'विठ्ठलानंदा'ची मैफिल


डॉ. सदानंद मोरे


डॉ. पी.एस. रामाणी


पं. श्रीनिवास जोशी


योजना शिवानंद


साधना सरगम


मीना गोखले


अस्मिता पांडे

आषाढ महिन्याशी काही समीकरणं अगदी घट्ट जुळलेली असतात. एक म्हणजे मुसळधार पावसाची तमा न बाळगता पंढरीच्या वारीला निघालेले वारकरी आणि दुसरी म्हणजे 'योजना प्रतिष्ठान'तर्फे सादर होणाऱ्या भक्तिसंगीताच्या मैफिली. तब्बल पंचवीस वर्ष या मैफिली सादर होत आहेत. या उपक्रमाचे गेल्या पंचवीस वर्षातील मैफिलींचे फोटो आणि माहिती प्रकाशित करावी, असा ध्यास योजना शिवानंद यांनी घेतला आणि त्यांचे स्वप्न प्रत्यक्षात साकारलेदेखील. आषाढी भक्तिसंगीताच्या रौप्यमहोत्सवी वारीनिमित्त योजना शिवानंद यांनी लिहिलेल्या 'आषाढी' या पुस्तकाचे प्रकाशन पु. ल. देशपांडे सभागृहात करण्यात आले. 'ग्रंथाली प्रकाशन' आणि 'शिवगंधार'तर्फे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात व्यासपीठावर डॉ. सदानंद मोरे, डॉ. प्रेमानंद रामाणी, प्रा. मीना गोखले, डॉ. सुनील कट्टी, साधना सरगम, पुष्पा पागधरे, पं. प्रभाकर कारेकर, पं. श्रीनिवास भीमसेन जोशी, सुदेश हिंगलासपूरकर आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

'योजना प्रतिष्ठान'तर्फे १९९२ ते २०१६ या पंचवीस वर्षांत आषाढी एकादशीच्या निमित्तानं भक्तिसंगीताच्या मैफिली यशस्वीपणे सादर झाल्या. त्या मैफिलींच्या आठवणी, अनुभव, किस्से आणि निर्मितीचे क्षण महत्त्वाचे असल्यानं या सांगितिक कामाची नोंद करून ते पुस्तकरुपात आणायचे निश्चित ठरले. या मैफिलींचे प्रमुख शिल्पकार ठरलेल्या पंडित शिवानंद पाटील यांच्या 'कुणाचे हे रुप' या ध्वनिफितीवर रेकॉर्ड केलेल्या अभंगाने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. त्यांच्याबद्दल सांगायचं तर, पंडित शिवानंद पाटील हे अभिजात संगीतातील प्रतिभावान गायक कलाकार होते. कन्नड रंगभूमीवरली पूर्ण वेळ कलावंत असणाऱ्या दांपत्याच्या पोटी त्यांचा जन्म झाला. आईवडिल हे प्राथमिक गुरू लाभल्यानंतर पं. अप्पासाहेब पांगेरीकर, पं. द. वि. काणेबुवा, पं. बसवराज राजगुरू, पं. जितेंद्र अभिषेकी, पं. यशवंतबुवा जोशी आणि डॉ. गंगूबाई हनगल असे ज्येष्ठ गानगुरू त्यांना लाभले. किराणा, आग्रा व ग्वाल्हेर घराण्यांचे संस्कार त्यांच्यावर झाले. तसेच मराठी नाट्यसंगीत, अभंग, भावसंगीत, कन्नड नाट्यसंगीत व भक्तिसंगीतात त्यांनी आपला ठसा उमटवते. आकाशवाणीचे 'ए ग्रेड आर्टिस्ट' तर होतेच पण विविध कार्यक्रम व मराठी संगीत नाटकांत सहभागी झाले होते. त्यांच्या अनेकविध गानप्रकारांच्या सीडीज प्रकाशित झाल्या असून अनेक महत्वाचे मान-सन्मान त्यांना मिळाले आहेत.

यानंतर कार्यक्रमात 'ताटीच्या अभंगा'ची ध्वनीचित्रफित दाखवण्यात आली. लेखिका योजना शिवानंद यांनी या पुस्तकातील प्रकरणाचे अभिवाचन केले. त्यांच्याविषयी सांगायचं तर अभिजात संगीतातील गायिका योजना शिवानंद या बी. एस. सी. टेक्स्टाईल आणि हिंदुस्थानी शास्त्रीय गायनातील पदविकाधारक असून अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या संगीत अलंकार आहेत. त्यांचे संगीताचे प्राथमिक शिक्षण त्यांच्या आईकडे झाले. त्यानंतर पं. निवृत्तीबुवा नाईक, पं. निळकंठबुवा अभ्यंकर, पं. वसंतराव राजोपाध्ये, विदुषी माणिकताई भिडे, पं. ए. के. अभ्यंकरबुवा आणि पं. शिवानंद पाटील या दिग्गज गुरुंकडे त्यांनी शिक्षण घेतले. पं. प्रसाद गुळवणी, डॉ. रामदास भटकळ, डॉ. मिलिंद मालशे यांचे मार्गदर्शन त्यांना लाभले. शिवाय पंडिता जयमाला शिलेदार, पं. गोविंदराव पटवर्धन, पं. वासुदेव चंद्रचूड आणि पं. यशवंत देव हेही त्यांचे गुरु आहेत. त्यांनी मराठी गद्य आणि संगीत रंगभूमीवरही काम केले आहे. पंडित शिवानंद यांच्यासह त्यांनी 'योजना प्रतिष्ठान'ची स्थापना केली. त्यांना काही महत्त्वाचे सन्मान लाभले आहेत. 'सारेगामा इंडिया लिमिटेड एचएमव्ही'मध्ये त्या हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत आणि मराठी संगीत विभागात सिनियर मॅनेजर म्हणून त्या कार्यरत होत्या. त्यानिमित्ताने अनेक दिग्गजांसोबत काम करण्याचे भाग्य त्यांना लाभले.

'ग्रंथाली'च्या विविध उपक्रमांची माहिती 'ग्रंथाली'चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी उपस्थितांना दिली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले. सगळ्याच मान्यवरांच्या बोलण्यात या पुस्तकाचे सांस्कृतिक क्षेत्रातील महत्त्व पुन्हापुन्हा अधोरेखित झाली. शिवानंद आणि योजना यांच्याशी असलेल्या ऋणानुबंधांच्या गाठी त्यांनी उलगडल्या. प्रा. डॉ. सदानंद मोरे यांची प्रस्तावना या पुस्तकाला लाभली आहे. त्यांनी मनोगतात सांगितले की, ''महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात खरेतर भावजीवनात पंढरीच्या वारीला महत्त्वाचे स्थान आहे. गेली कित्येक शतके भक्तीचा

हा वेगळा आविष्कार महाराष्ट्र पाहात आहे. भजन हा वारकरी संप्रदायाचा आत्मा आहे. वारकऱ्यांच्या या भावसंगीताला शास्त्रीय संगीताच्या कोंदणात बसवण्याचा मोह अनेक नामवंत गायकांना आवरलेला नाही. शिवानंद आणि योजना यांनी प्रतिष्ठानतर्फे या उपक्रमाला संस्थात्मक व नियमित रुप प्राप्त करून दिले. हे त्यांचे महाराष्ट्रावरील सांस्कृतिक ऋण आहे, असे मी मानतो. शिवानंद यांच्यामागेही या संगीतवारीत खंड न पडू देण्याची प्रथा योजनाताईंनी पाळली आहे. हा सगळा प्रवास पुस्तकरुपाने मांडताना ते सारे क्षण पुन्हा सापडले, तेच आता वाचकांनाही अनुभवता येणार आहेत.'' योजना शिवानंद या पुस्तकात लिहितात की, ''पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात संगीतसेवा करण्याचा योग आम्हा दोघांना विवाहानंतर अगदी लगेचच जुळून आला होता. पांडुरंगाचं साक्षात दर्शन प्रत्यक्ष गाभाऱ्यातूनच आम्हांला झाले होते. पुढे या पांडुरंगाची २५ वर्षं अखंड संगीतसेवा आमच्याकडून होईल याची पुसटशीही जाणीव तेव्हा नव्हती. आपण काहीही करत नसतो, कर्ताकरविता तो 'विठ्ठल'च आहे.'' संगीतानंदात न्हायलेल्या आणि भक्तिरसाची निर्मिती करणाऱ्या 'योजना प्रतिष्ठान'निर्मित आषाढी एकादशीच्या निमित्तानं आयोजित केलेल्या भक्तिसंगीत मैफिलींचा विलक्षण भारावलेल्या काळाचा सारा पट या पुस्तकाच्या निमित्ताने वाचकांच्या डोळ्यांसमोर साक्षात उभा ठाकतो.

– राधिका कुंटे
भ्रमणध्वनी : ९८२००८९३७६
kunte.radhika@gmail.com

## 'मनीमानसी'


फादर फ्रान्सिस दिब्रेटो


प्रभाकर सूर्यवंशी


संगीता अरबुने



ज्योती कपिले

१० जून २०१८ रोजी जीवनदर्शन केंद्र, चर्च, वसई येथे फादर फ्रान्सिस दिब्रेटो यांच्या हस्ते संगीता अरबुने यांच्या ग्रंथाली प्रकाशित 'मनीमानसी' या लेखसंग्रहाचे प्रकाशन झाले. हे त्यांचे पाचवे पुस्तक. या आधी त्यांचे तीन कवितासंग्रह, एक कथासंग्रह प्रसिद्ध झाला आहे.

यावेळी व्यासपीठावर फादर फ्रान्सिस दिब्रेटो यांच्यासोबत 'नवशक्ती', 'ऐसी अक्षरे रसिके' पुरवणी संपादक प्रभाकर सूर्यवंशी, 'ग्रंथाली' प्रतिनिधी धनश्री धारप, लेखिका कवयित्री ज्योती कपिले आदी मान्यवर उपस्थित होते.


याप्रसंगी बोलताना फादर फ्रान्सिस दिब्रेटो यांनी '' 'ग्रंथाली'ने 'मनीमानसी'च्या रुपात महाराष्ट्राला एक अतिशय चांगले पुस्तक दिले आहे. या संग्रहातील लेख नुसतेच आवडले नाहीत तर ते भावले.'' अशा शब्दात या पुस्तकाचा गौरव केला. पुस्तकाविषयी बोलताना पुढे ते म्हणाले, ''या पुस्तकात शाश्वत सत्याचा अंश आहे. आजच्या काळाला सुसंगत विचार आहेत. प्रगल्भ असं चिंतन आहे. भावना, तत्त्वज्ञान, सामाजिक विश्लेषण आणि मनोविश्लेषण आहे.'' आपल्या भाषणात त्यांनी या पुस्तकातील अनेक उद्धृते देखील वाचून दाखवली. अनेक लेखांचं विश्लेषण देखील केले. त्याबरोबरच महत्वाचे सामाजिक, साहित्यिक, आध्यात्मिक आणि तात्त्विक मुद्दे मांडतानाच सामजिक वास्तव प्रामाणिकपणे आणि निर्भीडपणे मांडणं ही लेखकांची जबाबदारी असल्याचे मत व्यक्त केले.

प्रभाकर सूर्यवंशी यांनी संगीता अरबुने यांचे नवशक्तीची रविवारची पुरवणी 'ऐसी अक्षरे रसिके'मधील 'मनीमानसी' सदर अतिशय लोकप्रिय झाले होते. वाचकांची या सदराला भरभरून पत्र यायची. त्यांची लिहिण्याची शैली देखील प्रभावी आणि सुंदर असल्याचे सांगतानाच हे सदर पुन्हा नव्याने सुरू झाले पाहिजे असे आवाहनही केले.

धनश्री धारप यांनी 'ग्रंथाली'ची भूमिका विशद केली आणि सकारात्मक संदेश देणारे पुस्तक म्हणून 'मनीमानसी'चे महत्त्व स्पष्ट केले.

ज्योती कपिले यांनी आपल्या ओघवत्या सूत्रसंचलनातून अरबुनेंच्या लेखनाच्या महत्त्वाच्या पैलूंना स्पर्श केला. सदर कार्यक्रम अतिशय नेटकेपणाने संपन्न झाला.

# 'सल शिक्षणाचा'


दिनकर गांगल


सूर्यकांत कुळकर्णी


लक्ष्मीकांत देशमुख


रत्नाकर गायकवाड

'ग्रंथाली' प्रकाशित सूर्यकांत कुलकर्णी लिखित 'सल शिक्षणाचा' हे पुस्तक आज मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित होत आहे याचा मला अभिमान वाटतो. सूर्यकांत कुलकर्णी यांच्या बद्दल बोलताना म्हणाले की, सूर्यकांत कुलकर्णी यांनी गेली २५ वर्षे 'वंचितांचे शिक्षण', 'बालमजुरांचे शिक्षण' असे विषय घेऊन राज्यभर परिषदा घेतलेल्या आहेत. राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोगाने 'राज्य समन्वयक' म्हणून त्यांची नेमणूक सुद्धा केली होती. शिक्षणावर काम करीत असताना समाजातील शिक्षणाचे प्रश्न सुटत नाहीत. समाजाचा शिक्षणाशी काही संबंध राहिलेला नाही. समाज शिक्षणाच्या प्रश्नावर फारसे बोलत नाही, कोणी कोणाला जाब विचारात नाही, म्हणूनच शिक्षणाचे प्रश्न कित्येक वर्षे प्रलंबित राहिले आहे हे त्यांना शिक्षण क्षेत्रात काम करीत असताना जाणवले. पण हे प्रश्न सुटले पाहिजेत, ते समाजासमोर मांडले पाहिजेत म्हणून त्यांनी विविध लेख लिहिले आहेत. या सर्वांवर चिंतन व्हावे ही त्यांची भूमिका आहे. असे उद्‌गार दिनकर गांगल यांनी 'सल शिक्षणाचा' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात केले.

'ग्रंथाली'बाबत बोलताना प्रारंभी आपल्या प्रास्ताविकात सुदेश हिंगलासपूरकर ते म्हणले की, 'ग्रंथाली' ही, गेली ४३ वर्षे 'वाचन संस्कृती' वाढावी याकरिता काम करीत आहे या ४२ वर्षात ग्रंथालीने ९०० पुस्तके प्रकाशित केली आहेत. शिक्षण या विषयाशी संबधित ३० पुस्तके प्रकाशित केली आहेत. यामध्ये प्रामुख्याने रमेश पानसे, लीलाताई पाटील, बापू गवांदे व अन्य लेखकांच्या पुस्तकांचा समावेश आहे. या शिवाय ग्रंथाली तर्फे दरमहा शब्द रुची हे मासिक पण प्रकाशित होत असते. तसेच शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षकांकरिता वाचन चळवळ सुरू करण्याचा ग्रंथालीचा मानस आहे. जेणेकरून मुलांमध्ये आणि शिक्षकांमध्ये पुस्तकांविषयी कुतूहल निर्माण होईल.

दिनकर गांगल त्यांच्या मनोगत म्हणाले की मी आणि सूर्यकांत गेली तीस-चाळीस वर्ष एकमेकांना ओळखतो ते सांगत असतात आणि मी ऐकत असतो. त्यांचे अट्टाहास आणि आग्रह हे गुण मला खूप आवडतात त्यांची शिक्षण या विषयी हुकुमत आणि आक्रमक मांडणी, हे मी मागील सरदार या नावाच्या आर्टिकलमधून लिहिले आहे. शिक्षण या व्यवस्थेवर परिणाम करणारे चार घटक जे आहेत त्यापैकी समाज हा प्रमुख घटक यातील चांगल्या गोष्टीची उपेक्षा करीत असतो, पण त्याकडे कोणी लक्ष देत नाही म्हणून ते तळमळीने सांगत असतात की, आपल्यावर जो अन्याय होतो आहे तो केवळ आणि केवळ आपल्यामुळेच होतो आहे आणि अन्याय करणारे जे घटक आहेत, त्यापैकी प्रशासनातीलही चांगले काम करणारे जे निवृत्त प्रतिनिधी आहेत त्या विषयी या पुस्तकात विस्तृतपणे मांडले आहे. रत्नाकर गायकवाड यांनी जे चांगले काम केले त्यांचा पण उल्लेख या पुस्तकात आहे. नोकरशाही हा आपल्याला सर्वात जास्त डाचणारा वर्ग आहे. शिक्षण क्षेत्रातील महत्त्वाचे दोन घटक म्हणजे एक शिक्षकांचा आणि दुसरा संस्थांचा, संस्थांच्या तर एक एक हकिकती भयानकच आहे हे सांगून पट पडताळणीची विदारकता कशी आहे त्याचे उदाहरण कुलकर्णी यांनी लेखांतून समोर ठेवले. हे सर्व शिक्षणातील भयानकता शासनाने कशी सहज गुंडाळून ठेवली आहे हे सांगितले. हे सर्व विखुरलेल्या अवस्थेतील लेखन पुस्तकाच्या रूपाने आपल्यासमोर येत आहे.

हे पुस्तक म्हणजे या शिक्षण व्यवस्थेची अस्वस्थता आहे हे आमच्या दोघांपुरते न राहत त्याचे शेअरिंग व्हावं. ही अस्वस्थता आम्ही तुमच्यापर्यंत वाटत आहोत हे बघून तुम्ही शांत बसू नका. या पुस्तकाचा प्रचार करा. शिक्षणाविषयी सध्या धोरण नाही. त्याविषयी लेखकांनी काही चांगल्या बाबी/मार्ग सुचवलेल्या आहेत. उदा. शेतीशाळा त्या बाबींचा विचार व्हावा. 'ग्रंथाली'ने सुरू केलेल्या 'थिंक महाराष्ट्र' या दालनाविषयी गांगल यांनी माहिती सांगितली.

या नंतर पुस्तक प्रकाशनचा सोहळा मान्यवरांच्या हस्ते पार पडला.

सूर्यकांत कुलकर्णी त्यांच्या मनोगतात म्हणाले, की दिनकर गांगल यांनी माझे ऐकून घेतले व माझ्याकडून पुस्तक लिहून घेतले असे म्हणावयास हरकत नाही, त्याबद्दल त्यांचे आभार. 'मी

बोलतो आणि ते ऐकतात' हे जरी खरे असले तरी मला बोलावयास लावणे हे सुद्धा खूप महत्त्वाचे आहे. शिक्षणव्यवस्थेसंदर्भात काही प्रेरणादायी बोलावे असे गांगलांना वाटत असते. पण तसे चांगले काहीच नाही उलट हे खूपच त्रासदायक आहे हे मी त्यांना नेहमी उदाहरणासहित सांगत असे. हे ऐकून ते पण कित्येकदा अस्वस्थ होत असत. हे सर्व लिखाण लोकांसमोर मांडले पाहिजे याकरता त्यांनी माझ्याकडून लिखाण करून घेतले त्याबद्दल त्यांचे आभार.

या ठिकाणी उपस्थित असलेले बालशिक्षणातील तज्ज्ञ रमेश पानसे यांच्याकडून सुद्धा मी खूप शिकलो. ते प्राथमिक शिक्षणातील महाराष्ट्रातील बापमाणूस आहे. या कार्यक्रमाला आपण सर्वजण आलात त्याबद्दल सर्वांचे आभार. मला जे काही म्हणायचे आहे ते सर्व मी पुस्तकात मांडले आहे. रत्नाकर गायकवाड यांनी पटपडताळणीतील वाईट गोष्टी समोर आणल्या पण दुर्दैवाने त्या पुढे काही कार्यवाही झाली नाही.

शासन ही एक खूपच वाईट सिस्टीम आहे. तरीपण शासनामध्ये रत्नाकर गायकवाड, लक्ष्मीकांत देशमुख यांसारखे खूप चांगले अधिकारी आहेत त्यांनी खूप चांगले काम केले आहे. त्यांच्यासारखे राज्यात ८-१० अधिकारी झाले तर महाराष्ट्र बदलण्यास फार काळ लागणार नाही. सध्या शासनाने एक कायदा केला तो म्हणजे नुसते रजिस्ट्रेशन केले तर त्या त्या वयानुसार परीक्षेला बसून पास होता येते. ही गंभीर बाब असून दुर्दैव हे आहे की, यावर कोणी काही बोलत नाही, ही माझी सल आहे.

लक्ष्मीकांत देशमुख यावेळी बोलताना म्हणाले, की सूर्यकांत कुळकर्णी यांचे चाळीस वर्षाचे चिंतन आणि कार्य मोलाचे आहे. त्यांनी शिक्षणक्षेत्रातील समस्या 'शिक्षणाचा सल' या पुस्तकात मांडली आहे. शिक्षणासाठीची त्यांची तळमळ फार महत्त्वाची आहे. त्यांच्या कामाची व्यापकता खूप आहे.


आपण शिक्षणामध्ये काम न केल्यामुळे तरुणाची बेरोजगारांची फौज निर्माण होऊन नवीन समस्या निर्माण होत आहेत. शाळा, कॉलेजमधून बाहेर पडलेले मुले ही बहुसंख्य दर्जाहीन असतात. 'असर' व शासनाचे या संदर्भातील जे काही रिपोर्ट आहेत ते धक्कादायक आहेत. आपल्याकडे शिक्षणाची अनास्था फार मोठ्या प्रमाणात असून त्याची विवंचना या पुस्तकात मांडली आहे. शिक्षणाची परिस्थिती सुधारण्यासाठी समाजाने पुढे आले पाहिजे. पण समाजाला किती कळते हा चिंतेचा विषय आहे. शिक्षण आणि आरोग्य हे विषय राजकीय लोकांच्या हातात नसले पाहिजेत हे सांगून शिक्षण सभापती हे निरक्षर असल्याचे माझ्या अनुभवात आहे. समाजात उत्तम शिक्षक निर्माण झाले पाहिजे. तसेच प्रत्येक मुलाला समान शिक्षण मिळाले पाहिजे. मुलांनी अवांतर वाचन केले पाहिजे. अवांतर वाचनाने मुले बुद्धिमान होऊ शकतात.

रत्नाकर गायकवाड यांनी त्यांचे मनोगत पुढील शब्दांत व्यक्त केले. ज्यांचे जीवन पूर्ण निस्वार्थाने, त्यागाने भरलेले आहे त्यापैकी सूर्यकांत कुलकर्णी एक आहेत.त्यांनी सुरु केलेले उपक्रम पाहिले तरी याची कल्पना येते. चाळीस वर्षापूर्वी कार्पोरेट क्षेत्रात असलेली चांगली नौकरी सोडून सूर्यकांतजी कुलकर्णी यांनी अनाथ मुले आणि दिन दुबळ्यासाठी काम सुरू केले. त्यांनी 'शिक्षणाचा सल' या पुस्तकात निर्भीडपणे मते मांडून /शिक्षणाच्या समस्यांचे निराकरण कसे करावे हे सुद्धा सुचवले आहे. 'शेतीशाळा' ही उत्तम संकल्पना या पुस्तकात मांडली आहे.

शाळाबाह्य मुलांचे जे प्रश्न मांडले आहेत ते खूप महत्त्वाचे आहेत. पुस्तकाला अनुसरून घेतलेले मुद्दे स्टेक होल्डरच्या लक्षात आणून दिले पाहिजे.

सावनी कुलकर्णी यांनी उपस्थितांचे आभार मानले व शेवटी पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.


ग्रंथाली




**सर्वांना आग्रहाचे निमंत्रण**

**बुधवार, १ ऑगस्ट २०१८**

**सुनीता गानू आणि आनंद गानू लिखित**

**गर्जे मराठी (इंग्रजी भाग २)**

आणि

**गर्जे मराठी (मराठी भाग १ जनावृत्ती)**

**प्रकाशन समारंभ हस्ते – डॉ. अनंत देशपांडे (संस्थापक-अध्यक्ष, Persistent Systems Ltd.)**

**उपस्थिती : *सहभागी लेखक* – प्रशांत रानडे, डॉ. श्रीकांत माने, डॉ. उर्मिला दिवेकर, डॉ. मिलिंद भंडारकर, महेश काळे, डॉ. पराग हवालदार, डॉ. शामकांत नवाथे, अजित रानडे (जर्मनी), हर्षवर्धन भावे**

**स्थळ : पु.ल. देशपांडे कला अकादमी (रवींद्र नाट्यमंदिर), तळमजला, प्रभादेवी, दादर, मुंबई ● वेळ सायं. ६ वा.**

# 'कविताच... माझी कबर'मधून काळाचा वेध

'कविताच... माझी कबर' या कवितासंग्रहामधूनही काळाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे, असे विचार प्रसिद्ध कवी वसंत आबाजी डहाके यांनी व्यक्त केले.

सार्वजनिक वाचनालयाच्या औरंगाबादकर सभागृहात संजय चौधरी यांच्या 'कविताच... माझी कबर' या कवितासंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी माजी मंत्री विनायकदादा पाटील, ज्येष्ठ साहित्यिक प्रभा गणोरकर, डॉ. रमेश पाटील, शशिकांत गुळूमकर, कवी अरुण शेवते, सुदेश हिंगलासपूरकर, कवी संजय चौधरी आदी उपस्थित होते.

डहाके पुढे म्हणाले, की जागतिकीकरण, उदारीकरण आणि खासगीकरणाच्या आजच्या काळात प्रत्येक माणूस प्रभावित झाला आहे. तो आपले मूळ ठिकाण, खरेखुरे अस्तित्व शोधतो आहे. त्यासाठी तो अगतिक झाला आहे. ही सारी अस्तित्वाशी निगडित असलेली तडफड या कवितांमधून व्यक्त होते आहे. प्रभा गणोरकर म्हणाल्या की, 'कादंबरी, आत्मचरित्र वाचून माणूस समजेलच असे नाही. माणूस समजून घ्यायचा असेल तर कविताच लिहिली गेली पाहिजे. 'माझं म्हणणं' हा कवितासंग्रह सांगतो आहे, असे प्रत्येकाला वाटेल. आतून आलेल्या या जाणिवा आहेत.' चौधरी म्हणाले, की कविता हे माणसाला जिवंत ठेवण्याचे साधन आहे. आतल्या जाणवलेल्या पोकळीची, बदललेल्या माणसाची ही कविता आहे. कवितेचे बोट कधीही सोडता येणार नाही. सुदेश हिंगलासपूरकर यांनी प्रास्ताविक केले तर अजीम नवाज राही यांनी सूत्रसंचालन केले.

# 'कविताच... माझी कबर'च्या निमित्ताने



राजू देसले, चांगदेव काळे, सुदेश हिंगलासपूरकर, प्राजक्त देशमुख, अरुण शेवते, संजय गीते, संजय चौधरी, मनिषा चौधरी आणि धनश्री धारप

कवी संजय चौधरी यांच्या कवितासंग्रहाचा प्रकाशन सोहळा नाशिक येथे मोठ्या थाटात पार पडला. या निमित्ताने नाशिकमधील कलावंतांच्या आणि मान्यवरांच्या भेटी झाल्या. पहिलाच उल्लेख करायचा झाला तर तो प्राजक्त देशमुख यांचा करावा लागेल. कवी, नाटककार, दिग्दर्शक आणि उद्योजक अशी त्याची ओळख म्हणता येईल परंतु त्याची मोहोर ज्या नाटकावर उमटलेली आहे आणि जे नाटक आज सगळ्यांच्या चर्चेचा विषय झाले आहे, त्या 'देवबाभळी.' या नाटकाचे लेखन, गीत लेखन आणि दिग्दर्शन प्राजक्तने किती समर्थपणे केले आहे, याचे वर्णन नाटक पाहिलेल्या अरुण शेवतेंसारख्या जाणत्या नाट्यरसिकांच्या तोंडून ऐकायला हवे. त्यांच्याच आग्रहाखातर प्राजक्तच्या भेटीचा योग जुळून आला. प्राजक्त नुसताच भेटीला आला नाही, सर्व व्यवधाने सोडून आम्हाला मुंबईच्या प्रवासाला निघण्याच्या शुभेच्छा देईपर्यंत आमच्या सोबत राहिला. एक भारावून टाकावे असे हे उमदे व्यक्तिमत्त्व. हे नाटक कसे सुचले, ते लिहीत असताना कोणता विचार समोर ठेवला. तुकाराम दिसत नाही पण ऐकू येतो, विठ्ठल हजर आहे परंतु दिसत नाही आणि या दोघांच्या सोबत रंगमंचावर आहेत फक्त रुक्मिणी आणि आवली. आपला नवरा एका परक्या बाईचा पाय हातात धरून तिचा काटा काढतो, आणि तिच्या मदतीला विठ्ठलामुळे तिच्या घरी आलेली रुक्मिणी. तर या विठ्ठल भक्तीत तुकारामाचे प्रापंचिक व्यवहाराकडे दुर्लक्ष होत असल्याचा त्रागा करणारी आवली. या चौकटीत हे नाटक कसे उभे राहिले, प्रदीप मुळे यांनी

त्यासाठी नेपथ्य कसे सजविले, नाटक पाहून मान्यवरांनी प्रतिक्रिया कशा व्यक्त केल्या याची माहिती प्राजक्तने मृदू आणि संयमी शब्दांत दिली.

दुसरा तरुण कलावंत भेटला तो संजय गिते. स्वतः गायक असलेला हा तरुण नुसताच गात नाही, गाण्यांचे रेकार्डिंग करण्याचा छानसा स्टुडिओ त्याने उभारलेला आहे. तो गाणे शिकवतो. अतिशय दिलखुलास असलेल्या या गायक मित्राने त्याचा स्टुडिओ तर दाखविलाच परंतु त्याने गायलेली गाणी, ध्वनिमुद्रित केलेली गाणी ऐकवली. लता मंगेशकर, जगदीश खेबुडकर यांच्या सोबत काम केलेल्या या कलावंताची अनेक गाणी ध्वनिमुद्रित झालेली आहेत. जाहिरातींचे प्रोमो, कार्यक्रमांचे मुखडे तयार करून दिलेले आहेत. कवी प्रकाश होळकर यांची गीते, आदिवासींसाठी तयार केलेले गीते, अशी कितीतरी गाणी त्यांनी ऐकवली, तेव्हा या हरहुन्नरी कलावंताचे कौतुक वाटले. आपण नाशिकमध्ये नसून मुंबईत आहोत. एका मोठ्या प्रतिथयश कलावंताच्या स्टुडिओत आहोत असाच भास होत राहिला. आतिथ्यशीलतेने अतिशय भारावून टाकले या मित्राने.

वैद्यकीय पेशात स्वतःला झोकून देताना आपल्याला समाजसेवा करायची आहे, हे भान सतत राखलेल्या एका सेवाभावी माणसाचा परिचय झाला. ते नाव आहे डॉ. राजेंद्र मालोसे. गेली चाळीस वर्षे ते चांदवडसारख्या ग्रामीण भागात आपले योगदान देत आहेत. दुर्धर किंवा मोठा आजार असेल, किंवा तातडीच्या उपचारांची गरज असेल तेव्हा हे गृहस्थ रुग्णांना स्वतःच्या खर्चाने मुबईत जे. जे. रुग्णालयात घेऊन जात असत. चाळीस वर्षे हे व्रत सांभाळलेले डॉ. मालोसे स्वतः मोठे लेखक आहेत. देशमुख अणि कं. सारख्या प्रथितयश प्रकाशनसंस्थेमार्फत त्यांची पुस्तके प्रकाशित झाली आहेत. 'गाथासप्तपदी' आणि 'स्वप्नपंख' सारखे मोठे ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. त्यांच्या तीनतीन आवृत्त्या निघालेल्या आहेत, परंतु अतिशय शांत स्वभावाचे, स्वतःविषयी काहीच न बोलणारे, रूग्णसेवा आणि आपली लेखणी यात मग्न असलेला हा माणूस पाहताना प्रकाश आमटेंची आठवण झाली.

मंदार दातार हे आणखी एक व्यक्तिमत्त्व. छपाईची सर्व आधुनिक यंत्रे आणि सुविधा बाळगणारा हा व्यवसायिक. फक्त काम सांगा. सुबकपणे तुमच्या इच्छेपेक्षा अधिक चांगले काम करून देण्याची हमी देणारा हा उमदा व्यवसायिक.

सुदेश हिंगलासपूरकर आणि अरुण शेवते यांच्या कल्पतेला याकरता दाद द्यायला हवी. रिमझिम पावसाच्या सरींचा आनंद घेताना संजय चौधरी यांच्या मित्रपरिवाराच्या सहवासाच्या सरीही अनुभवत राहिलो.

वसंत कानेटकर, कवी कुसुमाग्रज यांच्यानंतर या शहराचा लौकिक कायम ठेवण्याचे श्रेय या कलावंतांकडे आहे असे हमखास म्हणता येते.

रिमझिम पावसाच्या सरींचा आनंद घेताना संजय चौधरी यांच्या मित्रपरिवाराच्या सहवासाच्या सरीही अनुभवत राहिलो. सुदेश हिंगलासपूरकर आणि अरुण शेवते यांच्या कल्पतेला याकरता दाद द्यायला हवी.

## 'झुंड' प्रकाशन



सोशल मीडियाची व्याप्ती जसजशी वाढत आहे. तसतसा अलिकडच्या काही वर्षापासून सर्वांमध्ये निराशावाद वेगाने पसरत आहे. गल्लीतल्या प्रश्नाबद्दल बोलायला कोणाला वेळ नसला तरी भविष्यात लोकशाहीचे काय होईल, याची चिंता सर्वांना आहे. त्यामुळे किमान माध्यमांनी तरी अधिकृत स्त्रोताकडून उपलब्ध होणाऱ्या माहितीची शहानिशा केल्यानंतर त्याची बातमी करावी, असे प्रतिपादन ज्येष्ठ नेते व साहित्यिक यशवंतराव गडाख यांनी केले.

पत्रकारितेचे सर्वांगीण पैलू उलगडणाऱ्या ज्येष्ठ साहित्यिक व लेखक डॉ. संजय कळमकर लिखित 'झुंड' कादंबरीचे प्रकाशन करताना ते बोलत होते. अलिकडच्या काही वर्षांमध्ये पत्रकारिता आमुलाग्र बदलली आहे. कळमकर यांच्या कादंबरीमुळे या क्षेत्रात येत असलेल्या नवख्या पत्रकारांना मार्गदर्शन मिळेल. फक्त राजकीय नेते किंवा प्रशासन समाजात कधीच बदल घडवून आणू शकत नाहीत. त्यासाठी समाजातील सर्वच घटकांचा सहभाग हवा असतो. त्यातही प्रतिभावंत लेककांनी निर्माण केलेल्या साहित्याचे वाचन झाल्यास बदलासाठीची नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा गडाख यांनी व्यक्त केली.

यावेळी राज्याचे जलसंधारण तथा नगरचे पालकमंत्री राम शिंदे, ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार, जिल्हा परिषद अध्यक्षा शालिनी विखे, आमदार राहुल जगताप, शिक्षक नेते उदय शिंदे, 'ग्रंथाली'चे सुदेश हिंगलासपूरकर उपस्थित होते.

हा प्रकाशनसोहळा रविवार, १ जुलै २०१८ रोजी अहमदाबादमध्ये पार पडला.

# ॥ग्रंथाली॥




## पत्रास कारण की... – अरविंद जगताप

पत्र खरंतर खाजगी गोष्ट असते. एकट्याने वाचण्याची. एकट्याने लिहिण्याची. पण तुमच्या प्रतिसादामुळे पत्रं जाहीरपणे वाचली गेली. ऐकली गेली. टीव्हीवर सहसा पुस्तकातल्या गोष्टी असतात. टीव्हीवरच्या गोष्टीचं पुस्तक होणं आपल्याकडे दुर्मिळ आहे. हा योग तुमच्या पत्रावरील प्रेमामुळे जुळून आलाय. वाचता वाचता अचानक पेन घेऊन तुमच्यातला कुणी आपल्या आवडीच्या माणसाला पत्र लिहायला बसेल. आपलं लिखाण नेमक्या पत्त्यावर पोचलंय याचं अरविंद जगताप यांना समाधान होईल. मूल्य १५० रु. सवलतीत १०० रु.

## मोराची बायको – किरण येले




किरण येले यांचा जो कथाप्रवास चालतो, त्याला उत्तम सामाजिक ग्रहणशक्तीचे अधिष्ठान लाभलेले आहे. कथेतील पात्रे सर्वसामान्य स्तरावरची, विशिष्ट परिस्थितीत कुंचबलेली, असहाय्य असली तरी ती काठाला लागण्यासाठी सकारात्मकतेने धडपडताना दिसतात. तसा विविध स्तरांवरील माणसांच्या, स्त्री–पुरुषांच्या कथा सांगणारा 'मोराची बायको' हा कथासंग्रह एक अनोखा 'टोपाझ' आहे.

**– आनंद अंतरकर**

मूल्य १८० रु. सवलतीत ११० रु.




## प्लॅटफॉर्म नंबर ९ – किरण येले

हे नाटक म्हणजे प्रातिनिधिक चित्रण आहे, घरातनं पळून आलेल्या आणि रेल्वेप्लॅटफॉर्मवर आयुष्य कंठणाऱ्या अनाथ मुलांचं. प्रतिकूल परिस्थितीतही, हसत–खेळत जगत, विघातक व्यवस्थेशी फलाटावरल्या मुलांचा चाललेला लढा या नाटकात येतो. बुटपॉलिश करणारी, बाटल्या वेचणारी, गजरे विकणारी अशी विविध कामं करणारी मुलं कोणत्या वास्तवातून जात असतात याचं दाहक चित्रण या नाटकात येतं.

मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.

## लाखातली एक – चित्रा मेहेंदळे




लहानपणापासून लागलेल्या दुखण्यांची लांबलचक श्रेणी आणि कॅन्सरशी दिलेला दीर्घकालीन लढा, त्या दुःख–वेदनांमधूनही आत्मसात केलेल्या अनेक गोष्टींमधून मिळवलेला सृजनशील आनंद हा सारा प्रवास अतिशय प्रेरणादायी आहे. या दुखण्याच्या प्रवासाचे कथनही लेखिका चित्रा मेहेंदळे यांनी वेगळ्या आकृतिबंधात मांडल्याने निर्भेळ असा वाचनानंद वाचकाला मिळत राहतो.

**– माधवी कुंटे**

मूल्य १५० रु. सवलतीत १०० रु.




## माझा प्रवास... माझे अनुभव – रेखा राव

लेखिका रेखा राव यांना लहानपणापासून प्रवासाची खूप आवड. त्यांच्या पतीला नैरोबी, किसुमु व मौबासा या तीन शहरांत मॅनेजर म्हणून काम करायची संधी मिळाली. आणि तिथे राहून चाळीस वर्षांपूर्वीचे तिथले जीवन पाहण्याची व अनुभवण्याची संधी मिळाली. गेली तीस वर्षे त्या विविध मासिके, दिवाळी अंक, वर्तमानपत्रांतून कथा–लेख–प्रवासवर्णनं लिहितात. १९८२ साली लेखिका रेखा राव यांनी 'श्री दीपलक्ष्मी' मासिकातून केनियाविषयी लेख लिहिले. तेच लेख त्यांनी पुस्तकरूपाने सादर केले आहेत. मूल्य १६० रु. सवलतीत १०० रु.

## मनतरंग – दीपक घैसास




दीपक घैसास– अत्यंत बुद्धिमान आणि कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व! नानाविध विषयांवरचं लेखन तसंच भाषणं त्यांच्या बहुआयामी व प्रेरणादायी व्यक्तित्वाची साक्ष देतात. पुस्तकातील लेखांमधून अर्थशास्त्र, समाजशास्त्र, पुराण, इतिहास, तत्त्वज्ञान, तंत्रज्ञान अशा अनेक विषयांचा कल्पकतेनं वेध घेतला आहे. भातुकलीपासून भौतिकशास्त्रापर्यंत कोणताही विषय मोजक्या शब्दांत प्रभावी मांडण्याचं कसब त्यांच्या लेखणीत आहे. लिखाणातील अस्सलपणा आपल्या विचारांना चालना देतो आणि ओघवती शैली मनाची पकड घेत.

**– इला भाटे**

मूल्य १८० रु. सवलतीत ११० रु.

**व्यावसायिक आणि कौटुंबिक जीवनाचा समतोल साधण्यासाठी मार्गदर्शन करणारं पुस्तक**

मेहता पब्लिशिंग हाऊस

**देवाजीचं ऑफिस**
**लेखक : जेम्स जोसेफ**
**अनुवाद सुनीता कट्टी**




नोकरी करणाऱ्या, विशेषत: मोठ्या पदावर नोकरी करणाऱ्या लोकांचा बराचसा वेळ ऑफिसच्या कामात जातो. त्यात ऑफिसमध्ये जाणं आणि परत घरी येणं या वेळेचाही समावेश असतो. ऑफिस घरापासून लांब असेल, तर जाण्या-येण्यात माणूस दमून जातो. त्याला कुटुंबासाठी वेळ देता येत नाही. तो अन्य कोणत्या गोष्टींचा आस्वाद घेऊ शकत नाही; पण घरात बसून जागतिक दर्जाच्या कंपनीबरोबरही किती सहजपणे काम करता येतं, याचा आदर्श वस्तुपाठ म्हणजे जेम्स जोसेफ यांचं 'गॉड्स ओन ऑफिस' हे पुस्तक. 'देवाजीचं ऑफिस' या शीर्षकासह त्याचा अनुवाद केला आहे, सुनीता कट्टी यांनी!

जेम्स यांना पाच भावंडं. ते सहावे. ते दोन वर्षांचे असताना त्यांच्या आईला कॅन्सर झाला आणि त्याच वेळेला वडिलांना अपघात होऊन ते कोमात गेले; पण तीन महिन्यांनंतर ते कोमातून बाहेर आले. जेम्स यांच्या आईचं मात्र निधन झालं. आईच्या निधनानंतर त्यांच्या वडिलांनी सहाही मुलांना वसतिगृहात ठेवलं. जेम्सच्या आईच्या माहेरच्या नातेवाईकांनी या सहाही भावंडांना भक्कम मानसिक आधार दिला. जेम्स इंजिनीअरिंगच्या शेवटच्या वर्षाला होते तेव्हा त्यांच्या वडिलांना परत अपघात झाला आणि ते कोमात गेले; मात्र या वेळेला ते कोमातून बाहेर येऊ शकले नाहीत. त्यांचा मृत्यू झाला. जेम्सची आणि त्यांच्या पत्नीची ओळख कशी झाली आणि त्यांचं लग्न कसं झालं, याबद्दलही त्यांनी लिहिलं आहे. आपल्या मुलींबद्दलही ते बोलतात. एकूण त्यांचं विवाहपूर्व जीवन असो किंवा विवाहानंतरचं, त्यांच्या कुटुंबाशी असलेले त्यांचे घट्ट स्नेहबंध जाणवत राहतात. आपल्या गावाविषयीची, तेथील लोकांविषयीची त्यांची आपुलकी लक्षात येते.

जेम्स यांनी या पुस्तकाद्वारे स्वत:चे अनुभव लोकांपर्यंत पोहोचवले आहेत. इंग्लंडसारख्या ठिकाणी शिक्षण घेऊन, इंग्लंड, अमेरिकेसारख्या प्रगत देशांमध्ये चांगल्या कंपनीत उच्च पदावर काम केल्यानंतर जोसेफ यांना भारतात केरळमध्ये आपल्या मूळ गावी परतावे, असे वाटू लागले. म्हणून त्यांनी त्यासाठी काय पूर्वतयारी केली, आपल्या छोट्याशा गावातून त्यांनी काम कसे सुरू केले, त्यात येणाऱ्या अडचणी गृहीत धरून त्यावर मात करण्यासाठी काय उपाययोजना केल्या, त्यांच्या निसर्गसंपन्न गावातील त्यांचं दैनंदिन, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक जीवन कसं आहे इ. बाबींचं निवेदन जोसेफ यांनी या पुस्तकातून केलं आहे.

हे पुस्तक म्हणजे तंत्रज्ञानाच्या युगात स्वत:चं भावविश्व कसं जपावं आणि ते व्यापक कसं करावं, याचंही जाता-जाता मार्गदर्शन करून जातं. जोसेफ यांची पत्नी डॉक्टर आहे. त्यामुळे तिला व्यवसायाबरोबरच सेवाभावही जपता येतो. त्यांच्या पत्नीची डॉक्टरकीची पदवी परदेशातील असल्यामुळे भारतात प्रॅक्टिस सुरू करण्यात तिला आलेले अडथळे आणि त्या अडथळ्यांवर जोसेफ यांनी केलेली मात, याचाही उल्लेख या पुस्तकात आला आहे.

त्यांच्या कामाच्या संदर्भातील जे जे उल्लेख या पुस्तकात आले आहेत, त्यावरून एकच गोष्ट लक्षात येते, की घरातून काम करताना ते कुठेही ढेपाळत नाहीत. उलट त्यांचा कामाचा वेग वाढलेला आहे. घरातून काम करताना कोणत्या गोष्टींची दक्षता घ्यावी, घरातून काम करतानाही आपल्या सहकाऱ्याशी कसं जोडलेलं रहावं, याबद्दलही ते सांगतात. प्रगत तंत्रज्ञानामुळे जगभरातील लोकांशी बसल्या जागी संपर्क साधून काम कसं करता येऊ शकतं, हे या पुस्तकावरून समजतं. घरातून काम करतानाही ऑफिसइतक्याच कार्यक्षमतेने काम केलं पाहिजे, असा मूलमंत्रही या पुस्तकातून मिळतो. या पुस्तकाच्या शेवटी जेम्स यांनी घरातून काम करायची इच्छा असेल तर कोणत्या गोष्टी तपासून घ्याव्यात याचं मार्गदर्शन केलं आहे.

एकूणच, घरातून काम करतानाचं तुमचं व्यावसायिक जीवन आणि कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक जीवन कसं असतं, याचं अगदी साध्या, सोप्या भाषेत निवेदन या पुस्तकात केलं आहे. मोठ्या कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्याना (विशेषत: मॅनेजर लेव्हलच्या) अशी घरातून काम करण्याची सोय उपलब्ध करून दिली, तर परदेशस्थ भारतीय परत भारतात येऊ शकतात, अशी सूचनाही जोसेफ यांनी केली आहे. जोसेफ यांनी या पुस्तकात सुरुवातीला नमूद केलं आहे, मोठा मासा बनून मोठ्या जलाशयात राहणं आणि लहान मासा बनून लहान तलावात राहणं, या दोन्ही गोष्टी मनाला सारखंच समाधान देतात. पहिली गोष्ट आपल्या व्यावसायिक बुद्धीला आव्हान देऊन संतुष्ट करते आणि दुसरी गोष्ट आपल्या भावनाप्रधान मनाला संतुष्ट करते. या दोन्ही गोष्टींचा उत्तम समन्वय जेम्स यांनी साधला आहे आणि त्यांच्यासारखं काम करणाऱ्यांसाठी ते एक उदाहरण आहेत.

साधी, सोपी आणि ओघवती भाषा हे या पुस्तकाचं वैशिष्ट्य ठरावं. अर्थातच त्याचं श्रेय जेम्स यांच्याबरोबर सुनीता कट्टी यांनाही द्यायला हवं. तेव्हा घरातून काम करण्याच्या या प्रसन्न अनुभवाचे साक्षीदार व्हायला सगळ्यांना नक्कीच आवडेल. आणि ज्यांना घरातून काम करायची इच्छा आहे त्यांना हे पुस्तक मार्गदर्शक ठरेल.

**– अंजली पटवर्धन**

**देवाजीचं ऑफिस**
मूळ लेखक : जेम्स जोसेफ
अनुवाद : सुनीता कट्टी
पृष्ठसंख्या : २०४
किंमत : २४०
प्रकाशन : मेहता पब्लिशिंग हाऊस
**'ग्रंथाली' सभासदांना सवलतीत १९५ रुपये**

## ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

### रम्य जगण्यातले भावविश्व

'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेले 'दिवस आलापल्लीचे' हे नीलिमा क्षत्रिय यांचे पुस्तक वाचनात आले. वरवर पाहता हे पुस्तक म्हणजे लेखांचा संग्रह, असे त्याचे स्वरूप आहे. परंतु हे अर्धसत्य ठरावे. हे लेख म्हणजे स्वैर लेखांचे पुस्तक नाही. ते आहे लेखिकेच्या बालपणींच्या आठवणींचा फुलोरा. हे लेख त्यांच्या आयुष्याशी जोडलेले आहेत. म्हणजे त्यांच्या चरित्राचा एक लहानसा भाग, असे त्याचे स्वरूप ठरते. कालखंडाच्या भाषेत मोजायचे तर अवघा चार वर्षांचा कालखंड. तोही १९७२ पासून सुरू झालेला. म्हणजे आतापासून पंचेचाळीस वर्षापूर्वीचा. वडिलांच्या बदलीमुळे वास्तव्य करावे लागलेल्या गावातला कालखंड. 'आलापल्ली' गावातला. कुठे आहे हे गाव, तर ते आहे चंद्रपूर जिल्ह्यात. आंध्रपदेशाच्या सीमेपासून काही अंतरावर असलेले. एक निवांत खेडेगाव असावे तसे निसर्गाच्या कुशीत विसावलेले सुंदर गाव!

हे पुस्तक वाचत असताना व्यंकटेश माडगूळकर आणि पु.ल. देशपांडे यांच्या व्यक्तिरेखांचे स्मरण होते. तशा आलापल्लीत अनेक व्यक्तिरेखा आहेत. त्यांची स्वतःची वैशिष्ट्ये आहेत. आलापल्लीत शाळा आहे. या शाळेशी निगडित काही लेख आहेत. या शाळेतील शिक्षकांच्या वागण्याच्या तऱ्हा वेगवेगळ्या. त्यातले उप्पलवार नावाचे सर आहेत. त्यांच्या वागण्यात एक अढी आहे. त्या भागातील गरीब, आदिवासी मुलांविषयी त्यांना कळवळा आहे तर श्रीमंत घरच्या मुलांमुलींविषयी अढी. त्या वागण्याचा त्रास नीलिमाला सुरुवातीपासून सहन करावा लागतो. तसा तिच्यासारख्याच इतर मुलींनाही. शाळा म्हटली की मैत्रिणी येणारच परंतु नीलिमाला मिळालेल्या मैत्रिणी म्हणजे सुफिया, शाहिना आणि परमजीत. फक्त तिघीच. या तिघींसोबतचा मैत्रीच्या गोफ अतिशय घट्ट आणि तितकाच उत्कट आहे. त्यांच्यासोबत त्यांच्या घरची माणसे, त्यांची आर्थिक परिस्थितीही येते. सुफिया घरची गरिबी उघड होऊ नये म्हणून नीलिमाला घरी येण्यापासून अडवू पाहते. तर शाहिनाचे वडील श्रीमंत. ती ऐट शाहिनामध्येही असते. स्वतःच्या इंग्रजीच्या जोरावर ती सरांनाही गप्प करते.

आन्शी ही एक वेगळी व्यक्तिरेखा. 'आन्शे, तुझा नवरा काळा, तू काळी पण देवानं पोरगं मात्र गोरंपान दिलं.' या वाक्याभोवती असलेली तिची कथा विलक्षण आहे. ही नवऱ्याची तिसरी बायको पोर होत नाही म्हणून नवऱ्याने टाकून दिलेली. परंतु गरोदरपणाचा आधार घेत थेट नवऱ्यालाच पायाशी लोळण घ्यायला लावणारी खरी हिंमतवान.

मुथ्थीचा बेरकीपणा वेगळाच. सासू खाष्ट. सतत त्रास देणारी. तिचा सूड म्हणून मुथ्थी अंगात वारं आल्याचे नाटक करी आणि त्यात सासूला टहाळ्याने झोडपून काढी. रामभरोसे हॉटेलच्या शेजारचा हलवाई, गुपचुप त्याची शेव चोरूनही काही न बोलणारा. अम्मा नावाची बाई. कधीकाळी नर्स असलेली. तिच्याविषयी इतकेच माहीत की ती अडल्या नडल्या बायकांची सुटका करते. म्हणजे काय करते ते कळले नाही. फक्त अम्मानेच सांगितले ते एवढेच कळले, 'एखादी बाई अडली की तिला कस्तुरीचा बारीकसा तुकडा नागलीच्या पानातून दिला की तिची लवकर सुटका होते.'

घरात कामाला असलेला दुर्गय्या उर्फ गंगाराम आणि सखू ही नोकरमंडळी आपलेपणाने वागणारी आहेत. कामात चोख. परंतु त्यांची भाषा हा एक गमतीचा प्रकार. 'ळ' ऐवजी 'ड' चा उच्चार अधिक. त्यामुळे अनेकदा गंमती होत. 'वेळ' ऐवजी 'वेड', 'विळी' ऐवजी 'विडी', 'वाळू ' ऐवजी 'वाडू'. पाहुणेमंडळींच्या समोर तर अशा उच्चारांनी धमाल होत असे.

लेखिकेने इतर व्यक्तींविषयी लिहिले तसे आई, बाबा, भाऊ निर्मल यांच्याविषयी देखील त्रयस्थाच्या नजरेतून लिहिले आहे. बाबांची मोटारसायकल चालवण्याची व त्यावरून होणाऱ्या फजितीची गंमत, भुशाच्या खड्ड्यात पडताना झालेली गंमत, यातून दिसणारा त्यांचा स्वभाव. बदलीनिमित्ताने करावी लागणारी बांधबांध, संसाराला लागणाऱ्या गोष्टी आपल्याकडे असल्याच पाहिजे याविषयीचा आईचा आग्रह, इतर नातेवाईकांत वागताना समजून घेण्याची वृत्ती, काटेकोरपणा तसा मोकळेपणा, आईच्या अशा हिकमतींविषयी मोळेपणाने लिहिले आहे.

प्रत्येक गावाला स्वतःची संस्कृती असते. परंपरा असतात. त्यानुसार तेथील लोक वागत असतात. बाहेरून आलेल्या माणसांना याबाबत नेहमीच कुतूहल असते. त्यांच्याशी समरस व्हायला त्यांना वेळ लागतो इतकेच. होळी साजरी करण्यासाठी आईने घेतलेला पुढाकार. दसऱ्यानिमित्ताने पाहायला मिळालेला आत्राम राजाचा राजवाडा आणि त्यावेळचे कार्यक्रम, गावात असलेली दुकाने, कॉलनी, त्यात राहणारे वेगवेगळ्या दर्जाचे लोक, सामान्य माणसांची घरे, त्यांचे राहणीमान, असा एक गाव लेखिकेने या पुस्तकातून उभा केलेला आहे.

परिसराचा संपूर्ण तपशील वाचत असताना आपणच त्यात सोबत फिरत आहोत असा भास होत राहतो.

आपल्या स्वप्नातले म्हणून एक गाव असते, ते कागदावर तितक्याच हळुवारपणे उतरवणे कठीण असते. ज्या वयात ते गाव सोबत असते, त्या वयाचे भान आणि निरागसता जपणे तर त्याहून कठीण असते. परंतु लेखिकेने ती तरलता जपलेली आहे. आलापल्ली हे गाव म्हणजे निसर्गसौंदर्याचे प्रतीक वाटावे असे. हिरवीकंच उंचउंच झाडी, पानाफुलांनी डवरलेली. डोंगर, बारमाही ओढा, वाळू, महाकाय हत्तीपासून सापापर्यंत असंख्य प्राणी, कौलारू घरे, प्रशस्त अंगण आणि फुलपाखरे, मनाला भुरळ घालावी असे सुखद वातावरण. हे सारे शब्दांत पकडण्याचा प्रयत्न लेखिकेने केला. त्याला चित्रकार सतीश भावसार यांनी त्यांच्या कुंचल्यातून तितकाच सुंदर प्रतिसाद दिलेला आहे, हे मुखपृष्ठ पाहून निश्चितपणे म्हणता येते.


**दिवस आलापल्लीचे**
**नीलिमा क्षत्रिय**




**मूल्य २०० रुपये ● सवलतीत १२० रुपये**

## ग्रंथपान

**कल्चरली करेक्ट**
**संपादन : संदीप सारंग**
**वंदना महाजन**




### नवा जन्म... नवी पहाट

बौद्ध धम्म म्हणजे काय, हा विषय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्याचा स्वीकार केला १९५९ मध्ये, तेव्हापासून खऱ्या अर्थाने अधिक चर्चेत आला. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' असे मार्गदर्शन करणारे डॉ. आंबेडकर यांनी याच धम्माची दीक्षा का घेतली असावी, यामागचे सूत्र लक्षात घेण्यासारखे आहे. खरेतर त्याचे मूळ 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतर केले ते का? या प्रश्नात आहे. याचा अर्थ असा की, आज आपण ज्याला हिंदू-वैदिक धर्म म्हणतो, तो काय आहे? त्याचे सांस्कृतिक, सामाजिक, परंपरा, रूढी, अंधश्रद्धा, यांचे स्वरूप काय आहे? या धर्माला कवटाळणे आणि त्याचे वर्चस्व झुगारून देणे ही अपरिहार्यता आहे की आणखी काही, हे तपासून पाहण्याची गरज आहे, तसेच या धर्माला सोडचिठ्ठी देऊन बौद्ध धम्मात प्रवेश करायचा म्हणजे काय? हा धम्म इतरांहून वेगळा आहे तो कसा, याचाही अनुभव तपासून पाहणे आवश्यक आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, नीती, विज्ञाननिष्ठा ही मूल्ये जीवनाच्या सर्वंकष उत्थानासाठी आवश्यक असताना त्यांचे माप सगळ्यांच्या पदरात समान पद्धतीने टाकले जात आहे का, हा खरा कळीचा मुद्दा आहे. परंतु इतकेच नाही, धर्मांतर ही चळवळ यशस्वी झाली का? ज्यांनी धर्मांतर केले त्यांचा स्तर या नव्या प्रवाहात कसा आहे? सामाजिक स्तरासोबत मानसिक स्तरात बदल झाला आहे का, असेही प्रश्न उपस्थित होत आहेत. हा विषय माणसाच्या जगण्याशी संबंधित आहे. माणसाचे जीवन केवळ रोजीरोटी पुरते मर्यादित नाही. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, जाती-जमाती, लिंग, अशा अनेक घटकांशी ते निगडित आहे. त्या सर्व प्रश्नांची सोडवणूक झाली आहे का? असा खूप मोठा व्यापक पट नजरेसमोर ठेवून या फलकातील लेखांची आखणी केलेली आहे. लेखातील आशयाची अपेक्षा व्यक्त करतानाच बौद्ध धम्माचा अभ्यास, एक कार्यकर्ता म्हणून घेतलेली भूमिका, अशा विचारवंत महिला लेखिकांकडून हे लेख लिहून घेण्यात आले आहेत.

वैदिक संस्कृतीत असलेले आचार-विचार हे मनुस्मृतीशी चिवट धाग्यांनी आवळलेले आहेत. चार आश्रम, चार वर्ग, उच्चनीचता, लिंगभेद, जातिभेद, विषमतेचा कळस यात हरवलेला माणूस आणि माणुसकी, स्त्रियांविषयीची अत्यंत जुलमी, कठोर भूमिका, त्यांच्या माणूसपणाला गृहीत न धरण्याची वृत्ती, अन्याय, अत्याचार आणि रुढी-परंपराच्या जोखडात भरडली गेली ती महिला आणि समाजव्यवस्थेने निर्माण केलेल्या जातीय व्यवस्थेतील खालचा वर्ग! याला काही पर्याय आहे की नाही? आहे, तो आहे, 'बौद्ध धम्म'! समानता. स्वातंत्र्य, बंधुता, न्याय अशा पंचसूत्र, अष्टांगांनी माणूसपण बहाल करणारा, माणसाला माणूस म्हणून जगण्याचे सर्व हक्क देणारा हा धम्म. त्याचा अंगीकार विधिवत दीक्षा घेऊन करता येतो, तसा आचरणातूनही करता येतो. असा अंगीकार केलेल्या महिलांचे अनुभव लेखांद्वारे संकलित करण्यात आलेले आहेत.

या पुस्तकातून व्यक्त झालेले सगळेच विचार हे अनुभवांशी निगडित असूनही ते सगळ्यांना आपलेसे वाटतील असे नाही परंतु ते नाकारता येतील असेही नाहीत हिंदू-वैदिक संस्कृती आणि गौतम बुद्ध यांचा बौद्ध धम्म यांच्यातला फरक, त्यातली सूत्रे, अंगे, व्यवस्था यांचा परिचय, त्यातले अधिक-उणे, हे आत्मपरीक्षण करण्यास नक्कीच प्रेरणा देणारे आहे आणि ही चळवळ कुठपर्यंत आली, तिच्यातून काय साध्य झाले, अजून काय करायला हवे, याचाही अंदाज यातून अभ्यासकांना येईल.

या पुस्तकाचे शीर्षक हे कल्चर - संस्कृतीशी जोडलेले आहे. म्हणजेच सामाजिक स्तरासोबतच एकूण जगण्याच्या पैलूंचाही विचार इथे अपेक्षित आहे. त्यानुसार आलेले हे लेख वैचारिकते बरोबरच जगण्याच्या समृद्ध अनुभवांशी जोडलेले आहेत.

आपली जात, जन्मगाव, शिक्षण, आपले पूर्व आयुष्य, बौद्ध धम्माशी नाते जुळल्यानंतरचे आयुष्य असा हा पट आहे. या पुस्तकाचे संपादकीय दोन भागात असून ते विस्तृत आणि तितकेच आशयघन आहे. त्यावरून संपादन करणारे संदीप सारंग आणि वंदना महाजन यांचा या विषयाकडे पाहण्याचा सर्वकष दृष्टिकोन आणि त्यावरील हुकूमत लक्षात येते. शेवटी अनेक मान्यवर विचारवंतांची मते दिलेली आहेत, ती या विषयाचे आंतरराष्ट्रीय महत्त्व अधोरेखित करतात.

विशेष म्हणजे या लेखिका उच्च विद्याविभूषित आहेत तशा तळागाळातही कमळाप्रमाणे फुललेल्या, स्वतःचे तेज नजरेत आणून देणाऱ्या रागिणीही आहेत. सामाजिक चळवळ, बदल घडवून आणण्याची मानसिकता असलेल्या, अशा विविध क्षेत्राशी नाते असलेल्या, झोकून देऊन कार्य करणाऱ्या महिला आहेत. त्यांचे स्वतःचे विचार इथे स्पष्टपणे व्यक्त झालेले आहेत. या विचारात प्रगल्भता आणि सम ाजभान आहे. व्यक्त होण्यातला प्रामाणिकपणा आणि स्वतःच्या मतांचा ठामपणा प्रखरपणे या लेखातून जाणवतो. लिहिण्याची प्रत्येकीची धाटणी वेगळी आहे, दिलेले संदर्भ अभ्यासातून जसे आले तसे ते प्रत्यक्ष सहभागातूनही आलेले आहेत. बौद्ध धम्म आणि बुद्धिझम यांच्यावरील विचारांना चालना देणारे अनुभवसंपन्न असे पुस्तक, असे या पुस्तकाचे वर्णन करता येईल.

**मूल्य ३५० रुपये ● सवलतीत २५० रुपये**

# ग्रंथपान

**मनीमानसी**
**संगीता अरबुने**




## आपल्यापलीकडचे काही...

'स्त्री आणि पुरुष यांच्या राहण्यावागण्याचे नियम सुशिक्षित समाजातही समान नाहीत. पुरुषांच्या बाबतीतही अनेक जाचक नियम आहेत. म्हणजे पुरुषाने रडता कामा नये. त्यानं सगळ्या गोष्टी धीराने घेतल्या पाहिजेत. कुठल्याही परिस्थितीत त्यानं आपला संयम सुटू देता कामा नसे. त्याच्या जीवाला पेलवणारं नसलं तरी त्यानं स्त्रीदाक्षिण्य निभावलंच पाहिजे. तो पुरुष आहे, त्याचबरोबरच तो हाडामासाचा माणूस आहे हे ध्यानात घेतलं जात नाही. त्याचं एखादं भित्रेपणाचं, बावळटपणाचं कृत्यदेखील त्याला षंढ ठरवायला पुरेसं असतं. समाजाच्या या धारणेत स्वतःला कोंबून घेताना पुरुषाचा श्वास कोंडत नसेल कशावरून?'

'मनीमानसी' हा संगीता अरबुने यांचा ललित लेखांचा संग्रह नुकताच ग्रंथालीने प्रकाशित केला आहे. 'प्रतिबिंब', 'ओंजळीतलं चांदणं', 'स्वतःला आरपार ओवताना' हे त्यांचे पुरस्कारप्राप्त कविता संग्रह आणि 'चौकट' हा पुरस्कारप्राप्त कथासंग्रह प्रकाशित आहे. त्यांच्या या साहित्यातून तसेच अनेक साहित्यिक कार्यक्रमांतून वाचकांना आणि साहित्य-रसिकांना त्यांचा परिचय आहे. जगण्याच्या स्तरावरील प्रत्येक घटकाकडे पाहण्याची नितळ दृष्टी, जे नजरेला दिसते त्याहीपलीकडे असलेले जाणिवांचे तरल भावविश्व, नात्यांमध्ये असलेल्या रेशमी धाग्यांतील नाजूक बंध उलगडून दाखविण्याकडे असलेला कल आणि माणसाला माणूस म्हणून टिपताना त्याच्यातल्या माणूसपणाचा हळुवारपणे वेध घेण्याची वृत्ती, यांचा आपणांस यातून परिचय झालेला आहे. तीच वैश्टिष्ये प्रस्तुतचा संग्रह वाचताना पदोपदी प्रत्ययास येतात. या संग्रहातील लेख यापूर्वी नियतकालिकांतून प्रकाशित झालेले असूनदेखील त्यांचे ताजेपण कायम आहे. ललित लेखनात जी तरल वृत्ती असावी लागते, वाचकाला आपल्यासोबत घेऊन जाण्याची जी प्रवाही सहजता असावी लागते, तिचा प्रत्यय हे लेख देतात. मुळात हे लेख आणि लेखिका वेगवेगळे आहेत, असे जाणवत नाही. प्रत्यक्ष अनुभवांची शिदोरी जणू वाचकांच्या हाती दिलेली आहे असेच वाटत राहते. बऱ्याचशा लेखांचे निवेदन हे आत्मप्रत्ययी आहे, ज्याला प्रथम पुरुषी म्हणता येईल असे. त्यामुळे नकळत वाचक लेखिकेच्या त्या त्या काळातल्या अनुभवांना चरित्राशी जोडत जातो.

आजीसोबत राहताना आजीचे वर्णन केलेले आहे. आजोबा असताना तिचे जगणे आणि आजोबांच्या नंतरचे तिचे जगणे किती विलक्षण आहे, त्यात वेगवेगळ्या टप्प्यांवर कसे बदल होत गेले, अशिक्षित असूनही तिचे व्यवहार ज्ञान किती चोख होते, याचे वर्णन प्रभावी आहे. स्त्री म्हणून घरातील जबाबदाऱ्या पार पाडण्याच्या नादात आपल्या लेखनासाठी वेळ मिळत नाही म्हणून संपूर्ण जबाबदारी मोलकरणीवर सोपविली. परंतु त्यानंतरच्या मोकळेपणाचे जे वर्णन आले आहे ते एका लेखिकेचे राहत नाही, तर तिच्यात असलेल्या आत्मीय गृहिणीचे दिसून येते. अतिथी आणि यजमान यांच्यातल्या नात्याचा उत्साही अनुभवही प्रत्येकाने लक्षात ठेवावा असा आहे. गावात टुरिंग टॉकीजमध्ये सिनेमा पाहताना कशी गंमत येत होती, हा अनुभव एका पिढीतल्या रसिकांच्या ठायी नक्कीच असणार, त्याचे स्मरण या लेखाने पुन्हा होते. चुंबन ही एक माणसाच्या जीवनातील एक उत्कट प्रेरणा. ५ फेब्रुवारी हा त्याचा दिवस. त्याचे औचित्य म्हणून नव्हे तर त्याच्या प्रेरणा, उत्कटता, प्रेमभावना असा सर्वांगीण वेध त्यातून घेताना लेखिका असे म्हणते की 'यात आंतरिक उत्कट ओढ नसेल तर ते चुंबन न राहता बॅक्टेरियांची देवाणघेवाण ठरेल.'

प्रवासादरम्यान हॉटेलात न राहता कुणाकडे राहणे कसे फायदेशीर ठरू शकते. पालकांची मुलांकडून परीक्षेत अधिकाधिक गुण मिळविण्यासाठी वाढलेली भयानक हाव कशी जिवघेणी आहे. गुरूंचे एकमेव स्थान आणि आता प्रत्येक ठिकाणी निर्माण झालेले गुरू, अशा विविध विषयांवर लेखिकेने लिहिले आहे. हे लेख वाचताना एक प्रसन्न असा अनुभव येत राहतो. लेखिकेने लिहिलेले मनोगतही त्यांच्या चिंतनशीलतेचे दर्शन घडवणारे आहे.

या सर्व लेखांमधून प्रकर्षाने जाणवत राहते ती लेखिकेची नितळ दृष्टी. बाह्यरंगासोबतच अंतरंगाचा वेध घेण्याची आंतरिक तळमळ. जे पाहात आहोत, त्याच्या पलीकडेही यापेक्षा वेगळे काही आहे, नाण्याला दुसरी बाजू असते तशी! तिचाही शोध घेण्याची वृत्ती वाचकाला जाणवते. जगणे प्रत्येकाचे वेगळे असते, प्रत्येकाचे आयाम वेगळे असतात. समाजाच्या चौकटीत कुणाचा श्वास कसा गुदमरत असेल, याकडेही त्या तितक्याच आपुलकीने पाहतात. हे लेख वैयक्तिक अनुभवांशी जोडलेले आहेत, तसे व्यक्ती, समाज, सामाजिक धारणा, दैनंदिन जगण्याशी जोडलेले आहेत. प्रत्येकाचा आशय, सूत्र, विचार स्वतंत्र आहेत. तरी या सगळ्याच्या केंद्रस्थानी माणूस आहे. लेखिका स्वतः कवयित्री असल्याने कवितेच्या ओळी येणे अपरिहार्य आहे. परंतु त्या त्यांच्या स्वतःच्या नसून मान्यवर कवींच्या कवितांच्या ओळी आहेत आणि विषयाशी चपखल बसतील अशा आहेत. यातून त्यांचे समृद्ध असे वाचन दिसून येते तसे चिंतनही दिसून येते. 'ग्रंथ हेच गुरू असं आपण वाचत असतो; परंतु आपण नेमकं काय वाचतो यावरही ते अवलंबून असतं.' 'रक्ताची नाती कुठल्याही समूहात फार महत्त्वाची मानली जातात परंतु बऱ्याचदा ती रक्तासारखी पातळ असतात हे मात्र खरे!' ' लिहिणं म्हणजेही एकप्रकारचं चुंबनच, लेखणीने कागदाला दिलेलं...' अशा सुंदर ओळी वाचताना लेखिकेच्या चिंतनाची आणि लेखनातल्या कसदारपणाची ओळख झाल्याशिवाय राहात नाही.

घरात, कुटुंबात, हृदयात, समाजात, प्रत्येक ठिकाणी स्त्रीची ओळख वेगळी आहे, तिचे अस्तित्व वेगळे आहे आणि तिचे जगणे. तिचे रूप प्रत्येक ठिकाणी वेगळे आहे, हे मुखपृष्ठावरील विविध छटांतून दिसून येते. अनिल दाभाडे यांची ही कल्पकता लेखिकेच्या आशयाशी सुसंगत म्हणावी लागेल.

**मूल्य १८० रुपये ● सवलतीत १०० रुपये**




# ग्रंथपान

## आरवली ते अरावली
**प्रकाश अंबुरे**




### ध्येयगर्भ प्रवास

आपण काही केले पाहिजे हे ध्येय मनाशी असेल, ते गाठण्यासाठी आवश्यक असणारी जिद्द मनात असेल आणि त्यासाठी कठोर परीश्रम करण्याची शारीरिक व मानसिक तयारी असेल तर अशक्य नावाची गोष्ट शिल्लक राहात नाही. हा वस्तुपाठ वाचायला मिळतो तो 'आरवली ते अरावली' या पुस्तकातून. उद्योजक प्रकाश अंबुरे यांचे हे आत्म कथन. एका मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलेल्या मुलाचे उद्योजक होण्याचे स्वप्न पूर्ण झाल्याची विलक्षण रंजक कहाणी, अशी या पुस्तकाची ओळख करून देता येईल.

शाळेत असल्यापासूनच आपल्याला व्यवसाय करता आला पाहिजे, या ध्येयाने झपाटलेल्या प्रकाश अंबुरे यांची ही यशोगाथा आहे. नुसता विचार करीत बसण्याऐवजी त्यांनी दिवाळीला आकाश कंदील तयार करून विकले. वटसावित्री पौर्णिमेचे निमित्त साधून आंबे – फणस कोकणातून आणून मुंबईत विकले. यातून आत्मविश्वास वाढीस लागला. परिस्थितीची निकड म्हणून नोकरीला सुरुवात केली. डाका कंपनीत मालक –कामगार –कामगार युनियन हे नाते कळले तसे संघर्षही लक्षात आले. ठाण्यात असताना नोकरीसोबतच स्वतःचे 'अभिजीत वेल्डिंग वर्कशॉप' त्यांनी सुरू केले, तेही मालकाची रीतसर परवानगी घेऊन. पुढे कंपनीने विस्तारासाठी राजस्थानात अजमेर जिल्ह्यात ब्यावर येथे पाऊल ठेवले. तिथे जाण्याची तयारी प्रकाश यांनी ठेवली, तीही कुटुंबाला मागे ठेवून. कंपनीचे हित पाहत असताना आपलेही काही असले पाहिजे, ही अस्वस्थता त्या शांतपणे काम करू देत नव्हती. मालकाच्या इच्छेप्रमाणे अधिक उत्पादन कसे काढता येईल, याचे यशस्वी प्रयोग त्यांनी करून दाखविले. कंपनीच्या अडचणीच्या काळात धैर्याने आणि कौशल्याने साथ दिली. कंपनीत केले जाणारे काम कसे आहे, त्याला अधिक चांगले रूप कसे देता येईल याचे आडाखे सतत मनात असत व त्याप्रमाणे काम केले. त्यातले कौशल्य, साहस आणि चिकाटी याच्या जोरावर स्वतःचा उद्योग सुरू करण्याचे मनावर घेतले. तेही मालकाच्या मंजुरीने. तयार होणारा माल मालकाच्या कंपनीला वाजवी दरात देण्याचे मोठेपणही जोपासले.

स्वतःची 'जे.पी. मिनरल्स' कंपनी सुरू केली. विविध भट्ट्यांसाठी उष्णतारोधक म्हणून क्वार्ट्झ व वाळूचे मिश्रण (रॅमिंग मास) तयार करण्याचे उत्पादन या कंपनीत सुरू झाले. तिला लागणारा दगड व धातूचा कच्चा माल हा खाणीतून येतो म्हणून खाणी विकत घेतल्या. एकापाठोपाठ असे दहा उद्योग सुरू केले. त्यात युगांडा येथेही कंपनी सुरू केली. जगभर त्यांच्या कपंनीकडून पुरवठा सुरू झाला. स्वतःबरोबर मुलेही व्यवसायिक झाली. एक स्वप्न पूर्ण झाले. यात अनेक अडचणी आल्या, तशीच अनेक चांगली माणसे भेटली. त्यातून उभा राहिला तो एक यशस्वी उद्योजक!

प्रकाश अंबुरे यांनी आयुष्यात काही तत्वांना स्वतःशी जोडून घेतलेले आहे. आपल्याला व्यवसाय करता आला पाहिजे आणि करायचाच. पैसा मिळविण्यासाठी परिश्रम करण्याची संपूर्ण तयारी ठेवायची. परिश्रमाचा मोबदला देण्यात कसूर करायचा नाही. पैसा एकदम कधीही दुप्पट वाढवून द्यायची तयारी ठेवायची ती उत्पादन वाढण्यासाठी. परिश्रमाव्यतिरिक्त वा योग्य कारणाशिवाय पैसा द्यायचा नाही. सतत नवीन काहीतरी आपले म्हणून करत राहायचे. उद्योगाची वाढ होण्यासाठी काय काय करता येईल यात तत्परता आणि धडाडी कायम राखायची. आव्हानांचा सामना करायचा. खोटा भ्रष्ट व्यवहाराला थारा नाही.

प्रकाश अंबुरे हे यंत्रांशी, दगड–धातूच्या खाणींशी जोडले गेलेले आहेत तरी त्यांची वृत्ती यंत्रमय वा दगडमय झालेली नाही. तो त्यांच्या व्यवसायाचा भाग आहे. एक यशस्वी उद्योजक म्हणून त्यांनी लौकिक मिळविला तरी ते शेवटी एक माणूस आहेत. एक कुटुंबवत्सल माणूस! पत्नी छाया यांच्याविषयीचे प्रेम सतत त्यांच्या ठायी आहे. त्यांच्या उद्योगामुळे काही काळ तिच्याकडे दुर्लक्ष झाले खरे. परंतु त्याची भरपाई त्यांनी पत्नीच्या आजारपणात केली. पक्षाघाताने त्या आजारी झाल्या तेव्हा त्यातून बाहेर काढण्यासाठी सर्व व्यवहार बाजूला ठेवले. पत्नीची सेवा या एकाच निष्ठेने ते सतत त्यांच्या सोबत राहिले. तीच गोष्ट मुलांच्या बाबतीत. अभिजित आणि अनिकेत यांना उत्तम शिक्षण मिळाले पाहिजे, त्यांना आपल्यासारखेच क्रियाशील होता आले पाहिजे ही दूरदृष्टी त्यांनी सतत बाळगली. त्यामुळे आज हे दोन्ही पुत्र उद्योग जगतात आपला ठसा उमटवत आहेत. वृक्षाची मुळे खोलवर असतील आणि खोड निकोप असेल तर त्याचे डेरेदारपण डोळे दिपवणारे असणारच! प्रकाश अंबुरे केवळ आपल्या कुटुंबाची काळजी घेतात असे नाही, तर आपल्यासोबत काम करणारे कामगार, सहकारी यांचीही काळजी घेतात. त्यांनी स्वतःचा उद्योग सुरू करावा अशी मनिषा बाळगतात, त्यासाठी मदत करतात. आपण ज्या व्यक्तींमुळे पुढे आलो, ज्या व्यवस्थापनाने आपल्याला मदत केली, त्यांचे ऋण मानण्याचा मोठेपणा ते दाखवतात. त्यांच्याविषयी सतत कृतज्ञतेची भावना बाळगतात. त्यांच्याशी एकनिष्ठ राहण्याचा कसोशीने प्रयत्न करतात. यातून त्यांचे माणूस म्हणून मोठेपण दिसून येते. यशस्वी असूनही नम्र, आपुलकी, प्रेम जपणारे, साधेपणाची कास धरलेले असे हे प्रसन्न व्यक्तिमत्त्व!

हे एका उद्योजकाचे आत्मकथन आहे, परंतु त्याचे शब्दांकन केले आहे वैभव वझे यांनी! शब्दांकन करणे ही सुद्धा एक कला आहे. ती वझे यांनी उत्तम साधली आहे. उठावदार व आशयसंपन्न मुखपृष्ठ सजवले आहे सतीश भावसार यांनी. वाचकांकरता प्रेरणादायी ठरेल असे हे पुस्तक आहे.

**मूल्य २०० रुपये ● सवलतीत १२० रुपये**

# पुस्तकप्रकाशन क्षणचित्रे



सूर्यकांत कुळकर्णी लिखित
'सल शिक्षणाचा' पुस्तकप्रकाशनसमयी
दिनकर गांगल
लेखक सूर्यकांत कुळकर्णी
रत्नाकर गायकवाड
लक्ष्मीकांत देशमुख
आणि
सुदेश हिंगलासपूरकर



संजय चौधरी लिखित 'कविताच... माझी कबर' या पुस्तकप्रकाशनसमयी डॉ. रमेश पाटील, शशिकांत गुळूमकर, कवी संजय चौधरी, विनायकदादा पाटील, वसंत आबाजी डहाके, प्रभा गणोरकर, सुदेश हिंगलासपूरकर आणि अरुण शेवते



संजय कळमकर लिखित 'झुंड' पुस्तकप्रकाशनसमयी उदय शिंदे, लेखक संजय कळमकर, शालिनीताई विखे, राम शिंदे, यशवंतराव गडाख, श्रीराम पवार, राहुल जगताप, सुदेश हिंगलासपूरकर आणि विठ्ठलराव कळमकर



शुभांगी चेतन लिखित 'जीवन चाळ' या पुस्तकप्रकाशनसमयी डॉ. लतिका भानुशाली, अरुण शेवते, सुदेश हिंगलासपूरकर, चेतन, लेखिका शुभांगी चेतन, मुलगा स्मितकबीर, डॉ. आनंद नाडकर्णी आणि धनंजय गांगल



अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या संमेलनात ज्येष्ठ अभिनेते रमेश भाटकर यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. त्यासमयी डॉ. गिरीश ओक, शरद पोंक्षे, किरीट सौमय्या, कीर्ती शिलेदार, रमेश भाटकर, प्रसाद कांबळी , डॉ. जब्बार पटेल आणि सरदार तारा सिंग



९८ वे मराठी नाट्यसंमेलन समयी शिक्षणमंत्री विनोद तावडे. मोहन जोशी. मा. शरद पवार आणि प्रसाद कांबळी

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2016 -2018
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.